किरकोळ अंकास.........................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
फेरे छापणे ........०१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs.
per line over10...4 as.
Repetition per lin3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIII | AKOLA MONDAY 2 DECEMBER 1889 | NO. 46

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख २ माहे डिसेंबर सन १८८९ इ० | अंक ४६

## जाहिरात.

अकोले म्युनिसिपालिटीच्या हद्दींतील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, आठवडे बाजारांतील दुकानाचे बैठकीवर कर घेण्याचे संबंधानें अकोले म्युनिसिपाल कमेटीनें केलेले हे पुढील नियम क. ४४ (२) प्रमाणें छापून प्रसिद्ध केले आहेत, तर या नियमासंबंधीं ज्या कोणाची तक्रार असेल त्यानें ती तक्रार तारीख १ माहे जानेवारी सन १८९० चे तारखेस अथवा त्या तारखेचे पूर्वी म्युनिसिपल हपिसांत लेखीं पाठवावी.

अकोले. Krishnaji Malhar.

सेक्रेटरी म्युनिसिपल कमेटी अकोलें.

ता० २ माहे डीसेंबर सन १८८९ इसवी.

पुढें लिहिलेले नियम अकोले म्युनिसिपाल कमेटीनें सन १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्यांतील कलम ११६ (१) (इ) व ४१ (१) (ब) अन्वयें म्युनिसिपल हद्दींत भरणारे आठवडे व आठवड्यांतून दोन वक्तां भरणारे बाजारावर कर बसावण्याकरितां केले आहेत.

१. मुलूक अमाना हैदराबाद यांत नेमलेल्या वेळीं भरणाऱ्या बाजारांतील माल विकणाऱ्या सर्व लोकांवर प्रत्येक बाजाराचे दिवशीं प्रत्येक दुकानाबद्दल तीन पै पासून तो तीन आण्यापर्यंत असणारा जो बाजारचा कर तो म्युन्सीपाल हद्दींत भरणाऱ्या बाजारावर बसवावा.

२ मेहेरबान डेपुटी कमिशनर साहेब यांचे मंजुरीनें म्युन्सीपाल कमेटी एखादे बाजाराची हद्द कोणती आहे हें वक्तोंवक्तीं ठरवील व एखादे बाजाराची हद्द वाढवील

३. जे लोक बाजारांत माल विकण्यास आणतात त्यांना बसण्याकरितां प्रत्येक छावणी केलेल्या चबुतऱ्याचे व म्युन्सीपाल कमेटीस योग्य वाटल्यास प्रत्येक खुले चबुतऱ्याचे सोईवार भाग केले जातील. या प्रकारचे केलेल्या भागास नंबर दिले जातील.

४ या नियमांचे उद्देशा करितां दुकान या शब्दाचा अर्थ खालीं लिहिल्या प्रमाणें आहे ह्मणजे:—

[अ] नियम ३ यांत सांगितल्या प्रमाणें एखादे चबुतऱ्याचा केलेला भाग.

[२] ज्या चबुतऱ्याचे भाग केले नाहींत असे एखादे चबुतऱ्यावरील ज्या जागेवर एखादा व्यापारी माल ठेवील ती जागा किंवा चबुतऱ्यावर नसून बाजारचे हद्दींत ज्या जाग्यावर माल ठेवील ती जागा.

[क) बाजारांत विकण्याकरितां आणलेले प्रत्येक जनावरांनीं गुंतविलेली जागा.

(ड) ज्या वेळेस गाडींत किंवा गाडांतून माल विकला जाईल त्या वेळेस प्रत्येक गाडीनें गुंतविलेली जागा.

५. जीं दुकानें चबुतऱ्यावर रेखून दिलीं असतील तीं म्युन्सीपल कमेटीचे विचारास आल्यास त्यांनीं एक एक लिलावानें विकावीत ह्या प्रकारचे विकलले दुकानेंचे खरेदीदार यांनीं दुकानचा पूर्ण रकम लिलावाचे वेळेस दिली पाहिजे. या नियमा अन्वयें जीं दुकानें विकत घेतलीं जातील ती पोट मक्त्यानें देतां येतील.

६ नियम ५ प्रमाणें विकत घेतलेलीं दुकानें खेरीज करून ज्या प्रत्येक दुकानानें जागा गुंतविली जाईल त्या प्रत्येक दुकाना करितां या लगत जोडलेल्या परिशिष्टांत कोणत्या जातीचे व्यापाऱ्यांनीं किती कर द्यावयाचा आहे हें दर्शविलें आहे त्या प्रमाणें व्यापारी लोकांस कर द्यावा लागेल.

परंतु:—

(अ) सरकारचे तर्फे जे लोक विक्री करतील त्यांजपासून कांहीं मागितले जाणार नाहीं.

(ब) पहिली जुलई रोजीं जी तीनमाही सुरू होईल त्या तीनमाही करितां किंवा सदरील तीनमाहीचे कोणतेही आठवड्याकरितां जर एखादे छावणी केलेले चबुतऱ्यावरील दुकान घेतलें जाईल तर या लगत जोडलेल्या परिशिष्टांत जे दर सांगितले आहेत त्याचे दुप्पट दर मागितले जातील आणि जर सदरील दुकान तीन महिन्यांहून जास्त मुदती करितां किंवा १ जुलई रोजीं सुरू होणारे तीन महिन्यांत नसणारे कोणत्याही एखाद्या आठवड्याकरितां घेतलें असेल तर त्या दुकाना बद्दल परिशिष्टांत जे दर सांगितले असतील त्याचे दीडपट कर मागितला जाईल

(क) या नियमाअन्वयें जो कर द्यावयाचा आहे तो कर जर पैशाचा कांहीं अंश असेल तर त्या अंशाचा पुरा पैसा होइपर्यंत तो कर वाढवितां येतो.

(ड) ज्या माल विकणारांचीं नांवें परिशिष्टांत लिहिलेलीं नाहींत त्या सर्वांस बाजारचा कर देण्याची माफी दिली आहे असें समजावें.

७. तंटा उत्पन्न झाल्यास कोणता व्यापारी कोणत्या जातीचा आहे याचा निर्णय करण्याचा अधिकार पाटील यांस किंवा ज्या मनुष्याचे ताब्यांत बाजार असेल त्या मनुष्यास आहे. परंतु या निर्णयाचे हुकुमावर म्युन्सीपाल कमेटीस अपील चालेल.

८. नियम ६ प्रमाणें जो कर मागावयाचा आहे तो देण्यास जीं मनुष्यें इनकार करतील त्यांना लागलीच बाजारांतून काढून दिलें जाईल. आणि हा नियम आमलांत आणण्याचें कामांत मक्तेदार यांजला किंवा ज्या इतर मनुष्याकडेस बाजारचा कर वसूल करण्याचें काम सोंपविलें असेल त्याजला मदत करण्याचें काम पाटील किंवा ज्या दुसऱ्या मनुष्याचे ताब्यांत बाजार असेल त्याचें काम आहे.

९. प्रत्येक मनुष्य जो बाजारचा कर देईल त्याला रसीदीचे अन्वयें एक तिकिट मिळण्याचा हक्क आहे. आणि हा कर जो मनुष्य वसूल करील त्याला हें तिकिट देणें भाग आहे. म्युन्सीपाल कमेटीचे मंजुरातीनें वेळोवेळीं जसें ठरविलें जाईल त्या प्रमाणें या तिकिटाचा रंग व नमुना असून त्यांत तपशील लिहिला जाईल.

१०. नियम ५ यांत सांगितल्या खेरीज दुकानें पोट मक्त्यानें दिलीं जाऊं नयेत.

११. म्युन्सीपाल कमेटीनें दुसरे प्रकारचा हुकूम केला नसल्यास बाजारचा कर वसूल करण्यास हक्क दरसाल लिलावानें विकला जाईल. लिलावाचें साल १ एप्रिल पासून सुरू होईल.

१२. बाजाराचे कराचे बाकी करितां बाजारचा कर वसूल करणारे मक्तेदार यांजला दिवाणी कोर्टांत फिर्याद करतां येणार नाहीं.

१३. बाजारचा कर कोणत्या रीतीनें वसूल करावा या संबंधानें वेळोवेळीं म्युन्सीपाल कमेटी जे हुकूम देतील ते बाजारचा कर वसूल करणारे मक्तेदार यांजला मान्य केले पाहिजेत.

१४. कोणी मनुष्य मक्तेदार याचा नोकर असून तो या नियमाविरुद्ध अपराध करील व उलट पुरावा न झाल्यास सदरहु प्रत्येक अपराध मक्तेदार यांनीं कानाडोळा केल्यामुळें झाला आहे असें समजलें जाईल. आणि त्या अपराधास जी शिक्षा सांगितली असेल त्या शिक्षेस तो मक्तेदार पात्र होईल.

१५. देशी दारूचें किरकोळ विक्रीचें संबंधानें खालीं लिहिलेल्या गोष्टीस जे नियम लागू होतील तेच नियम बाजारचे मक्तेदार यांसही लागू होतील.

(अ) मक्त्याचे विक्री बद्दल.

(ब) मक्तेदार याजपासून जामीन मागण्याबद्दल.

(क) मक्त्याची रकम किती हप्तेबंदीनें द्यावयाची त्या बद्दल

(ड) मक्ता रद्द झाल्यावर किंवा हप्तेबंदी अथवा पेषगी न झाल्यामुळें जे परिणाम होतील व ज्या शिक्षा होतील त्या बद्दल.

(इ) मक्ता पोटमक्त्यानें देण्याबद्दल.

परंतु:—

मक्तेदार याजकडून जी रकम येणें असेल ती मग दंडा ऐवजीं असो, किंवा इतर दुसरी असो, ती रकम सदरहु मक्तेदार यांजकडून जसे कांहीं माल काळीची बाकी येणें आहे असें समजून वसूल केली जाईल.

१६. जो मक्तेदार खालीं लिहिलेल्या गोष्टी करील तो प्रत्येक अपराधा बद्दल १० रुपयांहून जास्त नाहीं असे रकमेचे दंडास पात्र होईल किंवा म्युन्सीपाल कमेटीचे मंजुरातीनें त्याचा मक्ता रद्द केला जाईल. व त्याचे अपराधाचे स्वरूपावरून त्यांजवर फौजदारींत काम चालवावें असें वाटल्यास तो फौजदारी मोकद्दमा होण्यास पात्र होईल.

(अ) ज्या मनुष्यास बाजारचा कर देण्याची माफी केली आहे त्या मनुष्यापासून बाजारचा कर वसूल करील तर.

(ब) ज्या मनुष्यांसीं कर देण्याची माफी केली नाहीं त्या मनुष्यापासून जितका कर वसूल करावयाचा आहे त्या पेक्षां जास्त घेईल तर.

(क) नियम ९ यांत सांगितलेलें तिकीट देणार नाहीं किंवा तिकिटांत वाजवी नाहीं अशी नोंदणी करील तर.

(ड) कोणी मनुष्यास किंवा कोणत्याही मालास अन्यायानें आटकावून ठेवील तर.

ह्या नियमां पैकीं सोळाव्या नियमांत ज्या बाबी सांगितल्या आहेत त्या बाबी अशा प्रकारचे जे मक्ते दिले जातात त्यांत शेरिक केल्या जाव्यात.

दरबारीचें परिशिष्ट

क्लास (१)

छावणीचे चबुतऱ्यावरील जाग्या करितां कलम ६ (ब) प्रमाणें व इतर जाग्या करितां हरएक दुकानचा दर.

| दर बाजारास | तीन माही | सहामाही | दरसाल |
| --- | --- | --- | --- |
| रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै |
| ० १ ६ | १ ० ० | २ ० ० | ३ ० ० |

| अनुक्रम नंबर | दुकानचें वर्णन |
| --- | --- |
| १ | बजाज (देशी व परदेशी कापड विकणारे) |
| २ | कासार (तांबें पितळेचीं भांडीं विकणारे) |
| ३ | मोठे सराफ सोनें, चांदी व नाणें विकणारें |
| ४ | मोठे भुसारी ग्रेनमार्केटच्या नियमांत न येणारे. |
| ५ | किराणा विकणारे (ठोक विक्रीदार) |
| ६ | तूप विकणारे (ठोक विक्रीदार) |
| ७ | बास व इमारतीचीं लांकडें विकणारे |
| ८ | गूळ विकणारे (ठोक विक्रीदार) |
| ९ | अफू विकणारे |
| १० | हरास करणारे |

क्लास ( २ )

छावणीचे चवुत्र्यावरील जाग्या करितां
म ६ ( ब ) प्रमाणें व इतर जाग्या करितां
हरएक दुकानचा दर.

| बाजारास | तीन माही | सहामाही | दरसाल |
|---|---|---|---|
| आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु.आ.पै |
| १ ० | ० १० ० | १ ४ ० | २ ० ० |

| अनुक्रम नंबर | दुकानचें वर्णन |
|---|---|

तेल व ढेप विकणारे
हलवाई
कसाब लहान मोठे
आल नंवुरा वगैरे रंगाचा व्यापार करणारे
सन आणि ताडपट्टी विकणारे
चामडे विकणारे
लहान सराफ ( खुर्दा विकणारे )
कापूस आणि सरकी विकणारे
टन मारकेट खेरीज करून )
सूत आणि दोर विकणारे
ठोक मिरची विकणार

क्लास. ( ३ )

छावणीचे चवुत्र्या वरील जाग्या करितां
६ ( ब ) प्रमाणें व इतर जाग्यांकरितां
हरएक दुकानचें वर्णन

| बाजारास | तीन माही | साहामाही | दरसाल. |
|---|---|---|---|
| आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु.आ.पै |
| ० ३ | ० २ ० | ० ४ ० | ० ८ ० |

| अनुक्रम नंबर | दुकानचे वर्णन. |
|---|---|

रोटी विकणारे
मनारी ( बांगड्या विकणारे )
बतारी [ जस्त आणि कथलाचे चिल्हर
पारी )
लहान भुसारी व मीठ विकणारे
थांभार
शिंपी
गेरू किंवा हुरमुजी विकणारे
बारी
नस विकणारे
० लोहार आणि पंचाळ
१ तंबाखु विकणारे
२ भडबुंजे
३ कुंभार
४ पटवो
५ गंधी
६ ढेप विकणारे
७ चिल्हर सूप विकणारे
१८ चिल्हर गुळ विकणारे
१९ चिल्हर कपडा व पागोटे विकणारे जसें महार आणि मोमीन
२० चिल्हर किराणा व औषधी विकणारे
२१ बारूदवाले
२२ जिनगर
२३ ( धनगर ) कांबळी व खादी विकणारे
२४ बुरूड
२५ फुलें आणि फळें विकणारे
२६ गवत कडबी व जळाऊ लांकडें विकणारे
२७ बागांतील भाजी व इतर होणारें उत्पन्न विकणारे ( डोक्यावरची ओझीं खेरीज करून )

क्लास४
जनावरें

| अनुक्रम नंबर | जनावराचें वर्णन. | दर जनावरास दर बाजारास दर. | | |
|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै. |
| १ | घोडे तट्टें वगैरे विकणारे | ० | १ | ० |
| २ | उंटशी वगैरे विकणारे | ० | १ | ० |
| ३ | गाई, आणि बैल विकणारे | ० | ० | ६ |
| ४ | गाढव विकणारे | ० | ० | ३ |
| ५ | शेळ्या मेंढ्या विकणारे | ० | ० | ३ |

ता० २ डिसेंबर
सन १८८९ इ.

Kishbaji Malhar
Secretary
A. M. C

# वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीष शुद्ध १० शके १८११

## हिंदुस्थानच्या गोष्टी

( लार्ड डफरिन यांचे उद्गार )

हिंदुस्थानचे माजी व्हाइसराय लार्ड डफरिन साहेब वेळोवेळ मेजवान्यांच्या प्रसंगीं आपल्या निरनिराळ्या पेषाच्या स्नेही मंडळीस हिंदुस्थानच्या गोष्टी सांगतात आणि त्यांची सहजीं करमणूक होते व हिंदुस्थानांतील अनेक विषयाकडे त्यांचें लक्ष पोंचतें. संधि मिळाली कीं आमचे लार्ड हिंदुस्थानचें चित्र लोकां पुढें मांडतात आणि त्यांस आपले स्वतांचे विचार कळवितात ह्यांत आमचें मोठें कल्याण आहे. एके प्रकारें इंग्लिश लोकांची इंडिया संबंधानें अनास्था नाहींशी होईल आणि अशा अल्पस्वल्प कारणांनीं त्यांस आमची थोडथोडी कळकळ लागेल हें चांगलें आहे परंतु उलट पक्षीं एकाच व्यक्तीचें मत वारंवार लोकांच्या मनावर बिंबत गेल्यानें आमच्या राजकीय उन्नतीसही धक्का पोंचण्यास अवकाश लागणार नाहीं. लार्ड डफरिन साहेबांचा आह्मांस पुरता अनुभव आला आहे त्यावरून आह्मी खात्रीनें सांगतो कीं ते कितीही नेटिव लोकांस प्रतिकूळ असले तरी वचनाचे धड आहेत; बोलण्यांत भाडभीड ठेवणारे नाहींत निस्पृहते बद्दल तर त्यांचा पक्का बाणा आहे. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत तरी त्यांचे कांहीं विचार ठाम होऊन कायमचे बनले आहेत आणि त्यांच्या सदोदित आवृत्तीमुळें आमचें अहित होण्याचा संभव आहे ह्मणून आह्मास मोठी भीति वाटते.

लंडन चेंबर आफ कामर्सची एक माजी व्हाइसराय साहेबांस महिनाभरा पूर्वीं मेजवानी झाली त्या वेळीं मशारानिल्हे साहेबांचें सर्व भाषण हिंदुस्थानच्या व्यापारा संबंधानें झालें. युनायटेड स्टेट्सच्या खालोखाल हिंदुस्थानशीं इंग्लंडचा व्यापार चालतो. अवाढव्य हिंदुस्थानचा परिघ, त्याच्या सहस्रावधि व्यापार संबंधानें शाखा, कोटींच्या कोटी रुपयांचे हिंदुस्थानच्या व्यापारांत खेळत असलेलें भांडवल इत्यादि अनेक साधारण गोष्टी बद्दल ते बोलले आणि त्यांनीं स्पष्टपणें लोकांची समजूत घातली कीं हिंदुस्थानची भरभराट व शांतता इंग्रजी अंमलापासून सुरू झाली आणि दिवसानुदिवस वृद्धिंगत होत आहे त्या सरशी हिंदुस्थानच्या व्यापारास उत्तरोत्तर चांगली तेजी येत आहे. हिंदुस्थानांत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मालाचे तक्ते पाहिले असतां असें दिसून येईल कीं इंग्लंडचा व्यापारांत पाय आंत आंत येत चालला आहे आणि बेलजम, आस्ट्रिया इत्यादि अन्य युरोपियन राष्ट्रांनीं इंग्लंडवर सरशी केली आहे. तेव्हां त्या बद्दल हिंदुस्थान सरकारनें योग्य तजवीज लवकर केली पाहिजे अशा मतलबाच्या चोहोंकडून सूचना येत आहेत. परंतु सर्व व्यापारांत प्रत्यक्ष हिंदुस्थानास काय मोबदला मिळतो याचा कोणी विचार करीत असेल किंवा नसेल याची मोठी भ्रांति आहे.

लाट साहेबांनीं हिंदुस्थानास अखेरचा सलाम केला त्या पूर्वीं आपल्या कारकिर्दीचें कलकत्यास सिंहावलोकन केलें आणि आपले विचार निर्भिडपणें लोकांस स्पष्टपणें विदित केले ते अद्याप आह्मास पूर्णपणें आठवतात. त्याच भाषणाच्या धर्तीवर व्हाइसराय साहेबांचे महिनाभरापूर्वीं काश्मिर संबंधानें उद्गार निघाले ते ऐकून आह्मास फार वाईट वाटत. काश्मिरचें संस्थान खालसा करणें रास्त आहे इतकेंच नव्हे तर कदाचित् काश्मीरच्या राज्य कारस्थानामुळें हिंदुस्थानच्या शांततेस धक्का पोंचेल असा प्रसंग दिसून आल्यावरून काश्मिरची व्यवस्था लार्ड लान्सडौऊन यांनीं लाविली ती सुरेख लागली असें लार्ड डफरिन साहेबांनीं प्रतिपादित केलें आहे. ह्या प्रकरणांतलें खरें तथ्य जगापुढें आलें आहे तेव्हां विशेष लिहिण्यांत हांशील नाहीं.

असो. एकंदरीनें हिंदुस्थानच्या वतीनें इंग्लंडांत भाषण करणारे लोक आह्मास पाहिजे आहेत आणि ते मिळतील तेव्हांच आमच्या देशाची खरी बाजू लोकांच्या नजरसमोर येईल.

---

लांच देणें किंवा घेणें पापकर्म होय. त्याचा ह्माडा मागें पुढें सर्वांस द्यावा लागतो तशांत क्राफर्ड प्रकरण उद्भवल्या पासून नीतिभ्रष्ट अधिकारी लोकांस चांगली दहशत पडली होती तेव्हां आमच्या या छोटेखानी प्रांतांत थोडक्यांतच आम्हास एका लांचाच्या खटल्या संबंधानें लिहिण्याची पाळी येईल असें वाटलें नव्हतें. आम्ही असें ऐकत होतों कीं खामगांवचे तहशिलदार मि. शेषाचलम यांजवर लांच खाल्याचा आरोप आला आहे व त्या संबंधानें सरकारी खलबतें चालली आहेत आणि काल दोन प्रहरीं 'वैदर्भ' पत्रांत ही त्या प्रकरणा बद्दल मोघम लेख आला आहे. मि. शेषाचलम सारख्या मोठ्या गृहस्थाचें पाऊल वांकडे पडलें असावें असें म्हणण्या पेक्षां लांचाचा लोकापवाद मिथ्या होईल असें म्हणणें विशेष संभवनीय दिसतें.

---

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 2, 1889.

## THE LORD BISHOP OF MADRAS.

During the last week the Lord Bishop of Madras who on his way staying at Amraoti delivered a short address to a native audience in the city Library at Amraoti. The subject was the importance of religion and especially Christian religion. His Lordship made a special reference to Mr. Bradlaugh and his atheistic opinions and seemed to condemn them. This was probably to counteract the probable influence which Bradlaugh is gaining on the minds of the youths of this country. The address was excellent so far as it went and was full of Christian piety and meekness, and to a Christian audience nothing could have been wanting to make it a very impressive one. Religion however is one of those vexed questions on which people might go on wrangling till eternity without coming to a definite end, and it would not therefore be any detraction from the merits of the address to say that it was not quite satisfactory to the audience it was addressed to. The educated native community which formed the bulk of the audience probably expected some reasoning on which the Christian religion was based and not a mere exposition of the faith of the followers of Christ. His Lordship was followed by his chaplain whose earnestness and manner of speaking were splendid. Occasions such as these are rare in Berar and it is desirable to have them oftener than now, if possible.

## PRINCE VICTOR IN INDIA.

The royal guest has stayed with us and will do so till 27th March. We shall not be wanting in loyalty if he does not appear so long in our little columns. We shall acquiesce in the grand reception at the capital town of Berars accorded to His Royal Highness by our generous and hospitable Nizam. The splendid Darbar with its unparalleled illuminations and with its gorgeous and sumptuous festivities and tournaments amidst the cheerful and jovial companies of hereditary Amirs, Umraos, ministers and other big official grandees is an event unique in itself in the history of the Nizam's dominions and will henceforward be the auspicious earnest of future cordial greetings and friendly visits between the English Rulers and the vassal princes of India. Prince Victor will, we hope, carry with him an honest impression of the sincere loyalty of his honourable, though poverty-striken, subjects. Whatever may be the cements of union either self-interest or devoted loyalty or mixture of both we all agree in the fact that the Natives of India have reached such a

stage of national character that they must 'awake arise or be for ever fallen' with the stability or instability of the English rule in India. We frankly, openly, honestly, sincerely with all might and force request our young Prince to remove the magnifying glass supplied by the circle of anti-native English officers and to interpret to his grand mother his observations upon the political and social aspirations of the millions of the people of India so that she may acquire a true and faithful picture of the ways of her Indian subjects. Before we wish him God-speed and happy voyage back to his mother country we would again call upon him to continue the pleasant impressions of his tour in India as he promises us to do.

On Tuesday last Lord Lansdowne received at the hands of the Chancellor of the Punjab Uuniversity the degree of the Doctor of Literature and delivered a long address before closing the proceedings of the Convocation. The speech is full of interest and tells us a plain truth in plain words. To give children a fare start in life is the heart-felt wish of elders when they send their sons to schools and colleges. But at present education does not gurantee the old easy ways of getting on in life and the University-mill of examinations unfits men for the purposes of active life. The Viceroy makes a list of complaints raised against the spread of education and in the concluding portion of his remarks proceeds thus with the two important points connected with education:—

"Then in regard to the disappointment experienced by our students in their failure to find suitable employment after they leave the college. To speak quite frankly with you I am afraid that the feeling of disappointment is one not likely to diminish as time goes on. Every year a number of young Indian gentlemen, who go out into world with the University degree, will steadily increase, and I am afraid there will be no corresponding increase in the number of appointments open to them. In the Public Service the number of appointments which are now open to gentlemen born in this country is, compared with the total number of graduates, infinitesimally small; but even if we assume that every appointment in the service was thrown open to Indian students, the number would bear a very small and insignificant proportion to the number of lads who, ten years hence, will be passing out into the world with the University degree. I know it is a great deal to ask you to look upon the knowledge as a thing valuable in itself, but still I trust the time will come when the students and their friends will come to look upon the possession of their knowledge, and upon the intellectual discipline which is obtained by close and careful study, as desirable in themselves, and that they will realize that there is no occupation so humble or duty in life, however apparently insignificant, which will not be better performed by the mind which has undergone that discipline. And, now gentlemen, I will say one word on the third ground of complaint, and it is that to which I must say that I listen with the most sympathy of all. I am constrained to express my own belief that if you were to regard the colleges and universities of this country as soley responsible for the moral training of young men you are foredoomed to disappointment, whether moral training be associated with religious sanctions or with the attempt to teach dogmatic theology. I do not believe that you can here or elsewhere teach morality in the same way as you teach science or history or law, and I am sure that those who have been educated at our own universities at home will bear me out when I say that in the university it is not to lecturers in ethics or to theological education that we look for the strengthening the moral fibre of our young men in England. It is on agencies other than these that we depend in England, and it is on agencies other than these that I believe you must depend here in India for that kind of training. We have to look in the first place to the personal example of the teachers to whose guidance mainly we have to trust and not less to the general tone and feeling among the students, particularly among the senior students, and those who have an opportunity of setting an example to the rest. We have to look again to the surroundings which our young men meet with in their own families at home, and last of all we have to look to the tone of public opinion in the country.

"The schools and colleges are little worlds of their own, and we very often find reflected in them, probably in one exaggerated shape, the faults and the imperfections of the society which surrounds them, and if that society is lukewarm or indifferent to questions involving moral rectitude, you will find the schools and colleges will follow suit, and that moral tone obtaining in them will be low moral tone. I have detained you for a moment on these points, because it seems to me that it would be a very serious misfortune if, owing to any short-comings in regard to the moral training of our students, judgment were to go against our colleges and universities as if they were responsible for the result of the qualities of purity and modesty and respect for authority, whether in the family or the State, all these are qualities which your tutors and professors will inculcate in vain unless they are supported by the great body of public opinion outside. Therefore, it is for the leaders of public opinion in India, for the men of light and learning, for the Chiefs and rulers of this country, to see that the high standard of morality is observed, and that the efforts of the Government of India for the education of its youth are ably seconded by their own efforts in the same direction."

There is plenty of absolutely waste, or at best very thinly peopled, land in India at the present time, which I think would be freely taken up if we had somewhat similar facilities, for acquiring land as they have in Australia, the Western States of America, and in the River Plate States. The Government have, however, to consider whether it would be good policy on their part to allow large, and in time no doubt powerful, European colonies to spring up in the highlands of India. E.

We congratulate Mr Balkrishna Kashinath Joshi on his promotion to the post of the Clerk of Court in the Commissioner's office. He is at present Tahasildar at Melkar and will now bid farewell to his little Taluka and with it to his Tahasildarship also. The innocent ryots that enjoyed peace and justice under him will have to try their patience until they secure an equally just and honest officer over them.

## CORRESPONDENCE.

To

The Editor Berar Samachar

Sir,

Poor subordinates in Government employ, whether European or Native, have come down to such a low ebb now a days, that they are treated more like menial servants while in the performance of their public duty: especially those employed in the West Berar Division no matter what position they occupy, or what their qualifications are, every body is treated alike—I am surprised steps are not taken to rectify matters in this respect.

It is reported that salaries of clerks or other employees in Government service if under attachment for debt are liable to be summarily dismissed; I wonder why officers have been exempted from this order. Is it because they receive a higher emolument of pay? if so, there is one in the station who is head and ears in debt receiving warrants now and again from different courts yet no notice is taken of such an individual. In my humble opinion the rule in question should be made applicable to both classes, don't you think so Mr Editor?

Yours Faithfully

27th Novr. 1889. X. N. Jingo.

## पोंच.

सन १८८८।८९ सालचा वऱ्हाड प्रांताच्या व्यापाराचा रिपोर्ट अलिशान रेसिडेंट साहेबांच्या आफिसांतून आम्हांकडे आला आहे त्याचा आम्ही अभार पूर्वक स्वीकार करितो. अभिप्राय सवडी प्रमाणें मागाहून प्रसिद्ध करूं.

परतवाड्याहून "अपरिचित" सहीचें पत्र उशीरां पोहोंचलें त्यांतील मुद्दा हा आहे कीं तेथील लायब्ररीच्या अंडर सेक्रेटरीच्या वर्तना पासून लोकांस लायब्ररीचा फायदा व्हावा तसा होत नाहीं. थोडक्यांत उमज पडल्यास बरें.

## वऱ्हाड.

यवतमाळचे डेप्युटी कमिशनर लेफ्टेनंट कर्नल एच्. डी. पी. रेनिक् यांस त्यांच्या बंगाल स्टाफ कोर मध्यें ता.५ आगष्ट सन १८८९ पासून कर्नलच्या हुद्याच्या बढतीवर नेमिलें आहे हें लिहीण्यास आम्हास संतोष वाटतो.

आम्हांस कळविण्यास फार दुःख वाटतें कीं येथील ट्रेनिंग कालजचे प्रिंसिपाल रा. रा. जनार्दन नारायण नातू यांस परवां शनवारच्या उत्तररात्रीं देवाज्ञा झाली. हे गृहस्थ फार लोकप्रिय व मनमिळाऊ होते. यांच्या मरणानें त्यांच्या आप्त व स्नेही मंडळीस आणि मुख्यत्वें करून वृद्ध तीर्थरूपांस मनस्वी दुःख होत आहे!

वाशिम—'स' पत्र पोचलें. स्थल संकोचा स्तव छापण्यास सवड नाहीं. आपण म्हणतां त्या प्रमाणें राष्ट्रीय सभें संबंधानें अनास्था फार थोडे ठिकाणीं दिसून येईल. वाशिमाहून तिन चार मुखत्यार येत आहेत हें ठीक आहे. आपल्या टाऊन हालांत भरलेल्या सभेच्या अध्यक्षांचें म्हणणें पुष्कळांस संमत पडेल. सामाजिक सुधारणेच्या अगोदर शिथिल होत चाललेले धर्मबंधनें दृढतर करणें आपलें पहिलें काम होय.

गेल्याच्या मागील रविवारीं तालुक्यांतून मुखत्यार निवडले जाऊन काल सायकाळी सर्व आकोला जिल्ह्यांतून राष्ट्रीय सभे साठीं मुखत्यार निवडले गेले त्याची नामावळी पुढील अंकी प्रसिद्ध करूं.

इस्ट आफ्रिकन कंपनीनें मोंम्बसाच्या गव्हरनरची जागा कर्नल केनिथ मेकंझी यांस दिली होती पण ती त्यांनीं नाकारली आणि ते आतां आपल्या जुडिशीयल कमिशनरचे जागीं येणार आहेत.

निजाम सरकारनें पांच हजार रुपयांच्या स्कालर शिपा ठेविल्या आहेत त्या गोरगरीब मुसलमान विद्यार्थ्यांस उच्च प्रतीच्या शिक्षणा साठी मिळतील. त्या सर्व हिंदुस्थानांत कोणत्या ही ठिकाणीं दिल्या जातील.

आम्हास लिहिण्यास संतोष वाटतो कीं मेहकरचे तहशीलदार रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी यांस कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट नेमिलें आहे.

निजाम सरकारानें यलानपट रेल्वे स्टेशन पासून दोन मैलावर तीन हजार बिघे जमीन युरोपिअन आणि नेटीव आईनापा विरहित मुलां करितां वसाहत साठीं बक्षीस दिली आहे. अशा कृत्या मुळें त्यांस नांवलौकिक दिल्याचें श्रय येत आहे.

पंजाब नादारी मुकरदमा नंबर १०
सन १८८९

नमूना (जी)

विद्यमान नादारी कोर्टाचे जडज्य जिल्हे अकोलें.

सर्वत्र लोकांस कळविण्यासाठीं नोटीस देण्यांत येतें कीं विठुगल दुळभदास रापुलाल विठुलाल पेहिवाळे रहाणार अकोलें तालुके व जिल्हे मजकूर. हा नादार आहे असा आज तारीख २३ माहे अक्टोबर सन १८८९ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि ता. ६ माहे दिसेंबर सन १८८९ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाइनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपले सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी- ही नोटीस जमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान ३ दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकिकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकिकत लिहून एखाद्या ज्युडिशियल आफिसरपुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे दावे ते रजिष्टरी दाखल होतील. तारीख २८ माहे नोंवबर सन १८८९ इ.

Richard Macgill

नादारी कोर्टाचे जडज्य जि० अकोले.

## वर्तमानसार.

'लेडीडफरीन फंडा' ची मूळ पीठिका अवगत असेल त्यांस स्त्रियांस वैद्यकी ज्ञान कितपत आवश्यक आहे हें सांगतां येईल. नित्याच्या व्यवहारांत ही दिवसानुदिवस स्त्रियांच्या मेडिकल शाळा गृहांची मातबरी दिसून येत आहे. शिकलेल्या सुईणींनी किती प्राण वांचविले आहेत हें मनांत आणिलें म्हणजे त्या बद्दल पक्की खातरी होते. माजी व्हाइसराय लार्ड डफरिन हे आयर्लंडच्या रायल युनिव्हर्सिटीचे चांसेलरच्या नात्यानें पदवी दानाच्या वेळीं संभाषण करितांना बोलले कीं आयर्लंडच्या प्रस्तुत राज्य क्रांतींत युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस गतवर्षीच्या १०४ स्त्रिया पेक्षां ही यंदा संख्या वाढली ही मोठी आनंदाची गोष्ट होय परंतु हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या वस्तुस्थिती वरून पाहतां स्त्रियांची प्रकृति वैद्यकी कडे अवश्य वळली पाहिजे, किंबहुना इतर विषयाकडे दुर्लक्ष झाले तरी पुरवेल. लाट साहेबांचें हें म्हणणें नेटीव्ह लोकांनीं लक्ष्यांत वागवून त्या प्रमाणें वर्तनक्रम ठेवण्या कडे झटलें पाहिजे.

खर्चीची काटकसर "इंडिया कौन्सीलास" लागूं होणार आहे हें ऐकून आम्हांस खरेखर संतोष झाला. सालिना साडेआठ हजार पौंडाचा खर्च कमी होईल असा सुमार आहे. इंडिया कौंसिलांतील जनरल स्ट्रेची आणि सर हेनरी युल यांच्या रिकाम्या पडलेल्या जागा पुन्हा न भरतां कमी करणार आहेत. कायनान्स कमिटीचे नियम बहुतेक पोकळ न ठरतां त्यांचे अवलंबन इंडिया कौन्सिल पर्यंत होत आहे या बद्दल लार्ड क्रास साहेबांची वाखाणणी करावी तितकी थोडी आहे. वास्तविक पाहतां हल्लीं पेक्षां ही पुष्कळ वेतगत होण्या सारखा आहे तरी सध्यां थोड्यांत गोडी असे म्हणणें भाग आहे.

लार्ड री—मुंबई इलाख्याचे गव्हरनर-पांची मुदत संपत आली तेव्हां त्यांच्या मागें लार्ड हारिस हे गव्हरनर होतील हें ही सरकारांतून कायमचे ठरलें. लार्ड री खारसे गव्हरनर मिळणें म्हणजे आमचें भाग्य पुन्हां उदयास आले पाहिजे. लार्ड हारीस साहेबांची मुख्य शिफारस काय ती ते क्रिकेट खेळण्यांत पटाईत आहेत. हे आक्सफोर्ड कालेजचे बी. ए. आहेत आणि सन १८८५–८६ सालीं लढाई संबंधानें हिंदुस्थानचे अंडर सेक्रेटरी होते. परंतु त्यांच्या कारकिर्दीच्या प्रकरणांत विशेष लक्ष्यांत ठेवण्या सारख्या गोष्टी घडून आल्याचें स्मरत नाहीं. वऱ्हाडांत शिकारी अंमलदार न्याय कोडतांचे मुख्य मुख्य अधिकारी आहेत त्या पासून रयतेस मासले वाईक कायदशीर त्रास होतो तसा प्रसंग मुंबई सारख्या मोठ्या इलाख्यांत न होवो! लार्ड हारिस कानसर्व्हेटीव आहेत तरी लोकप्रिय होण्याची चांगली हातोटी त्यास साधली आहे असें सांगतात. ईश्वरकरो आणि तें खरें ठरो!

डाक्टर दस्तूर जामास्पी मनळजी जामास्पी असान एम ए. व मुंबईच्या पार्शी लोकांचे कुळगुरु यांनीं जर्मनींतील बाडलीयन लायब्ररींत वेदस्मृति समान 'यास्न' नांवाच्या पुस्तकाचे पाहलवी भाषेतल्या भाषांतरा सहित जुने हस्तलेख नजराणा पाठविले आहेत. या हस्तलेखा वरील पारशी शक इसवी १३२३ सना बरोबर येतो. कोपेनहेगन येथील लेखाच्या खालोखाल हे जुने लेख आहेत. वऱ्हाडांतील मंडळीस विशेषें करून स्मरणांत ठेवण्या जोगी गोष्ट ही आढळेल कीं वऱ्हाडांत नांवाजलेले माजी असि. कमिशनर दस्तूर नैमजी साहेब यांचे वरील डाक्टर दस्तुर हे बंधु आहेत.

'प्रजाहितैषिणी पत्रिका'—नांवाचें एक मासिक वर्तमानपत्र हिंदी भाषेमध्यें सुरू होऊन त्याचे आजपर्यंत आठ अंक निघाले आहेत. वर्गणी दोन रुपये आहे. रायपूर जिल्ह्यांतील राजनांदगांवास प्रसिद्ध होत असतें. त्या भागाला खरोखर वतमापत्राची उणीव होती. ती या पत्रिकेनें दूर होत आहे. ही गोष्ट आनंद मानण्या सारखी आहे. हिंदी भाषेत निवत असल्यामुळें त्याच्या भाषासरणी संबंधानें आम्ही विशेष लिहूं शकत नाहीं तरी अनेक विषयांचा समावेश व हिंदी भाषेचें आमचें अर्धवट ज्ञान यावरून इतकें खास सांगतां येईल कीं हें वर्तमानपत्र चांगलें लोकोपयोगीं होऊन सर्वप्रकारें क्रमाक्रमानें लोकाश्रयास पात्र होईल.

'शिल्पकलाविज्ञान' मासिक पुस्तकाच्या तिसऱ्या वर्षास आरंभ होऊन पहिला अंक नजरपुढें आला आहे. उत्तरोत्तर या पुस्तकांतील लेख अनुभविक लोकांकडून येत असल्यामुळें त्यांतील माहिती नित्याच्या व्यवहारांतील असते आणि कारागीर लोकांनीं अवश्य स्मरणांत ठेवण्या सारखी असते. मासिक पुस्तकाच्या मूळ उद्देशा प्रमाणें हें पुस्तक वर्षा वर्षांनीं निरनिराळ्या शास्त्रीय विषया वरील निबंधांनीं भरपूर भरलें असून भाषा सोपी व यांत्रिक माहितीही चांगल्या सुरेख चित्रांनीं व स्पष्टीकरणांनीं व्यक्त करून दिली असते. कलाकौशल्यास उत्कर्ष आणणाऱ्या अशा मासिक पुस्तकांची आह्मांस मोठी गरज आहे ती थोडीबहुत या पुस्तकानें भागेल असा प्रस्तुत भरंवसा येत चालला आहे. हें त्याचे प्रकाशक रावसाहेब महादेव बल्लाळ नामजोशी यांस भुषणास्पद होय.

'विविधज्ञान विस्तार' मासिक पुस्तक पुष्कळ महिन्यांनीं मागसलेलें होतें तें अखेर गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या अंकाने चालूं महिन्यापर्यंत येऊन पोंचलें. मराठी भाषेतलें फार जुने व प्रौढ मासिक पुस्तक काय तें हें एकच अव्याहत चाललें आहे. त्यांतील विषय शिरोलेखानुरूप 'कुलस्त्रिया व गृहस्थ' या करितां लिहिलेले असतात. असें गोळा बेरजेनें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. मधून मधून आक्षेप घेण्यासारखे लेख आले आहेत. व त्या संबंधानें चर्चाही बरीच झाली आहे. तव्हां मतभेदामुळें ह्मणा किंवा नजर चुकीनें ह्मणा निषिद्ध लेख वजा जातां 'विविधज्ञान विस्तार' कर्त्यांनीं आपला नांवलौकिक कायम ठेविला आहे हें पाहून महाराष्ट्रांतील या पहिल्या प्रतीच्या मासिक पुस्तकाचा आह्मांस मोठा अभिमान वाटतो.

मनुष्य गणती— आजपासून तेरा चौदा महिन्यांनीं ह्मणजे सन १८८९ सालच्या फेब्रुवारीच्या शेवटील आठवड्यांत मनुष्यगणतीच्या खात्याचे कमिशनर मि. बेन साहेब यांची नेमणूक गेल्या अगष्ट महिन्यांत होऊन चुकली होती. त्यांनीं पुढें लागणारे माहितीचे तक्ते, नमुने इत्यादि तयार करून त्यास सरकारची संमति मिळविली आहे. सन १८८१ सालीं झालेला गोंधळ सर्वांस महशूर आहे. तेव्हां त्यावेळीं आलेल्या अडचणी दूर करून नवीन फेरफार करण्याचें मुख्य काम आहे. मि. बेन साहेब यांच्या हातांखालील दुसरें कमिशनर व सुपरिंटेंडंट यांच्या नांवनिशीवार नेमणुका बहुतेक पुढील वर्षाच्या एप्रीलच्या आरंभीं येतील तेव्हांपासून सेंससचे निराळे आफिस होणार आहे. येत्या मनुष्य गणतीच्या कामाची कडेकोट तयारी चालली आहे तेव्हां सन १८९१ सालीं पुन्हा एकवार जिल्ह्या जिल्ह्याच्या ठिकाणीं सन १८८१ प्रमाणें चुकल्या मुकल्या सर्वांची पंढरपूरच्या यात्रेप्रमाणें मोठी भीड दृष्टीस पडेल.

वऱ्हाडांतील ग्याझीटेड आफिसरांच्या तीमाही तक्त्यासंबंधानें 'बांबे ग्याझेट' मध्यें लेख आला आहे त्यांत त्या पत्राच्या बातमीदारानें अखेरीस एक अन्यायाचा ह्मणून मासला दाखविला आहे तो येणेंप्रमाणें. मागें थोड्या दिवसापूर्वी गेल्याच दिवसाकरितां मि. महंमद यासीनखा साहेबांची थर्ड क्लास डेपुटी कमिशनरचे जागावर नेमणूक झाली होती त्यामुळें या प्रांतांत सतत ३४ वर्षे काम करीत असलेले असि. कमिशनर मि. सी. ए. डब्ल्यू. डेव्हिस साहेबांचे हक्क मागें पडले. ही गोष्ट खरी तरी त्या प्रकरणांत म्हणण्या मोठा अन्याय झाला असेल असें आम्हांस खात्रीनें सांगवत नाहीं. जुनी गोष्ट उकरून काढून काथ्या कुटण्यांत तुर्त हाशील दिसत नाहीं सबब त्यासंबंधानें प्रसंग आल्याशिवाय आमचे विचार सध्यां आम्ही प्रदर्शित करूं इच्छित नाहीं.

बडोद्या कडील आमगेलीचे जिल्हा ज. उज्ज रा. रा. ध्रुव हस्टाकडील येथें भरलेल्या ओरियेंटलसच्या कांग्रेस साठीं गायकवाड संस्थान तर्फे मुखत्यार म्हणून गेले होते ते गेल्या पंधरवाड्यांत स्वदेशीं सुखरूप परत येऊन पोंचले तेव्हां त्यांच्या या हिंमतीच्या आणि धैर्याच्या स्वरूपवर्णना बद्दल तारीफ करणें अगदीं रास्त आहे. त्यांच्या सन्मानार्थ आगत स्वागत पुर्वक दोन बड्या सभा भरल्या होत्या त्या पैकीं सुरतेस भरलेल्या सभेचें अध्यक्षस्थान कलेक्टर मि. वुइन्चेस्टर यांनीं पत्करलें होतें मनुष्याच्या कर्तृत्वा प्रमाणें बहुत करून त्याचा मान मान्यता होते हें नव्यानें सांगणें नको.

"हे पांचोजन दिल्लीस आले" अशी एक म्हण आमच्या भाषेंत नवीनच पडली आहे. मागें मोंगलाईत दिल्लीहून एखादा स्वार एखाद्या गांवांत आला कीं त्या गांवांतील लोकांची इतकी घाबरगुंडी उडून जाई कीं हल्लीं तशी धांदल प्रिन्स व्हिक्टर आल्यानें ही उडत नसेल. या वेळीं देवील भामट्यांचा सुळसुळाट होताच. त्यांनीं घोड्यावर स्वार होऊन "हे दिल्लीसे आये" म्हणून सांगून अपली चैन करून घ्यावी अशी वहिवाट पडली होती! हे पांचामी दिल्लीसे आये ही ह्मण तरी अशाच कारणानें पडली आहे.

पु० बे०

'घी नो ढोल्यो अने ढोल्योना धी' कारणारपैकीं आमच्या सरकारच्या कारभाऱ्यांची स्थिती आहे ही गोष्ट आजपर्यंत पुष्कळदा सिद्ध झालेली आहे. आह्मी मोठे न्यायी असें ह्मणविणाऱ्या आमच्या शहाण्या सरकारानें नुकत्याच संपलेल्या क्राफर्ड प्रकरणांत जो न्याय केला आहे तोही याच मासल्याचा झाला आहे. सुमारें पाव शतक लांचेचा व्यापार ज्या हिंदुस्थान देशांत अव्याहत चालत होता तो अती नीच व्यापार उघडकीस यावा ह्मणून जो प्रयत्न करण्यांत आला त्याचें फळ आमच्या सरकारानें अशा प्रकारानें दिलें कीं पुन्हा एखादा क्राफर्ड उत्पन्न झाल्यास त्याची खोड मोडण्यास कोणीही कामदार तयार होणारच नाहीं. ज्या मामलेदारांनीं आपली कबूली सांगितली व ज्यांचेच कबूल नाम्यामुळेंच लांचेची दुर्गंधी नाहिशी झाली त्या मामलेदारासंबंधानें हिंदुस्थानसरकारानें जो न्याय केला आहे तो वाचू लागलें ह्मणजे हसूं येऊन इंग्रजी राज्यपद्धत ह्मणजे पोरखेळ आहे किंवा ती पद्धत पाहिजे तेव्हां फाडिजे तशी लागतें असें पटकन मनांत येतें.

ठा० अ०

## जाहिरात.


या नोटीशीनें अकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, टेंपल नगरीच्या नवळ जो सार्वजनिक पायखाना आहे त्याच्या पश्चिमेस एक त्रिकोनाकृति तुकडा आहे त्यांत रॉकआईल व पेट्रोलिअयम तेल ठेवण्या विषयीं योजना केली आहे. जे व्यापारी लोक तेथें जागा मिळण्या करितां अर्ज करितील त्यांना सोयस्कर असें नंबर पाडून भाड्यानें दिले जातील.

त्या प्रमाणेंच मुनिसिपल कायद्याच्या कलम १४ तील पोट नियम (२) प्रमाणें जो लायसन्सें कमेटी देईल त्या प्रत्येक लायसन्साला दरसाल पांच रुपये फी द्यावी असा कमेटीनें ता. १२ माहे मजकुरीं नियम केला आहे.

अकोला Kishnaji Malhar
२४–११–८९ Secretary
A. M. C.

## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं ज्या लोकांचें उत्पन्न ९९ रुपयांचेवर आहे अशा लोकांवर जनरल कमेटीनें सन १८८९-९० साला करितां टॅक्सचा केलेला ठराव तारीख ९-११-८९ रोजीं कायम केला आहे त्या प्रमानें कमेटीनें नांवनिसिवार यादी शहरच्या चावडींत लाविली आहे ताजनापेठची "नमारकेटांत व सरकारी नोकराची टौन हालांत लाविली आहे त्या प्रमाणें सर्वांनीं आपापले नांवावर ठराव पाहून ज्यांस अपील अर्ज करणें असतील त्यांनीं तारीख १७-१२-८९ रोजीं जनरल कमेटी भरणार आहे त्याचें पूर्वी करावेत जे नियमा प्रमाणें अर्ज करणार नाहींत त्यांची तक्रार पुढें एकिली जाणार नाहीं. कार्यालय तारीख १७।११।८९

Hari Ramchandra.
Secretary
A. M. C


हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सरकारच्या हुकमानें या कामीं लागणारें खातें बंद झालें. आमच्या मतें त्या बरोबर या रिपोर्टाचा ही लय झाला असतां तरी आह्मी या रिपोर्टा रितां नाराज झालो नसतो. आम्ही इतर प्रसिद्ध होत असलेल्या रिपोर्टांवरून व पत्रकावरून व कपाशीच्या ग्रेन मार्केटाच्या वार्षिक हकीकतीवरून आपलें काम भागविलें असतें. व्यापाराच्या सरकारी रिपोर्टापासून नाना प्रकारच्या व्यवहारांची घडामोड लोकांस स्पष्ट दिसून यावी अशी आमची समजुत आहे ती खरी ठरेल तेव्हा सुदीन मानिला पाहिजे.

ग्रेट इंडियन पेनिनशुला रेलवेचें आणि तिच्या ताब्यांतील खामगांव व उमरावती रेलवेचें काम सर्व वर्षभर सुयंत्र चाललें. परंतु रिपोर्टाच्या मागील वर्षी सुचविलेल्या सुधारणा अंमलात आल्या आहेत तरी त्यांचा उपयोग रिपोर्टाच्या वर्षी रेलवेकडील अधिकाऱ्यांनीं कितपत करून घेतला याबद्दलची माहिती तयार झाली नसल्यामुळें कमिशनर साहेबांस स्वस्थ बसणें भाग पडलें आहे. गुदस्तसालीं व्यापारासाठीं ७८४ मैल रस्ता वाहतां होता त्याची दुरस्ती वर्षभर चांगली ठेविली होती परंतु नवीन रस्ते किंवा सडका पैसा शिलकेंत नसल्यामुळें कांहीं झाल्या नाहींत. दिग्रज व दारव्हा आणि दारव्हा व कारंजे या मधील सडका बेताप्रमाणें चांगल्या झाल्यास तिकडील दळणवळण वाढून व्यापाराची ही चांगली भरभराट होण्याचा संभव आहे. कमिशनर साहेबांनीं वरील दोन सडकांच्या कामास सुरवात लवकर करण्याचें अश्वासन दिलें आहे. लोकलफंड व जमिनीचें उत्पन्न या दोन्हा बाबींतून शेंकडा एक प्रमाणें गोळा केलेल्या रकमेंतून रुपये ४७३३४ प्रातांतल्या जिल्ह्या जिल्ह्याच्या सडका नीट राखण्यासाठीं खर्च झाला आहे. या रकमेंतली मोठी रकम अकोला जिल्ह्यांत खर्चली गेली. वणी जिल्ह्याचे डेपुटी कमिशनर साहेबांनीं त्यांच्या जिल्ह्यांत झालेल्या खर्चासंबंधानें रस्त्याची व्यवस्था कशी राहिली हें कळविलें नाहीं. या चुकीबद्दल त्यांनीं विशेष खबरदारी ठेविली पाहिजे अशी त्यांस ताकीद मिळाली आहे

(पुढें चालेल.)

## राष्ट्रीय सभे विषयीं चळवळ.

चालु महिन्याचे अखेरीस मुंबईस भरणाऱ्या राष्ट्रीय सभे संबंधानें जिकडे तिकडे चळवळ सुरू आहे. वर्गण्या जमा करण्याचें काम झपाट्यानें चाललें आहे. मुक्त्यारांची निवड होत आहे. वरील प्रकारची खटपट आमच्या प्रांतांत, मुंबई, मद्रास, बंगाल, व नागपुर वगैरे प्रांतांत चाललेल्या खटपटीपेक्षां जरी जास्त नसेल तथापि कमीही नसेल असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. मागच्या रविवारी मुक्त्यारांची निवड करण्याकरितां पुलाजवळील धर्मशाळेंत जी मोठी सभा भरली होती त्या सभेचा थाटमाट ज्यांनीं पाहिला असेल त्यांना आमचे वऱ्हाडांत राष्ट्रीय सभे संबंधानें किती जारीची चळवळ चालू आहे हें सांगणें नको. लग्नकार्य असलें ह्मणजे घरची, शेजारची, पाजारची वगैरे सर्व मंडळी झटून जसें लग्नघर सुशोभित करितात त्याप्रमाणें फार श्रमानें थोडक्या वेळांत धर्मशाळेंचे ठिकाण सजविलें होतें. आंतील मधल्या उघड्या चौकावर चांदणी दिली होती. ठिकठिकाणीं केळीचे खांब लाविले होते. सभोंवार आंब्यांचीं तोरणें बांधिलीं होतीं. लहान मोठीं निरनिराळ्या रंगाचीं निशाणें आंत बाहेर लाविलीं होतीं व तीं वाऱ्या सरशीं फडफडतांना लोकांना या, या, ह्मणत आहे असा भास होई. चौकांत बसण्याकरितां खुर्च्या व बाकांच्या व्यवस्थेनें रांगा मांडल्या होत्या. वरील पडव्यातून जाजम सत्रंज्या वगैरे बिछाइत घातली होती. अध्यक्षाचें स्थान उत्तराभि मुख होतें. एकंदर समाज ७०० चे वर होता. अध्यक्षस्थानीं रा. रा. अमृतराव गोपाळराव देशमुख अडगांवकर हे होते.

सभेच्या कामास सुरवात झाल्यावर अध्यक्षांचे आज्ञेवरून रावसाहेब देवराव बाबा यांनीं भाषण केलें. त्यांतील मुख्य मुख्य मुद्दे हे. राष्ट्रीय सभेचा हेतु कायदे कौन्सिलांत लोकांच्या तर्फे मुखत्यार असण्याची आवश्यकता, शेतसारा कायम नसल्यामुळ होत असलेले तोटे वगैरे. रावसाहेब देवराव बाबांचें भाषण सुमारें दीड दोन तास झालें. भाषण चांगलें मुद्देसूत, अस्खलित, जोराचें, सर्वांना ऐकूं येण्या सारखें झालें. तथापि यांच्या भाषणांत पुष्कळ गोष्टींचा समावेश असल्यामुळें व जमलेला समाज या ओघाबरोबर चालण्यास असमर्थ असल्यामुळें त्याचा परिणाम व्हावा तितका झाला नसेल. व ते फारच फार लांब असल्यामुळें शेवटीं कंटाळवाणें ही झालें. रावसाहेबांचें भाषण झाल्यावर त्यांतील एक एकच गोष्टीवर रा. रा. अनंत विष्णु भागवत माधवराव वकील, गोपाळराव जळगांव लोकल बोर्डचे सेक्रेटरी, पांडुरंग, बापूजी व्यंकटराव मुधोळकर, आमचे नवे होतकरू वकील मि. देसई वगैरे गृहस्थांनीं भाषणें केलीं. ज्यांना कोणाला पुढें येण्याची हौस असेल त्यांनीं असें प्रसंग व्यर्थ घालवितां कामा नये रा. रा पांडुरंग बापूजी असें प्रसंग जाऊं देत नाहींत. सभेच्या कमाकरितां पदरमोड करून, आपली खाजगी कामें सोडून, हे निरनिराळ्या तीस गांवीं गेले. व तेथें आसपासच्या गांवचे लोक जमा करून त्यांना सभे संबंधानें समजूत करून दिली ही यांची खटपट स्तुत्य नव्हे काय! अकोल्यास एवढा मोठा समाज जमला हे यांच्याच श्रमाचें फळ असें ह्मणतात. राजंदेकराप्रमाणें दुसरे ही लोक खटपट करीत आहेत. रा. रा. गोविंद विश्वनाथ वकील, शंकर गोविंद वकील वगैरे मंडळी तालुक्यांत फिरण्यास गेली होती. ही मंडळी आपली आपल्या देशासंबंधानें कामें कर्तव्यकर्मे आहेत हें सांगून लोकांना जागृत करीत आहेत ह्मणून यांचे आभार मानणें जरूर आहे.

अकोला जिल्ह्यातर्फे एकंदर ५० मुखत्यार निवडले गेले. यांच्या संबंधानें कित्येकांचें ह्मणणें असें आहे कीं इतके मुखत्यार आपला पदरचा खर्च करून जे तेथें जाणार. त्याप्रमाणें त्यांना फायदा होईलसा दिसत नाहीं. कारण मुंबईस भरणाऱ्या सभेचें काम मराठी भाषेत न चालतां इंग्रजींत चालणार व त्यामुळें तेथें कोण काय बोलत आहे हें समजण्याची मारामार पडणार. फक्त ज्यांना कांहीं समजतें तें हामले किंवा त्यांनीं टाळ्या वाजविल्या ह्मणजे त्यांचे पाहून ही मंडळीही त्यांचें अनुकरण करील. वरील आक्षेप आम्ही बरोबर नाहीं असें ह्मणूं शकत नाहीं. येथें भरलेल्या समाजांत जर रावसाहेब देवराव बाबांचें भाषण चांगलें असतांही बरोबर समजलें नाहीं तर तेथें ही अडचण पडणार यांत नवल ते कोणतें!! परंतु ह्या अडचणी मुळें त्यांना फायदा होणार नाहीं हें मत आम्हास कबूल नाहीं तेथला समाज आटोपल्यावर लोक बाहेर पडले त्या वेळीं पुष्कळांचे तोंडून आम्हीं असें एकिलें कीं गड्याहो आज तर मोठी गंमत झाली. पांडोबा तर खुप बोलला. आतां आपल्या शेतीचा सारा वाढणार नाहीं हे जे शब्द आहेत ते आनंदाचे नव्हेत काय! यांच्या मनावर कांहीं तरी बोध झाल्या शिवाय हे निघाले काय? वरील उद्गार ज्यांचे तोंडून निघाले त्यांच्या पेक्षां पुष्कळ पटीनें. समंजस त्यांनीं निवडलेले मुखत्यार आहेत. त्या पैकीं पुष्कळांनां इंग्रजीचा थोडा बहुत गंध आहे. हे लोक मुंबईहून परत आल्यावर त्यांच्या तोंडानें जेव्हां आपणाला तिकडची सर्व हकीकत ऐकण्यांस सांपडेल तेव्हां आपणास कबूल करणें भाग पडेल कीं तेथें गेल्याचा फायदा केवळ यांनांच झाला नसून अंशतः त्याचा भाग आपणास ही मिळत आहे. आमच्या तर्फे जे मुखत्यार जाणार त्यांचीं नांवें खालीं दिल्या प्रमाणें:—

तालुका अकोलें.

१ रा. सा. देवराव विनायक, २ मेसर्स दत्तात्रै विष्णु, ३ जयकृष्ण बगाज, ४ शंकर गोविंद, ५ पांडुरंग बापूजी, ६ व्यंकटेश रामचंद्र, ७ गोविंद विश्वनाथ ८ हरी रामचंद्र अनवीकर, ९ खाजा फकरोदीन, १० आनंदराव हरसिंग, ११ बापु बाळकृष्ण, १२ व्यंकटेश कृष्ण १३ जयवंतराव सुंदरजी, १४ किसनसिंग बुसर, १५ गोविंदराव, आणि १६ मुकुंदराव देशमुख उगवे.

तालुका जळगांव

मेसर्स. १ फकीरचंद नवलाजी, २ गोपाळ गणेश, ३ अमृतराव आत्माराम,

तालुके अकोट

मेसर्स अमृतराव गोपाळ, २ मुकुंदराव नंदाजी ३ मारुतीपंत कुळकर्णी, ४ नारायण दानाजी, ५ नागो तुकाराम, ६ पांडु बल्लद नंदाजी, ७ रावजी बल्लद सखाराम ८ हरी बल्लद सखाराम, ९ दत्तु पाटील हिवरखेड, १० माधव रामचंद्र, ११ कृष्णराव गणेश, १२ अनंत विष्णु, १३ विठ्ठल गंगाराम, १४ माधव जयराम, १५ रामराव परशराम,

ता. बाळापूर.

मेसर्स. पोपटलाल परशराम साहु, २ गोपाळदास नारायणदास, ३ पानाचंद नथुसा, ४ यशवंत गोविंद, ५ सदाशिव उदेभान, ६ नामदेव विक्रम ७ खुशालराव गणपराव ८न्यामतखा बिलंदखा,

ता. खामगांव.

मेसर्स १ आबाराव जानराव, २ पुरणमल शामलाल. ३ गोपाळराव गोविंद, ४ मारुती कडताजी, ५ खा. सा. मोलेखान, ६ अण्णाजी केशव, ७ अनारसिंग महतानसिंग ८ सोनाजी भवानी.

अह्मी आपल्या ता. २३ माहे सप्टेंबर सन १८८९ इ. च्या अंकांत जळगांव तालुक्यांतील आरोडी, चिचारी वगैरे गांवच्या शेतकऱ्यांना भिल्ल लोकां पासून त्रास होत आहे सबब अधिकाऱ्यांनीं त्याकडे लक्ष द्यावें ह्मणून त्यांना विनंती केली होती. व त्याप्रमाणें जळगांव येथील तहशीलदार रा. रा. गणेश बापुजी व खामगांवचे चीफ साहेब यांनीं आमच्या विनंतीस मान दिला व लोकांचा त्रास मिटविला हें आमच्या वाचकांस जाहीर करण्यास फार आनंद वाटतो. या त्यांच्या कृत्या बद्दल शेतकरी लोक आभारी आहेत यांत तर कांहीं संशय नाहींच परंतु आह्माला देखील त्यांचे आभार मानणें भाग आहे. असलीं कामें करणें हें जरी त्यांचें कर्तव्य आहे तरी तीं चांगलीं, लवकर, व मनांत कळ कळ बाळगून करणें हें अंमलदाराच्या चांगुलपणावर अवलंबून आहे. कित्येक वेळ असें दिसून आलें आहे कीं लोकमुखाची कामें जरी खरोखर महत्वाचीं आहेत तरी तीं दिखाऊ किंवा वरिष्ट अंमलदाराच्या नजरेस येण्यासारखीं किंवा रिपोर्टांत दाखविण्या सारखीं नसल्यामुळें अंमलदार लोकांचा त्यापासून तत्कालिक फायदा होण्या सारखा नसतो सबब त्याकडे ते विशेष लक्ष न देतां दुसऱ्याकडे विशेष लक्ष देत असतात. असे पुष्कळ तहशीलदार आहेत कीं ज्यांच्या कडून शाळा खात्याला, गांव सफाई, देवीखातें, कमेट्या वगैरेंच्या कामाला मदत मिळावी तशी मिळत नाहीं व त्या मुळें तालुक्याची स्थिति सुधारणें फार कठीण पडतें. परंतु रा. रा. गणेश बापुजी यांच्या अंगीं सार्वजनिक कृत्याला मदत देण्याचा गुण चांगला वसत असल्या मुळें ते ज्या ज्या तालुक्यांत जातात त्या त्या तालुक्यांत वरील प्रकारच्या गोष्टीस नेहमी आपलीं इतर कामें संभाळून जितकी मदत देववेल तितकी देतात व या बद्दल त्या त्या खात्यांतील रिपोर्ट पूर्ण साक्ष देतात. अशा प्रकारच्या कामाला मदत देणें व तीं चांगल्या स्थितींत आणणें हें तहशीलदार लोकांच्या स्वाधिन जितकें आहे तितकें दुसऱ्या कोणत्या ही अंमलदाराच्या स्वाधीन नाहीं. व हीं कामें त्यांच्या हातून जर झालीं नाहीं. तर त्यांनीं आपली जबाबदारी पूर्णपणें बजावली नाहीं असें आम्हीं समजतों.

दुसरी ही एक मोठ्या महत्वाची गोष्ट यांनीं निकालास लावली ती अशी कीं या तालुक्यांतील गोंड व भिल्ल लोकांना दुबारा महसूल द्यावा लागत असे. एक जळगांव तालुक्यांत द्यावा लागत असे व दुसरा मेळघाट तालुक्यांत. एके ठिकाणीं दिलेला महसूल दुसऱ्या ठिकाणी मंजूर होत नसल्या मुळें गरीब लोकांनां एकाच माला बद्दल दोन वेळा कर द्यावा लागत असे ही स्थिति आज बरेच दिवसा पासून चालूं होती. परंतु यांच्या नजरेस येतांच त्यांनीं खटपट करून त्या ही गोष्टीचा निकाल लाविला. या वरून ह्याच्या तालुक्यांतील लोकांना किती सुख होत असेल याचा विचार वाचकच करतील. इतके जरी हे हुशार व काळजीनें काम करणारे आहेत तरी ए. अ. कमि.ची पाळी यांच्या वर अद्याप येत नाहीं; व येईल तरी कोठून

आमचा हा मुलुख जर बोलून चालून अपानी आहे तर यांच्या सारख्या मनुष्याला अशा जागा कां बरें मिळाव्या?

**The Berar Samachar**

MONDAY DECEMBER 9, 1889.

## THE CHIEF SUBJECT AT THE COMING CONGRESS.

In all probability one of the most important if not *the* most important subject that will occupy the attention of the Congress is the Legislative Councils. It is now understood that for some time past the Government have in view some kind of improvement of the Legislative Councils. It is almost admitted on all hands that the present condition of the Legislative Councils is hardly satisfactory and we have now to propose a definite scheme to Government regarding the improvement of those Councils. It is to be remembered that the one principal thing that we want in the Councils is the introduction of the principle of election and the question is whether we should have a new Electoral College for each province to elect members to the councils or that we should avail ourselves of the existing machinery of the Municipalities and District Boards so as to form the members of those bodies into an electoral College. In the latter case we can not elect members to the Councils only by what is known as double representation that is to say the people having elected the members to municipalities and District Boards the latter bodies are to elect members to the Council on behalf of the constituents they represent. The electoral Colleges on the other hand would be bodies of persons who have themselves a franchise and are qualified to vote on account of their fulfilling certain tests laid down by rule. This would of course secure a direct representation in the Councils.

There is one thing to be said in favor of the scheme in which the existing scheme of local government can be utilized. The promoters of the scheme say that by asking for a new Electoral College we would be making matters more complicated; while if we avail ourselves of the Municipalities and District Boards the electoral body would be ready to hand cut and dried. This as far as it goes is undoubtedly in favour of this scheme; but we have to remember that we have not to attain simplicity at the expense of principle. What we have to secure is a representation to the Councils which will really be of some service to the country. The voters therefore, it is imperatively necessary, should be such as to give an intelligent vote in the matter so as to secure a proper representation on the Council. Now looking at the two schemes from this point of view, it will appear that a body made up of Municipal and District Board members will not be exactly such a body as is required. The municipalities generally contain persons who are more or less possessed of local knowledge and so although they may be really very efficient for the management of local affairs, they may not be able to elect fit representatives who would be able to take a comprehensive view of matters.

There is much to be said on either side with regard to the two schemes; and what we have to suggest to our Berar delegates for this year's Congress is that the subject is a very important one and before appearing to vote at the Congress they should individually and jointly discuss the question and weigh the merits of both the schemes. We have also to ask our Berar delegates to see that in any scheme which is prepared this province should also be represented on Councils. As it is we are not at all represented on the Councils, in fact our position is very anomalous and our delegates should try to see that it does not continue to remain so.

## AMRAOTI NATIONAL CONGRESS MEETING.

The meeting assembled at Amraoti to elect delegates for the coming National Congress was a great success. People of all classes had met there to elect their representatives at the great meeting to be held in Bombay. The speakers were select. Messers Jog, Joshi and Khaperday addressed the assembly. Each in his own way impressed upon the audience the necessity of sending representatives in the Congress meeting to be held in this month. There was one grand feature remarkably conspicuous in the meeting and that was the intense feeling of loyalty towards the British Crown. Seldom is such feeling of devotion and loyalty to a foreign Ruler found in the annals of foreign conquests. The cause is to be traced to the simple fact that the British Government in India does not exist here solely and purely for protecting secured interests and aggrandising others. British Rule in India is largely for the amelioration of the Natives of India. People see this and naturally enough they are so loyally devoted to their Empress.

There is a great lesson to be derived from this loyal feeling of the people; and it is a lesson that the rulers ought to take. That lesson is that this loyalty should never be allowed to abate in its intensity and should rather be encouraged if that be possible. The people's demands seem to be very moderate in their nature; and if compliance with them is not likely to be in any way subversive to the interests of the British crown in India, let them be complied with.

No doubt India is not yet ready to receive the principle, "one man one vote," still she is ready to be governed on better principles and more advanced state than they obtain here at present.

The upper-most idea in the minds of Congressionists seems to be that the strength of the Legislative councils should be increased and that only in regard to non-official members:- that larger rights should be given to these councils and that members constituting these councils be taken there on some well recognised principle of representation.

If such a moderate demand can not be complied with the result will be dissatisfaction and discontent in the extreme. Gentlemen of the stamp of messers Jog, Joshi and Khaperday sing the song of loyalty to the British crown, and it is no small thing to say that they do not represent the views of the people in Berar. These men know full well what they are about; and if men like these come forward and say that they along with their numerous colleagues represent the wishes of the people of Berar, and that the public whom they represent wish to have certain things done for them and certain privileges granted unto them, to trifle with such feelings, would only indicate un British ideas. Our government is wise and it is not at all likely that these moderate demands of the people will be any longer delayed in being complied with.

पोंच—सन १८९० साला करितां सुबोधप्रकाशची रोजनिशी व सापकरांची रोजनिशी अशीं दोन पुस्तकें त्यांच्या मालकांकडून आह्मांकडे आलीं आहेत त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. दोन्ही रोजनिश्या चांगल्या सुबक आहेत. लहान मोठ्या आहेत तरी ग्राहकांनीं अशाहिदा जाहिरातींत दिलेल्या माहितो वरून आपापल्या कामास सोयेवार पडेल ती संग्रही अवश्य ठेवावी

'हिंदुस्थान देशातील कारागिरांचें वर्णन' या नांवाचे पुस्तकाची एक प्रत आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. त्यावरील अभिप्राय स.अखेर पर्यंत सवडीप्रमाणें प्रसिद्ध करू.

## वऱ्हाड.

रा. रा. मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. एल्. एल्. बी. हे 'राष्ट्रीय सभे'च्या कामासाठीं काल रोजीं उमरावतीहून मुंबईस पोंचले आहेत

गेल्या पहिल्या तारखेस येथील डिस्ट्रिक्ट बोर्डाची पहिली सभा भरून नित्याच्या कामाचें टिप्पण तयार झालें व पुढील वर्षाच्या बजेटा संबंधानेंही व्यवस्था लागली.

आज सायंकाळी येथील लायब्ररींत नागपुरचे श्री विद्यानंद स्वामी यांचें 'गोरक्षणा' वर व्याख्यान होणार आहे तर अकोलेकरांनीं स्वामींचा अगत्य पूर्वक आदरसत्कार करण्याची मेहेरबानी करावी

'वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभा' लयास जाण्याचा रंग दिसत होता परंतु ती उमरावतीस येत्या फेब्रुवारींत भरण्याचें ठरलें आहे आणि रा. ग. दाते व चितळे यांस सेक्रटरी नेमिलें आहे ही गोष्ट फार फार आनंद मानण्या सारखी झाली.

मि. जे कूपर-सर्जन व्हेटरनरी सुपरिंटेंडेंट वऱ्हाड यांस विलायतेस जाण्या साठीं हिंदुस्थानांतील ब्रिटिश सैन्याचे आफिसरांस लागूं असणाऱ्या रजेच्या नियमान्वयें सहा महिन्यांची रजा मिळाली आहे.

जळगांवचे तहशिलदार रा. रा. गणेश बापूजी यांस ते घेतील त्या दिवसांपासून दोन महिन्यांची हक्काची रजा मिळाली. आणि त्यांच्या रजेंत रा. रा. माधवराव बळवंत खामगांवचे नायबतहशिलदार यांस आक्टिंग तहशिलदार नेमिलें आहे.

गेल्या रेसिडेन्सी आरडर्स वरून कळतें कीं बुलढाण्याचे आक्टिंग डेपुटी कमिशनर मि. महमद यासीनखान यांस फांशी हून कमी शिक्षेस योग्य अशा अपराधांचे खटले चालविणाऱ्या माजिस्त्रेटचे अधिकार असिस्टन्ट रेसिडेंट साहेबांकडून देण्यांत आले आहेत. वऱ्हाडांतले पहिले नेटीव डेपुटी कमिशनर मि. महमद यासीनखान हे आहेत आणि त्यांत त्यांच्या हुद्या प्रमाणें माजिस्त्रेटचे अधिकारही दिले आहेत हें कळविण्यास आह्मास मोठा संतोष वाटतो.

येथील धर्मार्थ दवाखान्यावरील पहिले वर्ग हास्पिटल असिस्टंट मि. जी. पी. डिसोझा यांस एक महिन्याची रजा मिळाल्या प्रमाणें ते येत्या ११ वे तारखे पासून रजेवर जातील; आणि त्यांच्या जागीं येथील सिव्हिल इस्पितळांतील मि. जोसेफ नादीर हे काम पहाणार आहेत.

मि. एदलजी जमशेटजी संजाना एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस दुसरा वर्ग असि. कमिशनरचे अधिकार देऊन बडनेरा येथील स्मालकाज कोडताचे न्यायाधीश नेमिलें आहे.

येथील तहशीलदार रा. रा. कृष्णाजी हरी कोलटकर हे कालरोजीं आपल्या बदलीच्या जागेवर रुजूं होण्या साठीं उमरावतीस गेले. दाजी साहेब बरींच वर्षें अकोल्यास निरनिराळ्या हुद्यावर काम करीत आहेत. हे स्वभावानें साधेभोळे असून न्यायमनसबीच्या कामांत फार दक्ष असत. मुनसिपालिटीचे हे व्हाईस प्रेसिडेंट होते शिवाय मुलींच्या शाळे संबंधानें हे फार कळकळ बाळगीत. यांचे मित्रमंडळ मोठें आहे तेव्हां प्रस्तुतच्या वियोगानें त्यांस फार हुरहुर वाटेल.

रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर एक्स्ट्रा असि. कमिशनर वर्ग ३ रा यांस दर्यापुराहून इलिचपुरच्या कोडतावर बदललें आहे.

दोन सव्वा दोन महिन्यापूर्वीं उमरावतीस हायर लोअर स्टांडर्डच्या परीक्षा झाल्या त्यांचा निकाल गेल्या रेसीडेन्सी आरडर्समध्यें प्रसिद्ध झाला आहे तो येणेप्रमाणें:—

### हायरस्टांडर्ड

मि. वामन गणेश तहशीलदार व मि. नारायणसिंग बहादसिंग नायब तहशीलदार हे उभयतां गुदस्तसालच्या व यंदाच्या अशा दोन परीक्षेंत मिळून अवघ्या हायर स्टांडर्ड परीक्षेंत पसार आहेत असें समजावें.

क्याप्टन आर. डी. सी. डेव्हीस असि. कमिशनर आणि सैफुद्दीनखान डेपुटी क्लार्क आफ कोर्ट यवतमाळ हे ला. अकौंट्स, व व्हर्नाक्युलर मध्यें; मि. जी. सी. सुब्रायल नायडु तहशीलदार हे ला, रेव्हिन्यु व व्हर्नाक्युलरमध्यें; मि. लक्ष्मण नारायण मलकापूर कोडतांतील क्लार्क आणि मि. रघुनाथ बळवंत बडनेरा कोडतांतील क्लार्क, हे ला, रेव्हिन्यूमध्यें; आणि मि. जे. ओब्रेडी हे फक्त व्हर्नाक्युलरमध्यें पास आहेत.

### लोअर स्टांडर्ड

मि. पांडुरंग सखाराम उमरावती स्मालकाज कोर्टाचे नाझर, मि. महमद हुसेन अकोला हिंदुस्थानी शाळेचे हेडमास्तर, व मि. नारायण गोविंद नायब तहशीलदार हे तिघेजण अवघ्या लोअर स्टांडर्डच्या परीक्षेंत पसार आहेत.

मि. अनंत नारायण दांडेकर नायब तहशीलदार हे ला व रेव्हिन्यु मध्यें व मि. विनायक आपाजी नायब तहशीलदार हे ला व व अकौंट्स मध्यें पसार आहेत.

## वर्तमानसार.

मुंबईचे प्रसिद्ध ब्यारिस्टर मि० इनव्हारारिटी हे शिकार करण्या साठीं आफ्रिकेंत गेले आहेत. ही गोष्ट प्रसिद्धच आहे. या गृहस्थास नुकतेंच एका सिंव्हीणीनें पकडलें होते पण ते मोठ्या युक्तीनें सुटले. वेळ आली होती पण काळ आला नव्हता.

आम्हीं प्रजासत्ताकराज्य कबूल केलें आहे व मान्य आहे असें ब्राझीलच्या लोकांनीं युनायटेड स्टेटच्या प्रेसिडेंटास कळविलें आहे.

आंटवर्प येथें जो नुकताच एक काडतुसाचा कारखाना जळून फस्त झाला तो जळण्यास त्याचा मालक व व्यवस्थापक यांचा आळशीपण कारणीभुत झाला असें ठरून तेथील कोर्टानें त्यांस अनुक्रमें ४॥ वर्षे व १८ महिने शिक्षा करण्यांत आली. कारखाना जळाला त्यावर ही दक्षणा देण्यांत आली. वाटतें!

झांबेसीच्या उत्तरच्या प्रांतांवर आपचा कांहीं हक्क नाहीं असें मुख्य प्रधान लार्ड सालिसबरी यांणीं पोर्तुगाल सरकारास कळविलें आहे.

धोलपूरचा महाराणा घोड्यावरून पडून बराच जखमी झाला आहे. आग्र्याहून डाक्तर मुद्दाम बोलविला आहे. लढाईंत जखमी होणें आतां स्वप्नींहीं दिसत नाहीं मग असें तरी जखमी होणें सुदैव नव्हे काय?

टर्कीचे राज्यांत तंट्या भिल्लाप्रमाणें दंगा करणारा मीझाबे नांवाच्या मनुष्यास पुन्हा पकडलें असून त्याच्यावर जुलुम व खून असे दोन आरोप आहेत चौकशी सुरू आहे याच मनुष्यास पूर्वी एकदां माफी मिळाली होती. टा० अ०

येथवर मजल आली! सरकार पक्षाच्या कित्येक पत्रांस पुढील प्रमाणें जाहिरात दिली आहे.– "अशी नोटीस देण्यांत येतें कीं, येत्या डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत काश्मिरच्या महाराजांच्या जवाहीरखान्यांतील सगळे इंद्रनील मणी दाखवून उघड लिलावानें विकले जातील" या जाहिरातीवर राजा अमरसिंग मुख्य प्रधान काश्मीर यांची सही आहे. हरहर कोणही महाराजांची दैना! यापुढची मजल महाराजांच्या बायकांच्या आंगावरील जवाहीर विकणें हीच नव्हे काय? आणि हे सर्व महाराजांच्या कल्याणासाठीं होत आहे नव्हे शाबास आहे आमच्या प्रभूची!!!

सु. सू.

राष्ट्रीय सभेचे सेक्रेटरी मि. ए. ओ. ह्यूम यांचें एक पत्र मार्निंग पोष्टांत प्रसिद्ध झालें आहे. तें वाचून प्रत्येक समंजस मनुष्यास फार फार वाईट वाटेल. मुंबईच्या कमिटीनें ह्या ह्यूमसाहेबास शंभर पौंडाला नुस्ते ठकविले ह्मटलें तरी चालेल. ह्याबद्दल मी आतां कोर्टांत फिर्याद लावीन अशी धमकी दिली तरी मुंबई कमिटीला तिचे कांहीं एक. वाटूनये याचें आम्हांस मोठें आश्चर्य वाटतें. सदर्हू पत्रांत शेवटीं शेवटीं ह्यूम साहेबांनी असें ह्मटलें आहे कीं, "आतां मी राष्ट्रीय सभेस रामराम ठोकतों. हिंदुस्थानच्या लोकांवर मी व्यर्थ भरंवसा ठेविला. त्यांच्या कल्याणाच्या गोष्टी त्यांना दुसऱ्यानें दाखविल्या तरी दिसत नाहींत. त्याच्या नादीं लागून मी मात्र सर्वस्वी फसलों. विचारें बुडलों, पेनशनर असतां सकाळपासून संध्याकाळपर्यंत राब राब राबलों, जातभाईंचा रोष संपादला, घरदाराची पर्वा ठेविली नाहीं आणि अखेर हे असें त्याच लोकांचें अंगचोरणें!!" आमच्यानें या पत्राबद्दल आतां कांहींच उद्गार काढवत नाहीं, इतकें ते अगदीं हृदयाला भिनणारें झालें आहे.

येत्या कांग्रेसपुढें बहुधा पुढील विषय निघतील असा अंदाज आहे:— १ कायदे कौन्सिल २ पब्लिक सर्विस कमिशन ३ कायमचा शेतसारा. ४ अबकारी. ५ फारेष्ट. ६ सरकारी गुप्त बातम्यांबद्दलचा कायदा. ७ प्राथमिक शिक्षण भाग पाडणें ८ साधारण शिक्षण पॉलिसी. ९ बारसाचा कायदा १० नेटिव संस्थानिकांशी पो. एजंटचे संबंध. ११ मिलिटरी कालेज. व १२ देशाच्या जमाखर्चासंबंधी प्रश्न. हे विषय कायमच आहेत असें नसून त्यांत कमजास्त होण्याचें कमिटीचें पसंतीवर आहे.

अंग, वंग नावाच्या प्राचीन आर्यांच्या राजधानीचें नांव गौड. तेथले राहणारे ब्राह्मण गौडब्राह्मण. केवळगौड, आदिगौड, शुक्लवाल आदिगौड, संध्यागौड श्रीगौड, गुजर गौड, टक्क आरगौड, चांभागौड—कातड्याचा व्यापार करणारे हरिपाणगौड इत्यादि १७ भेद या ब्राह्मणांत आहेत. इतर ब्राह्मणांपेक्षा येथें व्यवहारादि भानगडी फार कमी. हें ज्ञातीचे बंड कमी होईल तर बरें.

विद्यासंस्कृत असलेल्या स्त्रिया फार दिवस जगतात असें उदाहरणशः एकानें सिद्ध केलें आहे. जाहलें तर. पंचविसाव्या वर्षी नस्लवड आजीबाई बनणारांना हें रामबाण औषधच. क० त०

ईश्वर बहुनाच रहाटगाडग्याचे माळेप्रमाणें एका देशांचे लोकांनीं वर यावें व दुसऱ्यांनीं खालीं जावें, अशी आहे. जर असें नसतें तर ईश्वरास मनुष्यांनीं कधींच विचारलें नसतें. हीं सर्व सूत्रें ईश्वरानें आपल्या हातीं ठेविलीं आहेत. एक झाडाचें पान सुद्धां हालवायाची शक्ति मनुष्यात्रें आंगीं नाहीं, ह्मणून ह्मणून बरें आहे. जर असें नसतें तर हा नास्तिक होऊन त्याणें त्याचें कधींच स्मरण केलें नसतें.

मध्य एशियांत खोकंदच्या खानाच्या मुलखांत ९२,००० एकर जमीन अमेरिकेच्या कापसाचें बी पेरण्याकरितां रशियन लोकांनीं यंदा निराळी केली आहे असें समजतें. सु० प०

'न्यायसिंधु' कर्त्यांनीं म्युनिसिपालिट्यांस दोन हित गोष्टी सांगितल्या आहेत त्या त्यांनीं अमलांत आणण्या कडे झटलें पाहिजे. देशोन्नतीच्या पायाचा पहिला दगड म्हणजे प्राथमिक शिक्षण हा होय त्याचें सर्कारें कायद्याच्या सल्ला मसलतीनें अवलंबन करण्यास भाग पडलें पाहिजे. दुसरें, प्रस्तुतच्या प्राथमिक शिक्षण क्रमांत फेरफार, झाला पाहिजे; त्यांत मुख्य बदल हा कीं उदर निर्वाहाच्या साधना संबंधीं शिक्षणांत बीजारोपण व्हावें. म्हणजे जो मुलगा दगड फोडतो, नांगर हांकतो, घण मारतो व बांकस हातीं धरतो तोच मुलगा कागद वाचतो, हिशोब करितो; व आपल्या धंद्यास लागणारें जरूर लिहिणें तरी स्वतः लिहून ठेवतो. अशा मुलें निपजतील तरच आपें देशोन्नतीचे काम करण्यास शक्य होतील.

अहमदनगरकडे जर पर्जन्य पडला तर रब्बीचें पीक चांगलें येईल नाहींपेक्षां झालेल्या पर्जन्यानें पुढेंही पिकें दम धरतील असें सांगवत नाहीं. याकरितां लवकर पर्जन्य पडला पाहिजे रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

उद्योग धंद्याचें शिक्षण, अभ्यास क्रमांत पंजाब युनिव्हर्सिटीनें घातलें. व्यापारी लोकांस लागणारे कारकून वगैरे लोकांच्या ही परीक्षा युनिव्हर्सिटीनें आपणाकडे घ्याव्या असें तेथील प्रांतिक सरकारानें त्या युनिव्हर्सिटीस सूचविलें आहे. न्या० सिं०

'दीनबंधू' ने मुंबईस भामटेगिरीचें प्राबल्य फार वाढत चाललें आहे म्हणून ओरड केली आहे. नकली पोषाख वगैरे उंची उंची करून तेतय नबाब किंवा पेढीवाले अलिकडे फार होऊं लागले आहेत आणि ते गोरगरीब लोकास सर्फे बुडवितात इकडे पोलीस खात्या कडील अधिकाऱ्यांनीं अवश्य लक्ष पुरवावें.

दीनबंधुप्रकाशक रा. नारायण मेघाजी लोखंडे यांनीं स्वतां गिरणीवाल्यांशीं सामना करून मजूर लोकांची तरफदारी चालविली आहे आणि यशप्राप्ती ही होण्याचा रंग आहे. व आपल्या कामगिरी बद्दल खुद्द स्वर्गीनीं प्रशंसा करून घेतली आहे तेव्हां विशेष लिहिणें नलगे.

सन १८६१ साली महाराज दुलीपसिंग हें हिंदुस्थानांत आले होते. त्यावेळेस ते ह्मणाले "मी एतद्देशीय लोकांचा तिरस्कार करितो, कारण ते मोठे लबाड, तोंडपुजे आणि दगलबाज लोक आहेत. मी प्रिय इंग्लंडास परत जातां येण्याकरितां हवें तें खर्च करीन" पण आतां तेच. दुलीपसिंग इंग्लंडाचे आद्य कट्टे शत्रु बनले आहेत. कर्माची गति विचित्र आहे! न्या० स०

भरं काळ पडणें, वशांत छातींत आणि काळजात रोग होणें, सदा भोंवळ करणें, सुस्ती येणें, स्नायूंस शिथिलता आणणें, शरीर कृश होणें, फार काय पण अकालीं मृत्युवश होणें, ह्या गोष्टी केवळ तंबाकु सेवनानें देखील घडून आलेल्या आहेत, अशा विषयीं निरनिराळ्या देशांतील पुष्कळ वैद्यशास्त्रज्ञांचे अनुभव पूर्वक लेख आढळतात. कुं० शि०

---

नोटीस.

रा. रा. मारोती वलद खंडेराव जात विदुर राहणार आकोला यांस धोंडो वलद भिका केकाडी राहणार नांदखेडा ता० बाळापुर जिल्हा आकोला नोटीसीनें असें कळवितों कीं तुम्हांस आम्ही मुख्त्यार नेमुन आज १७ सतरा १८ अठरा महिने झाले. आतां आम्हांस तुमचें कारण नाहीं सबब आम्हीं तुम्हांस मुकत्याराचे कामावरून ह्या नोटीसीनें दूर केलें आहे. तुम्ही पतूर कडील सातविस २७ मैलांत व आकोलें येथील स्माल्काज कोर्टांत आमच्या करितां मुकत्यार म्हणून व इतर हीं कामें केलीं आहेत तर सर्व कामाचा हिशोब आणून देऊन पगार घेऊन जावें. तुम्हांस आम्हीं हें अगाऊ कळविलें आहे तुम्हां नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत सर्व हिशोब देऊन निकाल करावा असें न केल्यास निकाल होई पर्यंत जो आह्मास खर्च करावा लागेल तो व ह्या नोटिशीचा खर्च असें सर्व मिळून तुम्हापासून भरून घेतलें जाईल. तुह्मास आह्मी नोकरीवर ठेवून मुकत्यार नेमिलें याबद्दल तुमचा करारनामाही घेतला आहे आतां तुह्मी आमचे कागद संबंधाचें येणें असून तो पैसा वसूल करीत आहा असें आह्मांस समजतें. हें जर खरें असेल तर तुह्मी दगलबाजी केल्या बद्दल रीतीप्रमाणें काम चालवून तुमच्या पासून सर्व पैसा भरून घेतला जाईल. व सर्व कामाबद्दल तुह्मांस जबाबदार धरलें जाईल. ह्मणून दिली नोटीस सही. तारीख ६ माहे डिसेंबर सन १८८९ इसवी.

सही

सही धोंडी वलद भिका केकाडी रहाणार नांदखेड दस्तूर खुद्द.

---

नोटीस.

केशवभट बीन सखारामभट कसबे पिंपळगाव राजा तालुके मलकापूर जि० बुलढाणे यांस खालीं सही करणार यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हीं आम्हां नोटीस दिल्ही त्याचा जबाब देण्यांत येतो कीं मौजे जळके तालुक मलकापूर परगणे नांदोरा जिल्हा बुलढाणा मौजे खडतगाव जि० मलकापुर ही दोन्हीं गांवें जोशीपणाची गणभट बीन सिताराम भट यांची आहेत. याचा वारसदार तुम्हीं आहा असें नोटीसीनें कळविलें त्यांस परंतु मुळींच तुमचा गणभट यांचा कोणचे ही प्रकारचा सुतक व सोयर संबंध बिलकुल नाहीं म्हणून तुम्हीं नोटीशींत कळविल्या प्रमाणें कोणत्या ही प्रकारचे वारस नाहीं दुसरें असें कीं तुम्हांस आम्हीं जळके येथें जोशीपणाचे कामकाजा बद्दल आम्हीं कधीही पाहीलें नाहीं आणि गणभट यांस मुलगा कोणीच वारसदार राहीला नाहीं. आणि गणभट यांणी आमचे जवळून रुपये ३०० तीनशें घेऊन सदर्हू जळके गांव हें तनिगहाण दिलें आहे व त्या बद्दल आमचे पाशीं कागद रजिस्टर करून देऊन ताब्यांत दिलेलें आहे सबब गोष्टी मुळें आम्ही सदर्हू गावच्या जोशीपणाची वहिवाट करीत आहों. आणि गणभट यांचे वंशांतील कोणी ही वारसदार नाहीं आणि त्यांचे पोटीं संतती ही नाहीं अशा निर्वंशाच्या वतनावर तुम्हीं हक्क सांगू पहाता तर अशा प्रकारानें तुम्हांस वतन वगैरे कांहीं मिळणें नाहीं व त्याजवर कोणचे ही प्रकारचा तुमचा हक्क नाहीं. आतां विनाकारण तुम्हीं सरकार दरबार करून आम्हांस खर्चाचे पायीं आणाल तर त्या बद्दल सर्व प्रकार तुम्हांस जो नुकसान आमची होईल ती भरून घ्यावी लागेल व ह्या नोटीशीचा खर्च ही घेतला जाईल म्हणून दिल्ही नोटीस सही ता० २ माहे डिसेंबर सन १८८९ इ.

(सही)

येडु माहादाजी पाटील मौजे जळके कर.

---

हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास................

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस .......०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4as
Repetition per line3a

THE BERAR SAMACHAR

VOL XXIII | AKOLA MONDAY 16 DECEMBER 1889 | NO 48

वर्ष २३ | अकोला सोमवार तारीख १६ माहे दिसेंबर सन १८८९ इ० | अंक ४८

## AKOLA MEDICAL SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगाची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळांतिणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट एल्. एम् ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरिला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केस काळे होण्याचा मलम आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

विक्रीस तयार.

**SAPKARS' DIARY**
FOR 1890
WITH A CALENDAR FOR 1891.
सापकराची रोजनिशी.
सन १८९० सालाकरितां.

यांत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहण, सण, सरकारी कचेऱ्यांत व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौन्जीविवाहाचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीऑर्डर, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रूळी, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि नेहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचे कोष्टक दिलें आहे. शिवाय जमाखर्चाच्या रुदरांची व कांहीं कोरी पृष्ठें जोडलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | | ट. हां. |
|---|---|---|
| प्रत नंबर १ | ०।१२ | ०।२ |
| प्रत नंबर २ | ०।८ | ०।१॥ |
| प्रत नंबर ३ | ०।७ | ०।१॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविल असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल

भाऊ गोविंद सापकर
'ज्ञानचक्षु' मालक

## जाहिरात.

या नोटीशानें आकोले येथील सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, टॅंक बगीच्या जवळ जो सार्वजनिक पायखाना आहे त्याच्या पश्चिमेस एक त्रिकोनाकृति तुकडा आहे त्यांत राकआईल व पेट्रोलिअयम तेल ठेवण्या विषयीं योजना केली आहे. जे व्यापारी लोक तेथें जागा मिळण्या करितां अर्ज करितील त्यांना सोयस्कर असें नंबर पाडून भाड्यानें दिले जातील.

त्या प्रमाणेंच मुनिसिपल कायद्याच्या कलम ११४ तील पोट नियम (२) प्रमाणें जो लायसन्स कमेटी देईल त्या प्रत्येक लायसन्साला दरसाल पांच रुपये फी द्यावी असा कमटीनें ता. १२ माहे मजकुरीं नियम केला आहे.

अकोला
४-११-८९

Krishnaji Malhar
Secretary.
A. M. C

## पाक.

सालंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस ध्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येता धातु पुष्ट होते बळ येते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस ध्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गात होणारी आग, तिडक, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्रीसंगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणारी अंधारी भोवळ यांचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्तशुद्ध होते धातु पुष्ट होते बळ येते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहिलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| १२ | २ | ०।३ |
| ४८ | ३ | ०।३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशिव पुणें.—

वऱ्हाडसमाचार.

मिति मार्गशीर्ष वद्य ९ शके १८११

## संप व तत्संबंधी विचार.

अलिकडे एक दोन महिन्यांत व्यापारामध्यें कट (संप) होत आहेत. दोन महिन्यापूर्वीं इंग्लंडमध्यें एक मजूर लोकांचा कट झाला होता; जर्मनी मध्यें एक जहाला होता मुंबई मध्येंही एक दोन जहाले होते. परंतु आमच्या इकडील बऱ्याच लोकांस अर्थशास्त्राची माहिती कमी असल्या मुळें आमच्या देशांत असे कट होणें बऱ्याच अंशीं अशक्य दिसतें कारण कट करणारास व्यापाराची पुष्कळ माहिती पाहिजे; नाहींतर त्यांचा कट निष्फळ होईल इंग्लंडमध्यें कट करणाऱ्या लोकांची स्थिती कशी असते हें आमच्या हिंदुस्थानांतील बऱ्याच लोकांस विदान वऱ्हाडांतील लोकांस ठाऊक नाहीं. कट करण्याची टूम यूरोपांत देखील अठराव्या शतकांत सुरू झाली. अठराव्या शतकांत यूरोपचा व्यापार चांगल्या दशेस आला होता. हिंदुस्थान, चीन जपान, कानडा, युनायटेडस्टेट्स ऑस्ट्रेलिया वगैरे देशांशीं व्यापार १८ व्या शतकाच्या आरंभा पासूनच कायतो सुरू झाला. या वेळेपच तेथील राष्ट्रांत व्यापारामध्यें वरचढ दिसूं लागली. दुसऱ्या पेक्षां आपला माल कमी पैशांत उत्पन्न करून तो कमी दरानें विकून जास्त नफा करून घेण्याकडे प्रत्येक व्यापाऱ्याचें लक्ष्य लागलें व हा एक युक्ति काढून ते आपणास जास्त नफा करवून घ्यावयास लागले. कमी पैशांत माल उत्पन्न करून घेणें हा त्यांचा उद्देश असल्यामुळें अर्थांतच मजूर लोकांस जितका कमी रोजमुरा देववेल तितका देऊं लागले. मजूर लोकच ते, काय करितात बिचारे! पोटा साठीं ते कमी रोजमुऱ्यावर देखील काम करूं लागले अशी स्थिती बरेच दिवस चालली. १७ व्या शतकांत मजुरांस आठवड्यास १५ शिलिंग मिळत असत पण पुढें उतरत उतरत ४ शिलिंग मिळूं लागले दिवसें दिवस त्यांची स्थिती वाईट होऊं लागली. त्याच्या स्थितीकडे लोकांचें लक्ष्य लागलें. सरकारानें या कामांत हात घालावा व रोजमुरा नियमित करावा असें कित्येकांचें ह्मणणें पडलें पण जर सरकारानें हात घातला तर अनेक तोटे आहेत व व्यापार अजिबात बसतो असें तत्व पुढें अर्थशास्त्रवेत्त्यांनीं प्रतिपादन केलें या तत्वावरच पुढें अर्थशास्त्राचा व व्यापाराचा खरा उदय झाला. आतां सरकारनें तर व्यापारांत हात घालाया नाहीं व वरचढीमुळें मजूर लोकांची स्थिती तर वाईट होऊं लागली मग युक्ति काढयाची तरी कोणती? या विषयीं पुढें बरीच चर्चा सुरू झाली. आ. स्टुआर्ट मिल वगैरे तत्ववेत्त्यांनीं आयव्याचा बराच काळ या विषयांत घालविला मजूर लोकांचा रोजमुरा त्यांच्या अज्ञानामळे वाढत नाहीं असें दिसून येत आहे. अज्ञानामुळें मजूर लोकांचे अंगीं कलाकौशल्य व दूरदर्शीपणा मुळींच दिसून येत नाहीं व ह्या दोन गुणावर त्यांची काम करण्याची योग्यता व त्या योग्यतेवर त्याचा रोजमुरा अवलंबून आहे हें त्यांस मुळींच कळेना. एखाद्या चांगल्या हंगामांत जर त्यांना पुष्कळ पैसे मिळाले तर ते लगेच पुढें लग्न करण्यास प्रवृत्त होतात. आपणास कुटुंब पोसण्यास पैसे व ताकद आहे किंवा नाहीं याकडेस ते मुळींच पाहत नाहींत तेव्हां त्याची स्थिती सुधरावी तरी कशी! सर्वत्र अज्ञानाचा बाजार! दूरदर्शीपणा कोठेंच दिसेना तेव्हां जर सरकारानें त्यांस विद्या दिली तर त्यांचें अज्ञान जाऊन त्यांचे अंगीं वर सांगितलेले गुण येतील असें तत्ववेत्त्यांनीं युरोपांत पुष्कळ वर्षांपूर्वींच सिद्ध करून ठेविलें आहे. व १९ व्या शतकाच्या आरंभींच मजूर लोकांस विद्या देण्याची सुरवात युरोपात सुरूं झाली विद्येच्या प्रादुर्भावानें मजूर लोकांची स्थिती बरीच सुधारू लागली व त्यांस त्यांची कर्तव्यकर्में कळूं लागलीं. व्यापारी लोकांप्रमाणेंच त्यांस चांगला हंगाम कोणता व उत्तम नफा केव्हां येईल हें अगोदरच समजूं लागलें. मजूर लोक वर्तमानपत्रें वाचावयास लागले व ठिकठिकाणचे बाजार भाव त्यांस कळू लागले. इतक्या गोष्टी जेव्हां त्यांस कळावयास लागल्या त्यावेळेस त्यांस व्यापारी लोकांस त्यांची केव्हां नड पडते हेंही चांगलें कळूं लागलें व त्या नडीचा आपल्या स्वतःस उत्तम रीतीनें कसा फायदा करून घेतां येईल इकडे त्यांचें लक्ष्य गेलें. ह्याप्रमाणें बरीच विद्या बराच अनुभव आल्या नंतर मजूर लोकास असें दिसून आलें कीं व्यापारी लोकांस नड पडली असतां कट केल्यापासून बराच फायदा होईल. पण बोलणें हें करण्यापेक्षां फार सोपें. कट करण्यापासून फायदा खरा पण त्यांतून पर पडण्यास पुष्कळ अडचणी. पहा, मजूर लोकानीं असा कट केला कीं अमक्या रकमेपर्यंत जर रोजमुरा मिळाला तरच आह्मी काम करूं नाहीं तर करणार नाहीं. पण पुढें व्यापारी लोकांनीं ही कट केला कीं मजूर लोक मागतात इतका रोजमुरा आह्मी देणार नाहीं. कांहीं होवो आमचा व्यापार बुडाला तरी हरकत नाहीं (वाचकास आश्चर्य वाटावयास नको अशा प्रकारचे व्यापारी लोकांचे कट पुष्कळ झाले आहेत) उदाहरणार्थ अशी कल्पना करा कीं आज सगळ्या गिरणीवाल्यांनीं जर कट केला कीं व्यापाऱ्यांस एका नियमित दरा पेक्षां कमी दरानें कापडा विकावयाचा नाहीं पण हा त्यांचा कट पाहिल्यावर जर व्यापाऱ्यांनीं विलायतेहून कापड आणिलें तर गिरणीवाल्यांच्या कटाचा काय उपयोग?

आणखी मजूर लोकांस कट करतांना दुसरी एक अडचण आली ती अशी. जर त्यांनीं कट केला आणि जर व्यापारी लोकांनीं त्यांच्या अटी कबूल केल्या नाहींत व त्यास कामास लाविलें नाहीं तर तों पर्यंत मजुरांनीं खावें काय? उघड आहे कीं जर आज व्यापाऱ्यांनीं विलायतेहून आणलें कापड आणिलें

तर येथील कारखानदारांनीं पुढें काय करावें? आणखी एक अडचण अशी निघाली कीं, समजा सगळ्या सुतार लोकांनीं कट केला कीं १२ आणे रोजा शिवाय आह्मी काम करणार नाहीं आणि पुढें अशी वेळ आली कीं, व्यापारी लोकांस अतिशय त्यांची नड पडली आणि त्यांच्या अटी त्यांनीं कबूल केल्या. परंतु अर्थात सुतार लोकांचा दर अतिशय असल्या मुळें पूर्वी जे त्यांनीं १० लोक कामास लाविले असतील ते आतां ५ लावतील. आणि हे पांचजण त्यांच्या अत्यंत ओळखीच्या मंडळी पैकीं असूं शकतील. तर राहिलेल्या २ जणांनीं काय करावें? कट नसतां तर १० जणाला रोजमुरा मिळाला असतां कट असल्या मुळें पांच जणाला मिळतो पांच जण तसेंच रहातात. चौथी अडचण एक दिसूं लागली तिचा प्रकार उदाहरणानें स्पष्ट दिसून येईल. वर दिलेलें उदाहरण घेऊं. आणि अशी कल्पना करू कीं, व्यापाऱ्यांनीं गिरणीवाल्यांच्या अटी कबूल केल्या; पण येथें दुसरा एक संभव आहे. जर व्यापाऱ्यांस असें दिसून आलें कीं गिरणीवाल्यांनीं कट केला आहे व कापडाचा एकच भाव ठेविला आहे तर आपल्या ओळखीच्या गिरणीवाल्या कडून मात्र सर्व कापड खरेदी करितील आणि मग इतर गिरणीवाल्यांचें कटा पासून व्यर्थ नुकसान होईल ह्मणून एक वेगळ्या प्रकारची नड येत आहे. त्यावर अशी युक्ति लढविली आहे कीं नफा नुकसान सर्व गिरणीवाल्यांनीं सारखें वाटून घ्यावें. पण 'सारखें' या शद्वाचा अर्थ येथें विलक्षण होतो. सारखें ह्मणजे सारख्या प्रमाणानें असें समजलें पाहिजे. मूळ भांडवल, लोकांमध्यें वजन, अन्न इत्यादि गोष्टी लक्ष्यांत आणिल्य पाहिजेत.

ह्या प्रकारच्या वरील पांच अडचणी व आणखी दुसऱ्या अडचणी कट करणाऱ्या मुजूरदारांस दिसून आल्या व त्यांस कट हा बराच अशक्य दिसूं लागला पण दुःखांत पडलेल्या मनुष्यास कांहीं तरी सुचतेंच. या प्रमाणें त्यांनीं पुढें युक्ति काढिली. प्रत्येक ठिकाणीं Trades Union नांवाची संस्था त्यांनीं स्थापन केली. ह्या संस्थेचा जो मजूरदार मेंबर होईल त्यानें दर आठवड्यास कांहीं नियमित पैसा द्यावा. या प्रकारानें जमलेल्या फंडाचा व्यय असा करूं लागले कीं जर Trades Unions च्या मेंबरांनीं कट केला तर जितके दिवस त्यास खाण्यास मिळणार नाहीं तितके दिवस या फंडांतून त्यास पैसा मिळत जाईल. आणखी एखादा मेंबर मेल्यास त्याच्या मुलास व बायकोस ह्या फंडांतून बराच पैसा मिळतो. ह्या दोन कारणा वारल्या मुळें कट करणें दुर्लभ पडेना. वरील सांगितलेल्या पांच प्रकारच्या अडचणी Trades Unions च्या दोन नियमानें अन्याच वारल्या गेल्या आहेत. कट करण्यास धैर्य आलें आहे आणखी Trades Unions च्या मेंबरांनीं जर कट केला तर जें उत्पन्न होईल तें कलाकौशल्यानुसार वाटलें जातें.

( पुढें चालूं )

## सामाजिक सुधारणा व प्रस्तुत हालचाली

राष्ट्रीय सभे संबधानें गांवो गाव सभा होत आहेत, व मुंबईस बड्या सभेस जाणाऱ्या मुखत्यारांची निवड चालली आहे, सभांच्या हकीकतीच्या तारा वर्तमान पत्रांतून दररोज झळकत आहेत, अशी चहोंकडे चाललेली गर्दी पाहून लोकांचा कल फक्त राजकीय व्यवस्थे कडे सर्वच वळला आहे असा साधारण समज होतो. विशेषतः असा समज सरकारचा होत चालला आहे. हा समज अंशतः खरा आहे. आह्मी अंशतः ह्मणतों याचें कारण सर्व हिंदुस्थान भर निरनिराळ्या जातींचे, धर्मांचे, इतकेंच नव्हे तर निरनिराळ्या भाषा बोलणारे लोक असता ही राजकीय व्यवस्थेंत सुधारणा होण्यासाठीं हे सर्व, वरील भिन्नपणा एकीकडे ठेवून हल्लीं असलेल्या व्यवस्थेंत भासत असलेल्या अडचणी, वरील प्रकारच्या मंडळीस सारख्याच असल्या मुळें एकत्र होतात. ह्मणून एव्हढ्या एका गोष्टी कडें आमचें लक्ष्य आहे असें ढळढळीत दिसून येतें. सामाजिक सुधारण सबंधानें चळवळ सुरूं नाहीं असें नाहीं. परंतु निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या सुधारणांची गरज असल्या मुळें त्यांचा विचार करण्यासाठीं सर्व जातींचे समाज एकवट होण्याचा संभव नाहीं ह्मणून इकडेस आमचे मन वेधलें गेलें आहे किंवा नाहीं हें समजण्याचा संभव हो कमीच. तथापि यंदाच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं सभेचें काम आटोपल्यावर सामाजिक सुधारणे संबधानें ही विचार होणें आहे. मागले सालीं अलाहाबादेस ही सामाजिक सुधारणे संबधानें विचार झाला. या वरून निदान लोक केवळ राष्ट्रीय व्यवस्थेंत च ढवळा ढवळ करूं पाहतात व इतर गोष्टीकडे लक्ष देत नाहींत असा होत असलेला समज बरोबर नाहीं असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

आमच्या प्रांतांत ह्या विषयाकडे कानाडोळा आहे असें नाहीं. रावसाहेब देवराव बाबा ह्यांचे ह्या कामीं सतत परीश्रम चालूं आहेत. हें काम ह्मणजे हल्लीच्या स्थितीस अनुसरून जुन्या नव्याची सांगड घालणें होय. अर्थातच हा प्रयत्न करणें सोपी गोष्ट नव्हे. ह्मणून ह्या कामांत जरी पुष्कळ अडचणी आल्या, व लवकर यश न आलें, तरी आपला उद्योग बाबा साहेब सोडणार नाहींत अशी आह्मास उमेद आहे. गेल्या नवंबर महिन्यांत उमरावतीस या संबंधानें विचार होते वेळीं पुणे करांची याद वाचण्यांत आली. त्यांतील नियम ज्या धोरणा वर रचले आहेत त्याच धोरणावर आमचे इकडले नियम हो आहेत; जो काय फरक आहे तो अंशाचा आहे. पुणकरांनीं आपल्या यादीच्या प्रती प्रांतोप्रांतो पाठविल्या आहेत. ह्याचा हेतु असा दिसतो कीं सामाजिक सुधारणेचा विचार होण्यासाठीं एक मंडळी स्थापन व्हावी. ह्या मंडळींत जे सभासद असणार त्यांनीं यादींतील ज्या नियमा प्रमाणें त्यांस चालतां येईल त्या नियमा प्रमाणें चालण्या विषयीं आपणास बांधून घ्यावें. या यादी लगतच दुसरी एक याद आहे. तींत ज्या बड्या लोकांनीं या कामांत झटण्या विषयीं पतकर घेण्याचें कबूल केलें आहे त्यांची नावें आहेत पहीलेच नांव मिरज संस्थानच्या मालकाचें आहे. ही जी मंडळी स्थापन होणार तिचे अध्यक्ष होण्याचें यांनीं कबूल केलें आहे. श्रीमंत गायकवाड सरकार व होळकर सरकार ह्यांनीं ही ह्या गोष्टीस आपला उदार आश्रय देण्याचें कबूल केलें आहे. ह्या खेरीज प्रसिद्ध बाबू सतेन्द्रनाथ टागोर, बडोद्याचे दिवाण लक्षमण जगन्नाथ, महादेव गोविंद रानडे प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, हरी रावजी चिपळूणकर वगैरे आणखी मंडळी ह्या कामांत पडली आहे.

वरील गृहस्थांनीं सर्वच नियम पाळण्याचें कबूल केलें नाहीं. तथापि ते आपणास कांहीं कांहीं नियम पाळण्यासाठीं बांधून घेत आहेत. पुणेकरांचें यादींत सध्या फारच थोडे नियम आहेत ते असेः— ( १ ) मुलीचे लग्नाकरितां खर्च मुलीचे बापानें आपल्या एक वर्षाच्या प्राप्ती पेक्षां जास्त करूं नये तसेंच मुलाचे लग्नासाठीं अर्ध्या वर्षीचे प्राप्ती पेक्षां जास्त करूं नये. ( २ ) मुलाचें अगर मुलीचें लग्न अमुक वयाचे आंत करूं नये. मुलाचे वयाची इयत्ता १६ पासून २० पर्यंत ठविली आहे, व मुलीचे वयाची इयत्ता १० पासून १४ पर्यंत ठेविली आहे. ( ३ ) आपली पहिली बायको जिवंत असतां दुसरी करूं नये. व ५० वर्षावर वय झालें असतां लग्न करूं नये. (४) मद्यपान करूं नये. वैद्यानें सांगितलें असतां तसें करण्यास हरकत नाहीं. ( ५ ) आपल्या मुलीनां देतां येईल तितकें शिक्षण देण्याचा प्रयत्न करावा. आमच्या इकडे ठरत असलेल्या नियमांत व या नियमांत फक्त अंशाचा फरक आहे असें जे आह्मी ह्मटलें आहे तें असें: आमच्या नियमांत मुलीचे लग्नाची इयत्ता ८ वर्षा पासून सुरु होते. पुणेकरांचे नियमांत १० वर्षा पासून आहे. मुलाची इयत्ता १४ पासून आह्मी ह्मणतो. पुणकर १६ पासून ह्मणतात. आम्ही म्हणतो ४० वर्षांचें वय झाल्यावर लग्न करूं नये ते ह्मणतात ५० वर्षाचे वय झाल्यावर लग्न करूं नये. हाच कायतो फरक. आमच्या देशांतील हवा पाण्याच्या फरका संबधानें हा फरक असणें वाजवी आहे. पुणकराचे यादींत सुमारें ७५ असामीच्या सह्या आहेत. या गृहस्थांचे वर्गीकरण केलें ह्मणजे मुख्य गोष्ट ही दिसून येते कीं त्यांनीं या नियमांना पूर्ण विचार करून आपल्या सह्या स्वतंत्र पणानें दिल्या आहेत. उदाहरणार्थ मिरजकर मुलीचें लग्न १० वर्षांचे आंत करणार नाहीं अशी सही देतात तथापि मुलाचे १६ वें वर्ष लागल्या खेरीज करणार नाहीं अशी सही देत नाहींत. मुलीचे १४ वर्षाचें वय व मुलांचें २० वर्षांचें वय यास फक्त टागोर साहेबांचीच संमति आहे. वरील ७५ पैकीं चौधास पाहिलें कुटुंब हयात असता दुसरें कुटुंब करणार नाहीं ही गोष्ट कबूल नाहीं. आणखी ४ फक्कड असे आहेत कीं ५० वर्षावर लग्न करूं नये ही बाब ते पास करित नाहींत. सारांश काय कीं ज्यास जी गोष्ट रुचली तीच त्यानें पतकरली आहे. ह्याच धर्तीवर गुजरार्थेतही एक मंडळी निघाली आहे. त्याचे सुमारें १०००० वर सभासद आहेत. याही पेक्षां जास्त रजपूत सरदारांमध्यें सुरू आहे. लग्न खर्च व उत्तर क्रियेचा खर्च कमी करण्यांत यांना बरेच यश आलें आहे मागले सालीं या सरदार मंडळींत सुमारें १९४ लग्नें झालीं त्या पैकीं १६१ पेक्षां जास्त कार्यें यांनीं ठरविलेल्या नियमा प्रमाणें कमी खर्चानें झालीं. एकंदर १९३ उत्तर क्रिया झाल्या. पैकीं १३६ कमी खर्चानें झाल्या.

नागपूर प्रांतांत गोरक्षणा संबंधानें जी खटपट चालूं आहे तीही सामाजिक सुधारणाच होय असें ह्मटलें असतां चालेल. प्रसिद्ध श्रीमान् स्वामी यांनीं ठिकठिकाणीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांत त्यांनीं गोवधामुळें गुरांची संख्या किती कमी झाली आहे, शेतीचा कसा ऱ्हास झाला आहे, व त्यामुळें काळीचा वसूल किती असावा त्यापेक्षां कमी झाला आहे, हें सरकारी रिपोर्टावरून आंकडे घेऊन उत्तम तऱ्हेनें लोकांपुढें ठेविलें आहे. आमचे अकोल्यांतही एक स्वामी उपदेश करण्याकारितां आले आहेत. यासंबधानें त्यांच्या उभारणी वरून कांहीं खटपट सुरू आहे. स्वामी जो उपदेश करतात तो चांगला ठसण्यासारखा होण्यास त्यांच्या अंगीं असलेला राग त्यांनीं सोडून दिला पाहिजे, स्वामी महाराजानीं जी ही येथें चळवळ सुरू करून दिली तिच्या संबंधानें आम्हा एवढीच माहिती देतों कीं अजून ह्मणण्या सारखें कांहींच झालें नाहीं परंतु चांगल्या थोर लोकांचा आश्रय मिळाल्यास येथें गोशाला वगैरे एखादी संस्था होण्याचा संभव आहे.

The Berar Samachar

MONDAY DECEMBER 16, 1889.

## THE INDIA COUNCIL.

It is very gratifying to note that the proposal to appoint some native gentlemen of influence and education as members of the India Council has now become a matter of practical politics. We are greatly indebted for this matter to Viscount Cross first and to Lord Stanley next. Viscount Cross, through Lord Stanley, has informed the public that he has power to appoint Natives of India to the Council. If we mistake not the time has arrived when men would be found ready to sit as members of the India Council. Mr. Dadabhai Nowroji is already there on the spot. Mr. Lal Mohun Ghosh is another of the Indian politicians who desire to represent Indian interests in England. Mr. W. C. Bonnerjee has been to England for more than once. The deputation consisting of Messers Lal Mohun Ghosh, Chandavarkar, and Ramswami Mudliar that was sent to England about 3 years ago to encourage the election of members such as take very great interest in Indian affairs, shows that men of ability and learning are willing to make trips to England to represent the public opinion of India on matters relating to her. The caste prejudices come in the way of the Hindus. They do not affect men of other races. Mohamedans, Parsees, Jews and Christians would never entertain the slightest scruples to make a sojourn to the land of civilization and especially so as members of India Council. They would be an influence in the country and they will be the means of removing, if on any occasion it does arise any misunderstanding on the part of statesmen in England. May the time draw near for the appointment of such members!

We are glad to assure Mr. C Shesha Chillum a bright success in the long run. The charges of bribery are quite unsubstantial. They are the work of a mischievous hand. The calumnious re-

ports will be totally disbelieved when people will learn how the charges are fabricated against him. The patience and forbearance with which he behaved himself throughout indicate what a strength of mind he has and how confident he is of his unflinching honesty. He was a silent looker-on on his own actions when people discussed them freely. Inquiries were held departmentally and our confidential correspondent places us in the safest position to affirm that Mr. C. Shesha Chillum is an honor able man, was so, and will continue to be so.

Now we may briefly tell the story based upon the facts elicited in the enquiry held by the Taluka officer Mr. Maniksha Ratanji. The Patel on duty at Khamgaon reported to the Tahasildar the death of a Khatedar who was absent outside for years together. Thereupon the officer (Mr. Ayasaheb) issued the usual proclamation for the heirs of the deceased to appear before the court and to claim the 'Khate' in question. On the hearing day none appeared before the Court when the Patel and the Patwaree deposed on solemn affirmation that the Khatedar is dead and that a purchaser of the field by a deed is willing to accept it. The field was entered in the purchaser's name and there was the end of the matter. But a few months elapsed and the *dead* Khatedar returned alive. He put in a petition stating that the Patel and the Patwaree made a false report, and that an enquiry should be instituted and the field be restored to his name. The Tahsildar found the petitioner to be the old and real khatedar beyond doubt and therefore ordered the entry of his name for his field. He had the task to bring the conduct of the false reporters to the notice of the Deputy Commissioner and recommended them at the same time for severe punishment. They were let off with a mere warning and here begins the thread of the story. The leniency on the part of the District Officer proves fatal to the Tahasildar's cause. Some intriguers not knowing the ins and outs of the fact concocted the easy escape of the Patel into a case of bribery.

The criminal reporter is brought forth to assert that he has bribed the Tahsildar through a third person. It is strange enough that the recipient of of the illegal pecuniary benefits should refer his donor's case to the Deputy Commissioner when he himself can try him within his jurisdiction and give him his merited punishment. Some quibbling lawyers will perhaps find in this proceeding the germ of the Tahasildar's dishonesty both to the government and to his misleading benefactor. But happily for the Tahasildar the Patel was foolishly honest. When he was questioned as to whether he paid the alleged bribe before or after he was tried by the Tahasildar in consequence of the appearance of the 'deceased' Khatedar he said that the money was first received from him by the third person on the appointed day when his case was heard. There seems apparently to be no prearrangement. It is also unnatural that a person receives a bribe for the Tahasildar and the latter recommends the offender to severe punishment even when he himself can let him off unpunished. Let us argue the matter a little further. Granting the extreme possibility to all arguments we shall have to conclude that either the Patel is a dupe of the third person or the Tahasildar is a downright rogue. But, God forbid the expression! Unless a miracle were to happen we would believe the former and disbelieve the latter. Thus in all human certainty Mr. C Shesha Chillum is an honest officer.

---

His Excellency the Governor of Bombay opened last Monday the new Municipal Technical School at Poona and took the occasion to explain the 'Educational policy' in his presidency. The speech is the advice of a sincere friend and is full of remarks on the different phases of the educational problems. We cannot do full justice to it to day but cull the following view on Higher education:-

"I may perhaps take this auspicious occasion of going into the wider question of education in general. Nothing has caused me more surprise than the constant expression of fear in certain quarters that Government were starving higher education. I am quite unable to account for this nervous condition into which some leaders of opinion seem to have fallen; and as all the facts are absolutely opposed to those who pretend to entertain these misgivings I shall proceed to give as briefly as I can a review of the situation. Before reviewing what has been done by Government for the different institutions under its control, it may not be out of place to refer to some causes which may explain the idea that teaching in our colleges is retrograding. There are, at any rate in India, many more persons anxious to enter our colleges than are fitted for the curriculum by their previous training. In all colleges the greatest care should therefore be taken not to have overgrown classes, and to split them up whenever the number becomes too large to admit of individual training. Another rule which should also be made applicable to all the colleges is that no one should be admitted to the college who is unable through insufficient previous training to follow the teaching in the lower classes, and that promotion from a lower class to a higher should be entirely dependent on the certificate of fitness given as a result of the observation of their pupils by the professors in the lower grades. I attach much more importance to the estimate formed of the attainments of their pupils by those who teach them than to the estimate deducible from the number of marks obtained in an examination conducted by outsiders. (Hear, hear.) The college authorities are not only justified, but, I should say, it is one of their principal duties to discourage students who are obviously unfit, either from want of capacity or inefficient preparation for higher studies. Government provide professors in order to raise the standard of higher education, and can not allow their talents to be squandered on inferior teaching of students who are insufficiently prepared for a University course. Dr. Gray has recently delivered an interesting address to the students of the Grant Medical College, which deserves to be carefully studied by all who take an interest in educational problems. The most important statement for the consideration of Government which it contains is that the matriculation standard does not give any security that the students are able to follow lectures by Englishmen in technical subjects. The qualification for entrance must clearly be raised, so as to ensure that students can follow the lecture delivered. Whatever temporary disappointment may be created thereby, the undergraduates will in the end be saved from wasting their time on the sterile effort of mastering subject matter put before them in a form which is beyond their powers of comprehension, and the professors will, at all events know that what they say is understood. It is infinitely preferable that *real* higher education should be given to a select few than that higher education should be degraded by degenerating into a mere preparation for University examinations of a great number of candidates who may wish to take their chance of success or failure. (Applause.) It is no doubt one of the duties of our colleges to prepare men for these examinations, but it is a secondary duty. Their first aim should be to endow Indian society with men who can hold their own with distinguished University men at home. (Hear, hear and applause.) The best friends of higher education in India are not those who take as their test of its progress the number of students who pass examinations or the multiplication of colleges and high schools, but those who look to constant improvement of existing institutions, and a gradual but determined raising of standards. The real difficulty is that of manning our colleges with first rate men; but I hold it to be the duty of Government, whenever a vacancy occurs, to take every precaution to secure careful selection and not to grudge to men so selected such salaries as may reconcile them to life amidst less congenial surroundings. (Applause.) The financial difficulty can only be overcome by consolidation, *i. e.*, by making the most of available resources at a limited number of well organized institutions instead of frittering them away by supporting a number of second rate establishments. This is the course which can in this Presidency be pursued with regard to legal, medical, and scientific education, because they are represented by only one institution. Government can therefore throw its whole strength into the improvement of the legal, medical and science colleges and make them thoroughly efficient. (Applause.)"

---

Mess rooms, boarding houses, and such other institutions have played an important part in bringing out social harmony and its manifold effects in our domestic circles. In India they are the outcome of the adoption of English manners. The advantages or disadvantages that arise out of them may be well studied in the following description of the 'Mess house.'

"The Mess reflects the style of the regiment. If that is what it ought to be, the Mess is a home where the younger officers receive a social training of the utmost importance, and where they imbibe some of the best traditions of the service. But if, unfortunately, a regiment is fast and fond of silly display, the Mess becomes everything it ought not to be, and leads youngsters into extravagance and debt, the consequences of which sometimes cripple them for life.

"In the Indian army, as our readers are aware, the Mess has always occupied a peculiarly prominent position in regimental life. In pre-Mutiny days, when as yet the railway and the *mem-saheb* were almost equally unknown, it was the social rallying point of every military cantonment. Every body breakfasted, tiffined, and dined there. Those who did not belong to the regiment were honorary members of its Mess, read their papers, and played billiards there, and wagged their heads approvingly as they sipped a glass of the old Maderia, for which it was famous. If any one passed through other stations and modestly put up in the Travellers' Bungalow, he was straightway unearthed and brought over in triumph to enjoy the hospitality of the Mess. It was open house in a way, and yet it was not expensive."

---

## वऱ्हाड.

रा. रा. कृष्णाजी अनंत तहशिलदार चांदूर यांस बाळापुरास कायमचे तहशिलदार नेमले परंतु रा. रा. वामन गणेश यांस कोठें नेमणार आहेत हे अद्याप समजत नाहीं.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे क्लार्क आफ कोर्ट डिपुटी कमिशनर अकोला यांस यवतमाळास आर्क्टिंग तहशिलदार नेमले व त्याप्रमाणें ते तिकडे आजकाल जातील.

मे. सानिटरी कमिशनर येथें आले आहेत आणि मे. कमिशनर साहेब ही येणार आहेत असें ह्मणतात.

मुंबई युनिव्हरसिटीच्या पी. इ. परीक्षेस ६८४ उमेदवार बसले होते त्यां पैकीं २८२ पसार झाले असून त्यांत वऱ्हाडांतील दहा विद्यार्थी आहेत त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:- मोरो केशव दामले, श्रीधर परशराम सोमण, श्रीपाद कृष्ण कोलटकर, कृष्णाजी गोपाळ देशपांडे, खुशाल नारायण पांगारकर, दिनकर जयराम वहाळकर, भास्कर वामन जोशी, गणेश परशराम दातार, एस्. व्ही. चांदेकर, आणि बी. व य. खोलकुटे.

येथील इंग्लिश मराठी शाळेच्या हेडमास्तरचा पगार ७१ रुपये करून त्या जागेवर तळेगांव दशासहस्त्रचे हेडमास्तर रा. रा. विश्वनाथ मोहनीराज धर्माधिकारी यांस कायम केलें आणि त्या जागीं हल्लीं काम करणारे गृहस्थ रा. रा. कृष्णाजी मल्हार पेठणकर यांस येथील ट्रेनिंग कालेजचे अक्टिंग प्रिंसिपाल नेमिलें.

येथील क्लार्क आफ कोर्टच्या १५० पगारावर रा. रा. त्र्यंबक गणेश परांजपे यांस कायम केलें. व रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांस १२५ रुपयावरच ठेऊन त्यांच्या १२० रुपयाच्या जागेवर रा. रा. दामोदर नानाजी यांस कायम केलें आहे. तरी सध्यां रा. रा. परांजपे एलिचपुरास व रा. रा. दामोदर नानाजी हे येथील स्मालकाज कोर्टांत काम पहातील असें ठरलें आहे.

वऱ्हाडचे नामांकित व्याख्यानकार रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं गेल्या ८ वे तारखेस 'हिंदुलोकांच्या बलाबाला' वर यवतमाळास व्याख्यान दिलें. नेहमीं प्रमाणें व्याख्यान मुद्देसुत व विषयास धरून असें नव्हतें. कांहीं सर्व साधारण गोष्टी संबंधानें भाषण झालें आणि तें त्यांच्या आंगच्या वक्तृत्वादी गुणामुळें लोकांस चांगलें पसंत पडलें.

रा. रा. दत्तात्रय रामचंद्र पाटणकर येथील पोस्ट खात्याचे सुपरिंटेंडन्ट आफिसांतील २० रु. चे क्लार्क यांस एक महिन्यासाठीं आक्टींग हेडक्लार्क नेमिलें आहे.

आज पासून सेशन कांहीं कारणानिमित्त येथें सुरू न होतां उमरावतीस होणार आहे.

मि. माणिकशा रतनजी दस्तूर ए. अ. कमि. खामगांव हे दोन तीन दिवसापूर्वी घोड्या वरून खालीं पडले आणि बरेच घायाळ झाले. विहिरींतच पडण्यांची वेळ नेतली होती परंतु ईश्वर कृपेने विघ्न टळलें ही मोठी आनंदाची गोष्ट होय.

रा. रा. बाळकृष्ण काशीनाथ यांच्या रिकाम्या पडलेल्या तहशीलदारी वर रा. रा. गोविंद गंगाधर दामले यांस कायम करून त्यांची सध्या चांदुरास नेमणूक केली आहे.

हारवी सभापतीचे एजंट मि. ए. एस जुमानी हे वार्ड नंबर दोनचे मेंबर निवडले जातील असें समजतें.

---

## वर्तमानसार.

'राष्ट्रीय' सभेच्या मुखत्यारा संबंधानें सर्व व्यवस्था ठेविली जाणार आहे परंतु प्रेक्षकांसाठीं सोयी करण्यास सवड नाहीं आणि त्यांस निराळी पांच रुपये फी पडेल मुखत्यारांस वर्गणी रुपये ८ व भोजन खर्च रुपये १२ असें किमान दर ठेविले आहेत

नवऱ्यास महारोग झाल्यामुळें एका बायकोनें सोडचिठ्ठी देण्याविषयीं आपल्या नवऱ्यास विनंती केली, पण त्यानें ती मान्य केली नाहीं. पंचांच्या मतानें बाईनें पाट लावल्याबद्दल कोर्टांत फिर्याद केली. हा वाद हायकोर्टापर्यंत जाऊन सरतेशेवटीं असा ठराव झाला कीं, महारोग झाला होता तर नवऱ्यानें बायकोस सोडचिठ्ठी न्यायदृष्टीनें द्यावयास पाहिजे होती. पण नवऱ्यानें दिली नाहीं म्हणून बायकोनें दुसरा पाट निरुपायामुळें लावला तर त्यास कांहीं हरकत नाहीं.

टेलिफोनच्या साह्यानें लांबचा ध्वनी ऐकूं येतो हें वाचकांना माहीत आहेच. टेलिफोनचे उत्पादक मि. एडिसन यांणीं आतां त्यांतले त्यांत दुसरी युक्ती शोधून काढली आहे, त्याच्या योगानें बोलणाराचा चेहराही स्पष्ट दृष्टीस पडतो! शेंकडों कोसांवरचा मनुष्य पाहिजे तेंव्हां बोलतो आणि भेटतो तर याहून अधिक तें काय पाहिजे! अजब युक्ती खरी.

कोंकराच्या कातड्याचे हातमोजे म्हणून जे प्रसिद्ध मोजे सर्व इंग्रज लोक वापरीत असतात, ते कोंकराच्या कातड्याचे नसून माणसाच्या कातड्याचे असतात असें बाहेर पडलें आहे!

युरोपियन शेतकऱ्यांची मंडळी—लवकर मुंबईस अशी एक मंडळी स्थापन होणार व ती लोणीपाशीं जमीन घेऊन त्यांत भाजीपाला वगैरे करून व गुरें ढोरें पाळून लोणी व विलायती भाज्या वगैरे समान मुंबईस पुरवील

फ्रान्स देशांत मेंबर होण्यासाठीं मतें मिळविण्याची नवीन युक्ति निघाली आहे. लोकांकडे मुली व स्त्रिया पाठवून मतें गोळा करतात! व या कामासाठीं पुष्कळ तरुण व रूपवती मुली त्या देशांत मिळूं लागल्या आहेत!

आगकाड्यांचा मक्ता सुरू होणार ह्मणतात.

अज्ञाच्या इस्टेटीची व्यवस्था बिन खर्चानें सरकार मार्फत चालविण्याची आजवर वहिवाट असे, त्या वहिवाटींत सरकारानें इस्टेटीच्या संबंधानें फी घेण्याचा नवीन ठराव केला आहे. क. त.

उपाध्यायांचें लग्न—शिकंदराबादेपासून पूर्वेस १५० मैलांवर ३००० बिघे अत्यंत सुपीक व पाणथळ जमीन निजाम साहेबानीं युरेशियन लोक व नेटिव पोरकीं मुलें यांस इनाम दिली. ह्या जमिनी लगत मुबलक जंगल, इमारती बांधण्याचे सामान, दगडी कोळसे व इतर खनिज पदार्थ यांचा संचय आहे. आपल्या दीन गरीब प्रजेची सगळी सोय नकरितां इतरांची सोय करणें म्हणजे घरच्या पोरांची सोय न पाहतां उपाध्यायाचें लग्न करण्या पैकींच प्रकार होय.

काळी गोरी फौज हिंदुस्थानांत आफिसर सुद्धां गोरी ७२,९३२ व काळी १,४५,१७७ मिळून २१७७०९ फौज आहे असें समजतें.

चतुष्पाद पोलिस—सन १८८९ च्या च्या आक्टोबरांत पारिस शहरांतला एक तरुण मनुष्य आपला कुत्रा बरोबर घेऊन एका मजालसीच्या ठिकाणीं गेला. कुत्रा आंत नेऊं नका असें देवडीवरच्या शिपायानें सांगितलें म्हणून कुत्रा पाहऱ्यावर ठेऊन तो मनुष्य आंत गेला. आंत जात आहे तों त्याचें घड्याळ नाहींसें झालें, तेंव्हां परत पाहऱ्यावर येऊन कुत्रा मजबरोबर दिला असतां चोरीस गेलेलें माझें घड्याळ कुत्रा काढील असें त्यानें सांगितल्यावर पाहरेकऱ्यानीं कुत्रा नेऊं दिला. आंत गेल्यावर कांहीं वेळानें कुत्र्यानें चोर पकडला. त्याचा झाडा घेतला. त्यांत ६ घड्याळें त्याजपाशीं निघालीं तीं कुत्र्या पुढें मांडतांच धन्याचे घड्याळ ओळखून तोंडांत धरून कुत्र्यानें धन्यास नेऊन दिलें. हें पाहून सर्व मंडळीस मोठा अचंबा वाटला. शु० सू०

देशरक्षणाकरितां युरोपांतील मोठ मोठीं राष्ट्रें दर माणशीं किती खर्च करितात यांचें एकानें प्रमाण काढलें आहे. रशिया सरासरी ८॥ शिलिंग्स खर्च करितो; आस्ट्रिया सरासरी ८ शिलींग्स; प्रशिया ९शिलिंग्स; इटली १०॥ शिलिंग्स; फ्रान्स १६॥ शिलिंग्स; ग्रेट ब्रिटन सरासरी १७ शिलिंग्स; राष्ट्राच्या उत्पन्नाच्या मानानें जास्त खर्च असा रशियाचच होतो.

अमेरिकन सरकारा जवळ पैसा अतिशय शिल्लक राहिल्या मुळें पुढें कसें काय करावयाचें याचा विचार ते करीत आहेत. विचार कशास पाहिजे. आह्मा गरीब हिंदुस्थान वाशी लोकांस द्या ह्मणजे झालें.

ब्रह्मदेशांत तीन वर्षें ५० लक्ष रुपये रेलवेच्या संबंधानें खर्च करण्याचें ठरलें आहे असें ह्मणतात

अमेरिकेंतील मिसिसिपी प्रांतात कापूस काढून जमा करण्याचें यंत्र नवेंच शोधून काढलें आहे. त्याच्या योगानें स्वच्छ कापूस उचलला जातो. नवीन प्रकारचीं यंत्रें तयार करण्या करितां अजमासें २५ लक्ष रु. भांडवलाचा कारखाना एका मंडळीनें काढला असें ही समजतें.

अमेरिकेंत इंग्रजी भाषेचा एक नवीन कोश तयार होत आहे. त्यांत शब्दसंख्या सर्व कोशाहून जास्त ह्मणजे सुमोर २ लक्षा जवळ येईल व तो कोश तयार करावयाला ९ लक्ष डालर्स ह्मणजे २॥ डालर्स प्रत्येक शब्दामागें खर्च झाला. काय दीर्घ प्रयत्न हा! व केवढा खर्च!!! सु. प.

ताशकंद येथें शेतकीचें प्रदर्शन होणार आहे!

पुढील वर्षीं लंडन मध्यें रेशमाचें प्रदर्शन भरविण्याचा विचार आहे.

एका वाचाळ बाईचे दांत ढिले पडल्यामुळें तिनें, असें होण्याचें कारण काय ह्मणून एका वैद्यास विचारलें. वैद्य ह्मणाला 'बाइ आपल्या दांतावर आपण जिभेचे टोले फार देतां ह्मणून असें झालें आहे, हें निःसंशय होय.

निझामला बुडविणाऱ्या डेकन कंपनीचा निकाल झाला. या कंपनीस पुन्हा निझामच्या राज्यास खाणी खोदण्याचा अधिकार देण्यांत आला. धडधडीत या कंपनीनें दगेबाजी घातला असें माहीत असून व चवकशी अंतीं सिद्ध झालें असूनही जर आमचें सरकार त्याच कंपनीस पुन्हा परवानगी देते तर आमच्या सरकारास लोकांनीं चाराचे वऱ्हाडी कां ह्मणूं नये?

हैद्राबादचे प्रधान नुकतेच मरणाच्या तडाक्यांतून सुटले. यास एकांती गाठून गुदमरून ठार मारण्याचा बेत केला होता असें नुकतेंच बाहेर आलें आहे. चवकशी सुरूं आहे.

चोर चोरी करून पळत असतां त्यांस ठार मारलें असा आरोप करून एका घराच्या मालकावर इंदूर सेशन कोर्टापुढें एक खटला चालू होता त्याचा निकाल होऊन पुरावा पुरा नाहीं असें ठरवुन आरोपितास सोडून दिलें. चोर घरांत शिरले ह्मणजे देवाचें नांव घेत किंवा सरकार मला तार असें ह्मणत स्वस्थ बसावें काय?

हिंदुस्थानचे हितैषी ह्मणून नांवाजलेले मि. सेमूरकी हे गेल्या रविवारीं मुंबईस येऊन हैद्राबादेस निघून गेले. पार्लमेंट उघडण्याच्या वेळीं हजर राहातां येईल अशा बेतानें ते परत विलायतेस जातील. राष्ट्रीयसभेच्या वेळीं हे कोठें असतील?

बनारसच्या महाराजास येत्या १९ व्या तारखेस राज्याभिषेक होणार आहे.

हिंदुस्थान रेलवेसंबंधानें विचार करण्याकरितां एक सिलेक्ट कमिशन नेमावें अशी एक सूचना हल्लीं व्हाइसरायांच्या कौन्सिलांत आली आहे.

यापुढें जे कर्नल असतील त्यांसच ब्रिगडीयर करण्यात येतील असा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

होम सेक्रेटरी मि. म्याकडोनेल हे आठ महिन्याच्या रजेवर जाणार आहेत. जावोत बिचारे.

उतारूंची आगगाडी कलकत्याहून अलाहाबादेस येत असतां मध्यंतरीं निसाळली व कांहीं केल्यानें पुढें न जातां मागें जाऊं लागली. हाकणारावर खटला करण्याचें घाटत आहे.

अन्नाच्या ठिकाणीं पुष्पांचा उपयोग करावा असें वाटत आहे. कित्येक जातीचीं फुलें स्वादिष्ट असून त्यांत शरीरास पुष्टी आणणारें सत्व असतें उदाहरणार्थ मोहाचीं फुलें.

बंगाली बाबूंनीं कमाल केली. कलकत्यास एक रोट्या व साखर पाकाच्या वड्याचा कारखाना सुरूं झाला आहे. त्या ठिकाणीं धार्मिक ब्राह्मण बाबू हे खाण्याचे पदार्थ विकत घेतात.

पारिस शहरांत जों जों प्रदर्शनें होत आहेत तों तों तेथील घरांचा व इतर सर्व पदार्थांची किंमत जास्तच वाढत आहे. एका मनुष्यानें असल्या घरगुती व्यापारावर गेल्या वर्षीं १०,००,००० रुपये नफा मिळविला व यंदा २४,००,००० रुपये मिळतील असा त्याचा अदमास आहे सर्वच जंगी.

पारिस शहरात जो नुकताच एक उंच मनोरा बांधण्यांत आला आहे त्यांत जेव्हां दिवे लावले त्यावेळी ४ लाख लोक तो मीन पाहण्याकरितां जमले होते असें ह्मणतात! ठा० अ०

## अकोलें बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥– |
| ,, १९ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥-- |
| सुवर्ण .... | २३॥ रुपें | | १०८ |
| आळशी खंडीस | ९९ | उडीद | ५५ |
| गहू काठे | ५० | बनशी | ६० |
| जवारी नवी | ४२ | चणे | ५५ |
| बाजरी | ५० सरीं ३॥!= | मेठ | ४८– |
| तुप | ८॥ | तेल | ५॥= |

सऱ्याचे भाव.

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत | संवत १९४६ | ४२ |
| गहू वैशाखशुद्ध | १९४६ | ९६। |
| आळशी चैत्र शुद्ध | १९४६ | ८५। |
| रुई फाल्गुन शुद्ध | १९४६ | ६४॥ |
| सर्की वै. नवे सालाची | १९४६ | ४। |

शु. व.

## जाहिरात.

या जाहिरातीनें खालीं सही करणार याज कडून जाहीर केलें जातें कीं, आह्मी वृद्ध जाहालों आहे व आमचे मरणे जगण्याचा कांहीं भरंवसा नाहीं. आह्मी चार भाऊ, हयाद महमद, व अब्दूल वाहिद, व हाजी अब्दूल रहीमान वा शेख गेंडु, व मी असें आह्मी सर्वांनीं जें संपादन केलें व आपसांत वेगळें जाहालो त्या वेळीं प्रत्येकाचे वाटणीस माल व नगदी मिळून २५०० रुपये आले त्यांस आज अदमासें १४।१५ वर्षें जाहालीं त्या वेळ पासून आम्हीं जातीनें व्यवहार करून आहों व माझीं मुलें चार त्याची नावें लिहिलें प्रमाणें शाहामहंमद, बिसमिला, रसुल, ईसब, हे च्यार मुलगे माझे समक्ष आपआपला वेगळा धंदा करून आपली उपजीविका करीत होते व आहेत मी मक्केशरीफला जाते वेळेस जो माझी स्वतः स्थावर व जंगम मिळकत ती च्यार पंचा समोर व माझे भाऊबंदा समोर प्रत्येक मुलास जिनगी व स्थावर जंगम मिळुन पाचशे पाचशे रुपये मी वाटून दिल्हे व ह्या सर्वांचीं लग्नें मी जातीनें करून दिलीं व माझ्या मुली पांच. त्यात येका खटल्या पासून च्यार मुली व येका खटल्या पासून १ मुलगी ह्या सर्वांचीं लग्नें व कर्यें मी जातीनें केली व ज्यांचे त्यांस मी वाटून दिल्हें. याजवर मुलांचा वगैरे हक्क नाहीं व राहिलेले रुपये मी मक्केस जाते वेळीं बरोबर ४०० च्यारशे रुपये नेले व धर्म केला व खर्च झाला बाकी दुकानांत माझे कुटुंबा वडील दागदागीनें अदमासे रुपये ६०० चे हे मी ठेऊन गेलो होतो जाते वेळीं पंचास सांगुन गेलो कीं मी मक्केहून मेलोतर सदर्हू दागीने माझे वडील मुला जवळ आहेत ते सर्वांस सारखे वाटून द्यावे. मी परत आले. व सदर्हू दागीने मुला पासून घेऊन त्याज बद्दल पंचा समोर पावती दिली व मी धंदा करित आहे. व कांहीं त्यातून मेहुन खाल्ले हल्ली माझे पाशीं कांहीं ज्यास्ती जिनगी वगैरे बीलकुल नाहीं. वडील मुलावर बाकीची माझी तीन मुलें विनाकारण ज्यास्ती पैशा बद्दल भांडण करीतात तर ह्यात कांहीं चांगले नाहीं ज्यास कांहीं विचार पुस करणें असेल त्यानीं पंचा मारफत अगर जातीनें मजला येक महीन्याच्या आंत विचारावें. व वडील मुलाकडे कांहीं नाहीं. कळावें. ता० १२–१२–८९

(सही) हाजी मालिकजी वल्लद गेंडु कागजी राहणार बाळापूर.

हें पत्र अकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ... १८
किरकोळ अंकास.........................०४
नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस .........०१

Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4as
Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIII AKOLA MONDAY 23 DECEMBER 1889 NO 49

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख २३ माहे दिसेंबर सन १८८९ अंक ४९

### वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा सतरावा समारंभ

सर्वांस विनय पूर्वक कळविण्यांत येतें कीं शहर उमरावती येथें या सभेचा समारंभ शुक्रवार तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८९० रोजीं ... होणार आहे समारंभाची जागा पुढें कळविण्यांत येईल.

चालू सालीं भाषणा करिता तीन विषय नेमले आहेत

विषय १ —आयुष्यांतील सुखाविषयीं हिंदुलोकांचे व पाश्चिमात्य लोकांचे काय विचार आहेत व या संबंधानें पाश्चिमात्य लोकांचें अनुकरण केलें असतां आपल्याला कितपत हितावह होईल.

विषय २ रा— इंग्रजलोक सुधारणुकीचे संबंधानें युरोपांतील इतर राष्ट्रां पेक्षां पुढें सरसावले आहेत त्यांची अठरावे शतकांत काय स्थिति होती याचें निरूपण करून हल्लींच्या त्यांच्या भरभराटाचीं मुख्य कारणें कोणतीं आहेत तीं सांगावीं. + टीप शेवटीं पहा.

विषय ३ रा — गेल्या राष्ट्रीय सभेंत यूल साहेबांनीं जें भाषण केलें आहे त्यासर्व भाषणाचा सारांश आपण यूल साहेब आहों अशी वक्त्यानें कल्पना करून श्रोत्यांना समजेल अशा रीतीनें सांगावा.

बक्षिसें— पहिल्या विषयाला पहिल बक्षिस रुपये ३० चें व दुसरें रुपये १५ चें ठेविलें आहे.

दुसऱ्या विषयास एकच बक्षिस रुपये ३० चें ठेविलें आहे. तिसऱ्या विषयास एकच बक्षिस रुपये १५ चें ठेविलें आहे.

( १ ) उमेद वाराचें वय १८ वर्षांहून कमी नसावें.

( २ ) प्रत्येक उमेदवाराचें भाषण अर्ध्या तासांत संपण्या जोगें असावें परंतु योग्य वाटल्यास अर्ध्या तासा पूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा अधीक वेळ पर्यंत चालूं ठेवण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

( ३ ) कोणी उमेदवार कोणाहि व्यक्तीस अनुलक्षून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील किंवा बीभत्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल

( ४ ) प्रत्येक उमेदवारानें आपलें भाषण लिहून सभेच्या सेक्रेटरी जवळ आणून दिल्या शिवाय त्यास भाषण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं.

( ५ ) नेमिलेल्या विषयांपैकीं एकाच विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे.

( ६ ) भाषण करण्यास येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८९० इसवीचे आंत सेक्रेटरी कडे उमरावती शहर लापत्ररीचे पत्त्यावर पाठवावे आणि समारंभाच्या पूर्वदिवशीं सेक्रेटरीस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणा गृहस्थाची इच्छा असल्यास त्यांस सवडी प्रमाणें परवानगी देतां येईल..

× टीप — दुसऱ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांनीं ग्रीन साहेब यांनीं केलेल्या इंग्लंड देशाचे इतिहासांतून माहिती मिळवावी.

| | |
|---|---|
| उमरावती तारीख १३ माहे दिसेंबर | नारायण काशीनाथ दाते बि. ए. सिताराम सदाशिव चितळे. व. व. सभेचे सेक्रेटरी. |

सन १८८९ इ०

### पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

खामगांव ता० १७।१२।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

सलाम दिगर, आपली फार दिवसांत मुलाखत झाली नाहीं. मी नुकताच मुंबईहून आलों आहे तर इकडील नवल विशेष विदित करीत आहे तें प्रसिद्ध करण्याचें योग्य वाटल्यास मर्जीनुरूप तजवीज व्हावी.

इंग्रजी अंमल हिंदुस्थानांत सुरू झाल्यापासून लोकांस स्वतंत्रपणा दिवसेंदिवस अधिकाधिक मिळत आहे त्याप्रमाणें वऱ्हाड प्रांत मुलुख असफी हैदराबाद या नावानें मोडूं लागल्यापासून आमच्या लोकांस त्याची थोडी बहुत गोडी लागत चालली आहे, सार्वजनिक कामांत पुढारीपण घेण्यास लोक तयार होत आहेत, कोणत्याही खात्यांत मनुष्याच्या योग्यते प्रमाणें तो महत्वास चढत असतो, लायक व नालायक मनुष्यांची चांगली निवडा निवड होत असते इत्यादि अनेक लाभ आपण उपभोगीत आहों व त्याबद्दल आही आपल्या सरकारचे फारफार ऋणी आहों.

खानदानींतल्या लोकांस सरकार मोठमोठे अधिकार देऊन त्यांचीं मनें लोक कल्याणाकडे वळवितें. त्यांचा मान मरातब ठेवण्याच्या सरकारानें अनेक युक्ती लढविल्या आहेत त्या चांगल्या आहेत तथापि मनुष्यांची निवड योग्य होत नसल्यामुळें त्यांचा दुरुपयोग होत असल्याचीं ही उदाहरणें लोकांसमोर अनेक आहेत तेव्हां मला लिहिणें नको. सार्वजनिक कामें चालविण्याचे अधिकार म्युनिसिपालिटींतल्या सभासदांस देण्याचा सरकारनें कृतसंकल्प केला व त्याप्रमाणें ते वर्तन ही ठेवितात. शिवाय राजकीय अधिकार ही थोर गर्भश्रीमान सुशील कुलीन अशा लोकांस देण्यास सरकार पुढें पाऊल टाकीत आहे. असल्याच प्रकारचा अधिकार स्पेशल माजिस्ट्रेटचा आहे. लोकांचो चाकरमाणी, हुशारी, तरतेजपणा, मोठमोठीं राजकीय कामें आपल्या शिरावर घेण्याची लोकांस हौस, व तरतरी वगैरे गुण पाहून सरकार हेही छोटेखानी अधिकार पुढें मागें वाढवील आणि लोक सत्तेचें प्राबल्य वाढविण्यास सरकार तयार होईल अशी अलीकडे उमेद येत आहे.

हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचा भार लोकांवर सोपविण्याचा कल सरकारचा आहे त्याप्रमाणें आमच्या वऱ्हाड प्रांतांत ही स्पेशिअल माजिस्ट्रेट नेमिलेले माझ्या दोस्त मंडळींत आहे हें कळविण्यास मला आनंद वाटतो. परंतु मी मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे कीं स्पेशल माजिस्ट्रेटच्या अधिकारांचीं वस्त्रें देतेवेळीं सरकार मनुष्याची अब्रु इज्जत, भारदस्तपणा इत्यादि गुणांकडे काना डोळा करितें व कित्येक प्रसंगीं शिफारसीवर लोक हुद्देवाले बनतात. अशा गोष्टी पुष्कळ डोळ्या समोर आहेत व वर्तमानपत्रांतून त्या प्रकरणांत लेख ही आले आहेत तरी सरकारातून न्याय ह्मणून अन्याय होत आहे व लोक कल्याण ह्मणून लोकांस त्रास होत आहे या गोष्टीकडे सरकार लक्ष पुरवील तर मी हें लिहिल्याबद्दल फार समाधान पावेन.

अलीकडचें एक उदाहरण घ्या मी असें ऐकतों कीं अकोटच्या स्पेशल माजिस्ट्रेटाच्या बेंचाचे अधिकार कमी करण्यांत आले आहेत. कारण खरें काय असेल तें बाहेर आलें नाहीं. तरी एकोपा नाहीं, एकमेकाच्या सल्लामसलतीनें कामें चालून लोकांस न्याय मिळत नाहीं व लोकांवर जुलूम होतो वगैरे कारणें थोड्या बहुत प्रकारानें असावींत असा अंदाज आहे.

मला असें वाटतें कीं स्पेशिअल माजिस्ट्रेटचे अधिकार देताना मुख्य चूक ही होते की मनुष्याच्या योग्यतेची परीक्षा यथार्थ चांगली होत नाहीं. आपणास माहीत आहे कीं खामगावांस शेट पुरणमल यांना फार दिवस झाले नाहींत तोंच खामगावचे बेंच माजिस्ट्रेट झाले. एकाला अधिकार नीट चालवितां येईना म्हणून किंवा काम फार जबरदस्त झालें म्हणून हें सांगण्यास मला पक्की माहिती नाहीं शेट पुरणमल हे थोडेबहुत शिकलेले आहेत तरी अनुभव कातो आहे, वयस्क नाहींत तेव्हां विचार ही प्रगल्भ नसतील असे, अशा अनेक गोष्टी लक्षांत न घेतल्यामुळें लोकांचा फायदा ह्मणण्यासारखा विशेष होत नाहीं. तसेंच खामगांवचे बेंचामध्यें दुसरे माजिस्ट्रेट रा. रा अबाराव जानराव आहेत. त्यांच्या विद्वत्तेची मला माहिती नाहीं, वय ही फार मोठें नाहीं. घराणें मात्र मोठें आहे. लोकांचें म्हणणें या उभयतां संबंधानें असें पडतें कीं हे होतकरू आहेत आणि हे चांगल्या वळणीं लोकांच्या सल्ल्यानें वागतील तर नांवालौकीकास चढतील असा तर्क आहे. तिसरे माजिस्ट्रेट खानसाहेब भोलेखान आहेत. हे खान साहेब आहेत तेव्हां सर्व गुणांचा खजिना येथें असावा परंतु त्यानांचें लक्ष आपल्या कामाकडे असावें तसें नसतें. दक्षता व पैरवी हे गुण मे. भोलेखानाच्या अंगी येण्यास कांहीं दिवस आणखी अभ्यास पाहिजे आहे. खानसाहेब प्रालब्धाच्या बळावर वैभवास चढले आहेत. तेव्हां त्यांना श्रीमंती गरीबी विचार दोन्ही माहीत आहेत यांचा पिढीजादा संबंध नबाब घराण्याशीं आहे असें ह्मणतात. लोककल्याणाच्या तालमींत यांस कांहीं वर्षें परिश्रम केल्यानंतर माजिस्ट्रेट नेमिलें असते तर लोकांचा फारफार फायदा झाला असतां इतकेंच नव्हे तर प्रस्तुतच्या बेंचामध्यें ते पेशवा बनले असते परंतु योगायोग नाहीं. खानसाहेब डेपुटी कमिशनरच्या कचेरींत कारकून होते परंतु थोडे दिवस असल्यामुळें अगामध्यें कर्तबगारी लहान कामापासून थोर कामापर्यंत यावी तितकी नाहीं. रजपूत मुसलमान झाल्याच्या उदाहरणांत हे गृहस्थ येतील. भोलेखानाचें किबले लालसिंग होते ते लालखान बनले असें सांगतात. याचें कारण बाळापूरचे नबाब जलालखां यांच्या घराण्याशीं त्यांच्या वरच्या मंडळीचा फार घरोब्याचा संबंध होता असें बोलतात. एकंदरींत खानसाहेब भोलेखानानी मोठमोठ्या राहशाती पाहिल्या आहेत, त्यांस उच्चनीच स्थिती माहित आहेत तरी त्यांच्या अंगीं स्पेशल माजिस्ट्रेट अंमल सुयंत्र चालविण्यास अधिक निराळ्या प्रकारचा दुरदर्शीपणा व लोकांवर आपलें वजन बसविण्याचा गुण असतां तर फार बरें होतें. तरी भी सांगतों कीं नाउमेद असण्याचें कारण नाहीं; काम करितां करितां अनुभव येत जाईल तसतसे ते लोकांस विशेष आवडतील. चवथे, माजिस्ट्रेट मि. सिकांदर हे युरोपियन आहेत तेव्हां त्यास आमच्या लोकांची माहिती चांगली नाहीं आणखी पुष्कळ गोष्टी त्यांच्या संबधानें ऐकतो. मी सध्या बरें वाईट कांहींच लीहीत बसत नाहीं. माझ्या पहाण्यांतली एक दोन उदाहरणें मी आपणाकडे धाडिली आहेत, आणखी या स्पेशल माजिस्ट्रेटच्या प्रकरणांत साही जिल्ह्यांतली मला माहिती कळेल ती खरी खोटी पाहून आपल्यास लिहीन कळावें

आपला

'औट घटकेचा न्यायाधीश'

वऱ्हाडसमाचार.

मिति पौष शुद्ध १ शके १८११

### वऱ्हाडांतील व्यापार

( सन १८८८-८९ सालाबद्दल रिपोर्ट )

( ४७व्या अंकाहून पुढें चालूं. )

व्यापारा संबंधानें वऱ्हाडची मुख्य शिफारस काय ती पिकें चांगलीं येतात. शेतकी

सालअखेर ............ ५८

किरकोळ अंकास........................०४

नोटीशीबद्दल.

१० ओळीचे आंत रु० १

पुढें दर ओळीस ०।०६

दुसरे खेपेस ........०१

Single copy..............................4as

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4as
Repetition per line3as

THE BERAR SAMACHAR

VOL XXIII — AKOLA MONDAY 23 DECEMBER 1889 — NO 49

वर्ष २३ — अकोला सोमवार तारीख २३ माहे दिसेंबर सन १८८९ — अंक ४९

## वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा सतरावा समारंभ

सर्वांस विनय पूर्वक कळविण्यांत येयें कीं शहर उमरावती येथें या सभेचा समारंभ शुक्रवार तारीख २१ माहे फेब्रुवारी सन १८९० रोजीं ४ ॥ होणार आहे समारंभाची जागा पुढें कळविण्यांत येईल.

चालू सालीं भाषणा करिता तीन विषय नेमले आहेत

विषय १ —आयुष्यांतील सुखाविषयीं हिंदुलोकांचे व पाश्चिमात्य लोकांचे काय विचार आहेत व या संबंधानें पाश्चिमात्य लोकांचें अनुकरण केलें असतां आपल्याला कितपत हितावह होईल.

विषय २ रा— इंग्रजलोक सुधारणुकीचे संबंधानें युरोपांतील इतर राष्ट्रा पेक्षां पुढें सरसावले आहेत त्यांची अठरावे शतकांत काय स्थिति होती याचें निरूपण करून हल्लींच्या त्यांच्या भरभराटाचीं मुख्य कारणें कोणतीं आहेत तीं सांगावीं. + टीप शेवटीं पहा.

विषय ३ रा — गेल्या राष्ट्रीय सभेंत यूल साहेबांनीं जें भाषण केलें आहे त्यासर्व भाषणाचा सारांश आपण यूल साहेब आहों अशी वक्त्यानें कल्पना करून श्रोत्यांना समजेल अशा रीतीनें सांगावा.

बक्षिसें— पहिल्या विषयाला पहिलें बक्षिस रुपये ३० चें व दुसरें रुपये १५ चें ठेविलें आहे.

दुसऱ्या विषयास एकच बक्षिस रुपये ३० चें ठेविलें आहे. तिसऱ्या विषयास एकच बक्षिस रुपये १५ चें ठेविलें आहे.

( १ ) उमेदवाराचें वय १८ वर्षांहून कमी नसावें.

( २ ) प्रत्येक उमेदवाराचें भाषण अर्ध्या तासांत संपण्या जोगें असावें परंतु योग्य वाटल्यास अर्ध्या तासा पूर्वींच भाषण बंद करण्याचा किंवा अधीक वेळ पर्यंत चालूं ठेवण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

( ३ ) कोणी उमेदवार कोणाही व्यक्तीस अनुलक्षून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील किंवा बीभत्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यांत येईल

( ४ ) प्रत्येक उमेदवारानें आपलें भाषण लिहून सभेच्या सेक्रेटरी जवळ आणून दिल्या शिवाय त्यास भाषण करण्याची परवानगी दिली जाणार नाहीं.

( ५ ) नेमिलेल्या विषयांपैकीं एकाद विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे.

( ६ ) भाषण करण्यास येणाऱ्या उमेदवारांनीं आपलें अर्ज तारीख १५ माहे फेब्रुवारी सन १८९० इसवीचे आंत सेक्रेटरी कडे उमरावती शहर लायब्ररीचे पत्यावर पाठवावे आणि समारंभाच्या पूर्वदिवशीं सेक्रेटरीस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणा गृहस्थाची इच्छा असल्यास त्यांस सवडी प्रमाणें परवानगी देतां येईल..

× टीप — दुसऱ्या विषयावर भाषण करणाऱ्या उमदवारांनीं श्री. साहेब यांनीं केलेल्या इंग्लंद देशाचे इतिहासांतून माहिती मिळवावी.

| | |
|---|---|
| उमरावती तारीख १३ माहे दिसेंबर | नारायण काशीनाथ दाते बि. ए. सिताराम सदाशिव चितळे. व. व. सभेचे सेक्रेटरी. |

सन १८८९ इ०

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

खामगांव ता० १७।१२।८९

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

सलाम दिगर, आपली फार दिवसांत मुलाखत झाली नाहीं. मी नुकताच मुंबईहून आलों आहे तर इकडील नवल विशेष विदित करित आहे तें प्रसिद्ध करण्याचें योग्य वाटल्यास मर्जीनुरूप तजवीज व्हावी.

इंग्रजी अमल हिंदुस्थानांत सुरू झाल्यापासून लोकांस स्वतंत्रपणा दिवसेंदिवस अधिकाधिक मिळत आहे त्याप्रमाणें वऱ्हाड प्रांत मुलुख अमानी हैदराबाद या नावानें मांडू लागल्यापासून आमच्या लोकांस विचेची गोडी बहुत गोडी लागत चालली आहे, सार्वजनिक कामांत पुढारीपण घेण्यास लोक तयार होत आहेत, कोणत्याही खात्यांत मनुष्याच्या योग्यते प्रमाणें तो महत्वास चढत असतो, लायक व नालायक मनुष्यांची चांगली निवडा निवड होत असते इत्यादि अनेक लाभ आपण उपभोगीत आहो व त्याबद्दल आह्मी आपल्या सरकारचे फारफार ऋणी आहों.

खानदानींतल्या लोकांस सरकार मोठमोठे अधिकार देऊन त्यांचीं मनें लोक कल्याणाकडे वळवितें. त्यांचा मान मरातब ठेवण्याच्या सरकारानें अनेक युक्ती लढविल्या आहेत त्या चांगल्या आहेत तथापि मनुष्यांची निवड योग्य होत नसल्या मुळें त्यांचा दुरुपयोग होत असल्याचीं हीं उदाहरणें लोकांसमोर अनेक आहेत तेव्हां मला निराळे लिहिणें नको. सार्वजनिक कामें चालविण्याचे अधिकार मुनसिपालिटींतल्या सभासदास देण्याचा सरकारनें कृतसंकल्प केला व त्याप्रमाणें ते वर्तन ही ठेवितात. शिवाय राजकीय अधिकार ही थोर गर्भश्रीमान सुशील कुलीन अशा लोकांस देण्यास सरकार पुढें पाऊल टाकीत आहे. असल्याच प्रकारचा अधिकार स्पेशल माजिस्ट्रेटचा आहे. लोकाचा वाकबगारी, हुशारी, तरबेजपणा, मोठमोठीं राजकीय कामें आपल्या शिरावर घेण्याची लोकांस हौस, व तरतरी वगैरे गुण पाहून सरकार हेही छोटेखानी अधिकार पुढें मागें वाढवील आणि लोक सत्तेचें प्राबल्य वाढविण्यास सरकार तयार होईल अशी मलाकडे उमेद येत आहे.

हिंदुस्थानांतील राज्यकारभाराचा भार लोकांवर सोपविण्याचा कल सरकारचा आहे त्याप्रमाणें आमच्या वऱ्हाड प्रांतांत ही स्पेशिअल माजिस्ट्रेट नेमिलेले माझ्या दोस्त मंडळींत आहे हें कळविण्यास मला आनंद वाटतो. परंतु मी मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे कीं स्पेशल माजिस्ट्रेटच्या अधिकारांचीं वस्त्रें देतेवेळी सरकार मनुष्याची अक्कल हुशारी, भारदस्तपणा इत्यादि गुणाकडे काना डोळा करितें व कित्येक प्रसंगीं शिफारसीवर लोक हुद्देवाले बनतात. अशा गोष्टी पुष्कळ डोळ्या समोर आहेत व वर्तमानपत्रांतून त्या प्रकरणांत लेख ही आले आहेत तरी सरकारातून न्याय ह्मणून अन्याय होत आहे व लोककल्याण ह्मणून लोकांस त्रास होत आहे या गोष्टीकडे सरकार लक्ष पुरवील तर मी हें लिहिल्याबद्दल फार समाधान पावेन.

अलीकडचें एक उदाहरण घ्या मी असें ऐकतों कीं अकोटच्या स्पेशल माजिस्ट्रेटाच्या बेंचाचे अधिकार कमी करण्यांत आले आहेत. कारण खरें काय असेल तें बाहेर आलें नाहीं. तरी एकोपा नाहीं, एकमेकाच्या सल्लामसलतीनें कामें चालून लोकांस न्याय मिळत नाहीं व लोकांवर जुलूम होतो वगैरे कारणें थोड्या बहुत प्रकारानें असावीत असा अंदाज आहे.

मला असें वाटतें कीं स्पेशिअल माजिस्ट्रेटचे अधिकार देतांना मुख्य चूक ही होते कीं मनुष्याच्या योग्यतेची परीक्षा यथार्थ चांगली होत नाहीं. आपणास माहीत आहे कीं खामगावांस शेट पुरणमल यांस फार दिवस झाले नाहींत तोंच खामगावचें बेंच माजिस्ट्रेट झालें. एकाला अधिकार नीट चालवितां येईना म्हणून किंवा काम फार जबरदस्त झालें म्हणून हें सांगण्यास मला पक्की माहिती नाहीं शेट पुरणमल हे थोडबहुत शिकलेले आहेत तरी अनुभव कोता आहे, वयस्क नाहींत तेव्हां विचार ही प्रगल्भ नसतील असे, अशा अनेक गोष्टी लक्षांत न घेतल्यामुळें लोकांचा फायदा ह्मणण्यासारखा विशेष होत नाहीं. तसेंच खामगांवचे बेंचामध्यें दुसरे माजिस्ट्रेट रा. रा अन्नाराव जानराव आहेत. ह्याच्या विद्वत्तेची मला माहिती नाहीं, वय ही फार मोठें नाहीं. घराणें मात्र मोठें आहे. लोकांचें म्हणणें या उभयतां संबंधानें असें पडतें कीं हे होतकरू आहेत आणि हे चांगल्या वोरणीं लोकांच्या सल्ल्यानें वागतील तर नांवालौकीकास चढतील असा तर्क आहे. तिसरे माजिस्ट्रेट खानसाहेब भोलेखान आहेत. हे खान साहेब आहेत तेव्हां सर्व गुणांचा खजिना येथें असावा परंतु त्यांचें लक्ष आपल्या कामाकडे असावें तसें नसतें. दक्षता व पैरवी हे गुण मे. भोलेखानाच्या अंगी येण्यास कांहीं दिवस आणखी अभ्यास पाहिजे आहे. खानसाहेब प्रालब्धाच्या बळावर वैभवास चढले आहेत. तेव्हां त्यांना श्रीमंती गरीबी विचार दोन्हीही माहीत आहेत यांचा पिढीजादा संबंध नबाब घराण्याशी आहे असें ह्मणतात. लोककल्याणाच्या तालमींत यांस कांहीं वर्षें परिश्रम केल्यानंतर माजिस्ट्रेट नेमिलें असते तर लोकांचा फारफार फायदा झाला असतां इतकेंच नव्हे तर प्रस्तुतच्या बेंचामध्यें ते पेशवा बनले असते परंतु योगायोग नाहीं. खानसाहेब डेपुटी कमिशनरच्या कचेरींत कारकून होते परंतु थोडे दिवस असल्यामुळें अगामध्यें कर्तबगारी लहान कामापासून थोर कामापर्यंत यावी तितकी नाहीं. रजपूत मुसलमान झाल्याच्या उदाहरणांत हे गहस्थ येतील. भोलेखानाचें किंबळे लालसिंग होते ते लालखान बनले असें सांगतात. याचें कारण बाळापूरचे नबाब जलालखा यांच्या घराण्याशीं त्यांच्या वरच्या मंडळीचा फार घरोब्याचा संबंध होता असें बोलतात. एकंदरींत खानसाहेब भोलेखानानी मोमोठ मोठ्या राहशती पाहिल्या आहेत, त्यांस उच्चनीच स्थिती माहित आहेत तरी त्यांच्या अंगीं स्पेशल माजिस्ट्रेट अमळ सुयंत्र चालविण्यास अधिक निराळ्या प्रकारचा दुरदर्शीपणा व लोकांवर आपलें वजन बसविण्याचा गुण असतां तर फार बरें होतें. तरी भी सांगतों कीं नाउमेद असण्याचें कारण नाहीं; काम करितां करितां अनुभव येत जाईल तसतसे ते लोकांस विशेष आवडतील. चवथे, माजिस्ट्रेट मि. गिकांडर हे युरोपियन आहेत तेव्हां त्यास आमच्या लोकांची माहिती चांगली नाहीं आणखी पुष्कळ गोष्टी त्यांच्या संबंधानें ऐकतो. मी सध्या बरें वाईट कांहींच लीहीत बसत नहीं. माझ्या पहाण्यांतली एक दोन उदाहरणें मी आपणाकडे धाडिली आहेत, आणखी या स्पेशल माजिस्ट्रेटच्या प्रकरणांत साही जिल्ह्यांतली मला माहिती कळेल ती खरी खोटी पाहून आपल्यास लिहीन कळावें

आपला

'औट घटकेचा न्यायाधीश'

वऱ्हाडसमाचार.

मिति पौष शुद्ध १ शके १८११

## वऱ्हाडांतील व्यापार

( सन १८८८-८९ सालाबद्दल रिपोर्ट )

( ४७व्या अंकावरून पुढें चालूं. )

व्यापारा संबंधानें वऱ्हाडची मुख्य शिफारस कापसाची पिकें चांगलीं येतात. शेतकी

उत्पन्नाचे निव्वळ हंगाम पलिकडे किंवा त्या उत्पन्नाच्या विल्हेवाटी पलिकडे वऱ्हाडांत ह्या रयतेस इतर व्यापार मुख्यत्वें करून माहित नाहींत ह्मटलें तरी चालण्या सारखें आहे. परंतु ही ओरड सर्व हिंदुस्थाना संबंधानें आहे तेव्हां तूर्त त्याचा विचार करणे नलगे. रिपोर्टच्या वर्षी लागवडीची जमीन ६४६९५०४ एकर होती त्यांत मागील साला पेक्षां ३२८७६ एकर जास्त जमीन उपयोगांत आली. गहूं बाजरी वगैरे धान्यें व कापूस, तंबाखू भाजी पाला मिळून शेतीचें उत्पन्न २०२१८७६७ मण या वर्षी झालें त्यांत सालगुदस्तापेक्षां जास्ती उत्पन्न येण्यास मुख्य ज्वारी आणि कपाशी ही दोन्ही खरिपाची पिकें चांगली आली. त्यामुळें लोकांच्या जवळ ज्वारी व गहूं इत्यादिकांचा दाणागोटा बराच सांठलेला आहे ही गोष्ट आनंद मानण्या सारखी होय तरी शेतकऱ्या पाशीं किती धान्य शिलकेंत आहे याची नक्की मोजदाद नाहीं व ती असण्याविषयीं सरकार तर्फे ही कांहीं खटपट दिसून येत नाहीं. बाहेर प्रदेशी वऱ्हाडचा माल अतोनात जाऊं लागल्यामुळें अलीकडे धान्याचे भाव फार भारी असतात ते भाव पिकाच्या मानानें ह्मणण्या सारखे उतरत नाहींत; व हंगाम चांगला साधला तरी गोरगरिबांचा पेंच कमी होत नाहीं, व सुवस्तुचा उपभोग त्यांस आनंदानें घेता येत नाहीं. अक्षय्य महर्गता रहात गेल्यामुळें गरिबांच्या कबाड कष्टाचें फळ चार पैसे गाठीं पाडण्यासारखें मिळत नाहीं. या प्रांतीं तांदुळ पुष्कळ पिकत नाहीं व कांहीं थोडा पिकतो तो अगदीं मध्यम प्रतीचा असतो त्यामुळें नागपूर प्रांतांतून बहुतेक तांदुळ वऱ्हाडांत येतो. किती जमिनीची लागवड होते, पडीत किती राहते, आणि शेतकऱ्यापाशीं धान्य किती शिलकींत पडतें, इत्यादि आंकडे पटवारी लोकाकडून मिळतात. आंकडे खरेखोटे आहेत याचा निर्णय करण्यासाठीं मुनसरीम तहशिलदार वगैरे अधिकाऱ्यांच्या फेर तपासणी ही होतात तरी कमिशनर साहेबांचें असें ह्मणणें पडतें कीं ही आकड्यांची माहिती भरवंसा ठेवण्यासारखी मिळत नाहीं त्याचें कारण असें लिहितात कीं कुणबी लोक सारा वाढेल किंवा कर व इतर पट्या वाढतील या भितीनें खोटी ही माहिती देण्यास चुकत नाहींत. रिपोर्टच्या सालीं धान्याचे दर गुदस्त साला प्रमाणेंच कायम होते असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

या प्रांताचा मूळ व्यापार निव्वळ शेतीच्या उत्पन्नावर अवलंबून असल्या मुळें बाहेर प्रदेशीं जाणाऱ्या मालाचें प्रमाण वार्षिक पीकपाण्या वरून नियमित असतें. शिवाय आमच्या लोकांच्या गरजा लहान सहान व थोड्या असल्या कारणानें बाहेरून येणारा हा माल माफक असतो. बाहेरून या सालीं माल कमी आला म्हणजे २६,४१,३३६ मण वजनाचा माल सुमारें १,५७,६९८३२ रुपये किंमतीची वऱ्हाडांत व्यापारा साठीं आला होता. रब्बीच्या पिकाचा आंकडा सन १८८९ तील मार्च अखेर मिळत नसल्या मुळें रब्बीच्या पिकाची बाब या रिपोर्टांत नमूद करितां आली नाहीं. वऱ्हाडांतून बाहेर माल गेला त्याचें वजन पूरे ४,७६,३७७ मण होतें आणि त्याची किंमत २,५८,९४,३१९ रुपये झाली आहे वरील आंकड्या वरून हे लक्ष्यांत येईल कीं पाऊणदोन पट्टी जवळ गेलेल्या मालाचे आल्या मालाशीं प्रमाण पडतें. वरील बाहेर गेलेल्या मालांत तीनचतुर्थांश माल मुंबईस रवाना झाला आहे.

## सेशन खटले

नेहमी प्रमाणें ता. १६ ते २९ पर्यंत अकोलें येथें सेशन भरणार होतें परंतु कांहीं अडचणी मुळें सेशन अकोल्यास न भरता उमरावतीस भरलें त्या मुळें सर्व साक्षीदार लोकांस व कैद्यांस उमरावतीस जावें लागलें व सेशन ही १६ व्या तारखेस सुरु व्हावयाचें तें १७ वीला सुरु झालें. या सेशन मध्यें एकंदर ३ मुकद्दमे नेमिले होते. पैकीं दोन वाशीम जिल्ह्यांतील होते व एक बुलढाणें जिल्ह्यांतील होता. वाशीम जिल्ह्यांतील दोन्ही मुकद्दमे बाळहत्या बद्दल होते. त्यात आरोपिनीं हरामाचे पोट आणून मुल पैदा होतांच मारून टाकलें असा त्याजवर आरोप होता. बुलढाणें जिल्ह्यांतील मुकद्दमा स्त्री वधाचा ह्मणजे आरोपिनें आपल्या रांडेचा प्राण घेतला ह्मणून त्याजवर आरोप होता. वाशिम जिल्ह्यांतील दोन्हीं ही आरोपी ता. १७ रोजी सुटले. बुलढाणे यथील सेशनाचा ता. १८ रोजी निकाल झाला. आरोपी दोष मुक्त ठरला. हे दोन्ही खटले पुरावाच नाहीं ह्मणून सुटले. ह्या पैकीं मेहकर व वाशीम येथील तुळसीचा खटला हे कमीटच केले नसतें तर बरें झालें असतें.

सेशन कोर्टांत मुकद्दमा येई पर्यंत कैद्याला आधीं बरीच शिक्षा भोगावी लागत असते व साक्षीदार लोकांना ही बराच त्रास सोसावा लागतो इतकेंच नाहीं तर सरकारला हो पैशाची बरीच झीज लागलेली असते. हा सर्व त्रास देणें व सरकारला खर्चांत घालणें केवळ पोलीस लोकांच्या व कमिटिंग माजिस्ट्रेटच्या शहाण पणावर व विचारावर बरेच अंशीं अवलंबून आहे. गुन्हा पत्यांत आणणें हें काम पोलीस लोकांचें आहे. व एकदा पत्यांत आल्यावर त्यांतील पुरावा सेशन कोर्टांनीं भरंवसा ठेवल्यास कायदेशीर रितीनें आरोपीस दोषास पात्र ठरविण्या पुरता आहे किंवा नाहीं हें पाहण्याचें काम माजिस्ट्रेट लोकांचे आहे. व ते लोक आपले कर्तव्य चांगले बजावितात किंवा नाहीं हें अशा प्रकारच्या निकाला वरून सहज कळून येईल. पोलीस लोक किंवा माजिस्ट्रेट लोक ज्या कायद्याचा उपयोग करितात किंवा ते करित असतील असें आह्मी अनुमान करितों त्याच कायद्याचा उपयोग सेशन कोर्ट करितें तर मग इतका फरक का बरें पडावा! कदाचित दुसऱ्या एखाद्या कारणावरून मुकद्दमा सुटला तर त्याचा दोष पोलीसावर किंवा माजिस्ट्रेटावर येऊ शकणार नाहीं परंतु आरोपी लोकांचे जबाब कायदेशीर कबूल जबाब नाहींत किंवा पुरावा पुरेसा नाहीं या वरून जर आरोपी सुटतात तर विनाकारण कमिट केल्या बदलचा दोष कोणाला द्यावा! माजिस्ट्रेट शिवाय दुसऱ्याला देता येईल काय! कायद्या मध्यें असें कोठेंही सांगितलें नाहीं कीं माजिस्ट्रेटा पुढें जो ह्मणून मुकद्दमा येईल तो त्यांनीं कमिटच करित जावा. क्रिमीनल प्रोसिजर मधील कलम २०९ यांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं कमेटिंग माजिस्ट्रेटानें सर्व पुरावा घेतल्यावर व त्याच प्रमाणें आरोपिता विरुद्ध आपले समोर गुदरलेल्या पुराव्याबद्दल काय ह्मणणें आहे हें ऐकिल्यावर जर आरोपीला कमीट करण्यास त्याच्यामतें सबळ कारणें दिसणार नाहींत तर त्याला त्यांनीं डिसार्ज (मोकळा) करावा. कायद्यांत हें कलम घालण्याचें प्रयोजन असें आहे कीं विनाकारण मुकद्दमा सेशन कमिट केल्यामुळें सरकार ज्युरी किंवा असेसर्स, कैदी, प्रासिक्युटर, व साक्षीदार लोकांना जो त्रास होतो व सरकारला विनाकारण जो खर्च पडतो व कोर्टाचा अमोलिक वेळ जो वृथा खर्च होतो तो होऊं नये; परंतु माजिस्ट्रेट लोकांनीं आपल्या विचाराचा व कायद्याचा ज्ञानाचा जर चांगला उपयोग केला नाहीं तर सरकारानें त्यांना जे अधिकार दिले आहेत व ते अधिकाराची अंमलबजावणी चांगल्या रितीनें करावी ह्मणून त्यांना जें सरकार वेतन देत आहे त्यांचा ते दुरुपयोग करितात असें होईल. त्यांच्या अंगीं कायद्याचें ज्ञान नसेल किंवा विचार करण्याची शक्ती नसेल असें अनुमान त्यांनां मिळत असलेल्या पगारावरून व सरकारी त्यांना दिलेल्या अधिकारावरून कोणाला ही काढतां येणार नाहीं. आम्ही जें काय वर लिहिलें आहे त्यांत कांहीं तथ्य आहे किंवा नाहीं हें वाचकानां समजण्याकरिता एक दोन मुकद्दम्याची हकिकत देतों.

पुसद तालुक्यांतील साई या गांवीं भागई तळणीचा खून आरोपी गंगु व संपत यांनीं केला ह्मणून त्याजवर आरोप होता परंतु आगष्ट महिन्यांत सेशन कोर्टांनीं त्या दोघांनाही सोडून दिलें. ह्या मुकद्दम्यांत कमेटिंग माजिस्ट्रेट पुढें पुरावा झाला तो असा. मयताचे आरोपी संपत याच्या बापाशीं एका खोल्या पैशावरून भांडण झालें होतें. मयत मरण्याच्या दिवशीं आरोपीच्या शेतांत इतर लोकाबरोबर हुर्डा खात बसलो होती. आरोपीच्या शेतांत पोलिसाला तपासांत रक्तच्या डागाचे दोन गोटे एक लहान व एक मोठा असे आरोपीच्या झोपडीच्या दरवाज्याशीं सांपडले. हा इतका काय तो पुरावा. याशिवाय आरोपी लोकाचे कबूल जबाब ते असे दोघे ही आरोपी असें ह्मणत कीं आमच्या समक्ष गोमानें ह्मणजे आरोपी नं. १ च्या बापानें मयतास मारिलें. परंतु तो इसम कैदी केला नव्हता कारण तो कांहींच कबूल करीना ह्या पुराव्या वरून व जबाबा वरून माजिस्ट्रेटाला कमीट करण्यास सबळ कारणें होतीं असें ह्मणतां येईल काय? दुसऱ्या मनुष्यानें गुन्हा केला असें ह्मणणारा आरोपी स्वतः बास कबुल आहे असें कोणच्या कायद्याच्या आधारानें मानतां येईल तें माजिस्ट्रेट साहेब कळवितील तर बरें होईल. आरोपीचे जबाब अशा प्रकारचे व पुरावा असा तर मग कमिट करण्यास काय बरें आधार होता! माजिस्ट्रेट साहेबांनीं जर थोडा विचार केला असतां तर ज्या पुराव्या वरून गोमाला कमीट करण्यास किंवा कैदी करण्यास त्यांना आधार सांपडला नाहीं त्या पुराव्या वरून बाकीच्या कैदी बद्दल कसा आधार सांपडला! वरील मासल्या प्रमाणेंच आक्टोबर महिन्यांत बुलढाणें जिल्ह्यांतील सेलापूर येथून हा एक मुकद्दमा आला होता त्यांत तीन आरोपी होते. मारुती फैजु व गंगी ह्या पैकीं मारुती जवळ कांहीं मयताच्या अंगावरील डागिने सांपडले एवढाच काय तो सर्व मुकद्दम्यांत पुरावा. याशिवाय आरोपी लोकांचे जबाब ते असे प्रत्येक जण ह्मणत असें कीं बाकीच्या दोघांनीं गुन्हा केला. तर इतक्या वरून माजिस्ट्रेट साहेबाला फैजु व गंगी यांस तरी कमीट करणें रास्त होते काय? कमीट केल्या मुळें ह्या लोकांना विनाकारण तुरुंगांत जे दोन तीन महिने घालवावे लागले याजबद्दल जबाबदार कोण? माजिस्ट्रेट च ना. पोलिसांनीं जरी हवी तशी खटपट केली तरी ती रास्त आहे किंवा नाहीं हे माजिस्ट्रेट लोकांनीं पाहिलें पाहिजे. पोलिसाचे मुकद्दमे कमिट होण्या मध्ये हित अहिताचा संबंध असल्या मुळें त्यानां तशी खटपट करणें भाग पडतें एकदाचा कसा तरी मुकद्दमा कमीट करावा असें पोलिसाला वाटत असतें परंतु माजिस्ट्रेटाला तसें वाटण्याचें कांहीं एक कारण नाहीं.

हल्लींच्या सेशन मध्यें सुद्धा तुळसी मर्द कृष्णाजीइच्या विरुद्ध काय तो तिनें मूल मारल्या बदल डाक्टरचा पुरावा. या शिवाय दुसरा कांहीं पुरावा नाहीं. डाक्टर साहेबाचें म्हणणें अक्षरशः जरी खरी मानलें तरी खून झाला तो तुळसीनेंच किंवा एखाद्या "क्ष" नें केला असें मानण्याला काय आधार? मेहकरच्या मुकद्दम्याचा ही ह्याच मासला. असे खटले येऊं नये म्हणून आमची माजिस्ट्रेटांनां अशी विनंती आहे कीं कमिट करितांना त्यानीं चांगला विचार करीत जावा नाहींतर आपण कैद्याला सोडण्याची जबाबदारी कशाकरितां घ्यावी असें म्हणून त्याला तुरुंगांत ढकलून देऊन सरकारी खजिन्य वर तळसीपत्र ठेवण्यास व बाकीच्या लोकांस विनाकारण त्रास देण्यास कारण होऊं नये.

मुंबईचे सर्व प्रसिद्ध शेट सर दिनशा माणिकजी पेटिट यांची स्वारी गेल्या शुक्रवारीं अकोल्यास आली होती. वऱ्हाडांत कपड्याची गिरणी स्थापण्याचा मशारनिल्हे पाशीं लाट साहेबांचा विचार आहे. येथील शिष्टें संभावित लोकांनीं लायब्ररींत या बड्या पाहुण्यांच्या सन्मानार्थ छोटीशी पानसुपारी दिली. लायब्ररीस भेटी अंती १०० रुपये देणगी मिळाली. दातृत्व गुणांत हे कर्णे आहेत तेव्हां यांच्या घरीं गजान्त लक्ष्मी चिरकाल नांदो ह्मणजे लोकांचें कल्याण आहे.

गव्हर्नर जनरलचे कायदे कौंसिलांतील सभासदाची एक वर्षाची मुदत संपल्या मुळें सर दिनशा माणिकजी यांची जागा रिकामी पडली तिजवरील नवीन सभासद लार्ड रीसाहेबां कडून फर्माविले जाणार आहेत

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 23, 1889.

'I can get a clerk at less wages than a cook' says a great capitalist of Bombay. This means that the present system of education tends to unfit a student for active life. His future course is likely to be industrial rather than literary and we are therefore required, as the Honorable Mr. Justice Scott would say, to establish a kind of educational bridge from the system of general edu-

cation which every boy requires to the special technical education for industrial occupation. Our province has taken the initiative in founding an Industrial School at Akola but we are too backward to make any substantial progress in that line. In explaining his educational policy Lord Reay has tried to define the limit to the measures which the educational authorities should adopt with regard to Technical education. The argument runs thus:—

"The taxpayers mostly belong to the classes who earn their livelihood by handicraft: it is surely the duty of the State to make some return to them in opening schools, which will enable them to earn higher wages and to lead more comfortable lives. To discredit first attempts made by Government to impart technical education by raising the cry of higher education in danger is only possible, because the classes for whom that technical education is organised are without representatives to make their voices heard; but Government would neglect its duty if it heeded such attacks which are based on misrepresentation of its measures and intentions. When our contract comes under revision it will be necessary to increase the allotments for technical and for primary education which do not seem to me at present to bear a just proportion to the money spent on other branches. Far from higher education having been sacrificed to technical, or higher education being the weak spot in our organization, it is the rural districts which have a just grievance, in as much as we are still giving about two and one fourth lakhs less to the district boards than the standard amount of aid which, according to the Government standard, they might fairly receive. If a start has had to be made *de novo*, if the estimates had to be drawn up, not for existing institutions, but with a view to organize education by educational experts from England or Scotland, they would certainly be drawn up on a wholly different basis, and lead to very different results, than those which are at present obtained. If the taxpayers were consulted, I have no doubt that the results would also be very different, and that they would secure a much larger share of the outlay from State funds for schools, from which they would reap more direct advantages in their own pursuits. This line of argument might if carried too far, lead to very irrational deductions; but it is a perfectly justifiable method of dealing with the theories of those who would assign the lion's share to higher education of a specific character, irrespective of the claims of these classes of society, who are the chief contributors to the State revenue.'

We would request our Director of Public Instructions to facilitate primary and technical education so as to meet the wants of the labouring classes. It is also a strange thing that an agricultural province like ours should have no agricultural-class. The principal of the Science —College at Poona has been adovcating a University degree in agricultural science and we hope that in this new branch of collegiate education a host of Berar students will try their best to be graduates, so as to enable themselves to better the present status of agriculture in these districts.

---

The *Evening News* (London) has a very appreciative paragraph about the elevation of the Hon. Mr. Telang on the Bench of the Bombay High Court. It says:—"The new judge is probably the youngest in the British Empire. He is however, a great Sanskrit scholar and an active Member of the Bombay University. He is an orthodox Brahmin and one of the leaders of the Indian political movement. Although he has never been in England, he is master of the English language, which he speaks with fluency and even eloquence."

---

Ellichpur Berars
18th December, 1889.

To

The Editor "Berar Samachar."

Please, publish the following lines in a corner of your journal.

*Memorial-* I remember perfectly well that when Colonel Mackenzie present Judicial Commissioner H. A. D. was transferred to Ajmere some years ago, a meeting was convened by the Ellichpurs public including Government servants under the presidency of Mr. Daudkha Nabab of Ellichpur to consider what steps should be taken to commemorate the name of Col. Mackenzie in this District, where he acted as District officer for the last 20 years to the greatest satisfaction of both Govt. and public. Telling speeches were made in the meeting and it was unanimously resolved that a subscription - fund should be raised which should be devoted to the preparation of an oil-paint bust of the Honorable gentleman and that this bust should be affixed to the walls of the N. G. Library of Ellichpur cantonment. A committee consisting of influential gentlemen was then formed to give effect to the above resolution and the meeting was dissolved. It is now 2 years since the above resolution was passed and yet we regret to observe that Committee has not done any thing to carry out the resolution. This is not as it should be. It is highly probable that Col. Mackenzie who is now on leave will perhaps go on a long furlough and we shall simply regret the deplorable condition of our people, if the Committee will still remain silent and not take steps to give effect to the praiseworthy resolution passed by the meeting.

The subscribers of the N. G. Library of Ellichpur Cantonment entertained Captain Davies Assistant Commissioner with a *Pan Supari* ceremony, as he is transferred to Buldana. Captain Dressner, Mr. V. N. Dandekar and other gentlemen were present. Mr. Ganesh Nagesh Pleader, the new secretary opened the meeting by a short speech in which he thanked Captain Davies for having rendered valuable assistance to the Library and expressed regret that he is now going from this place. Captain Davies was a gentleman of a good and social disposition having a noble and a kind heart. He then made a short speech and the ceremony come to a close after distribution of *Pan Supari Utter gulab* and garlands of flowers &c.

Yours truly
"X"

---

## वऱ्हाड

रा. रा. बाळकृष्ण मोरेश्वर साठे असि. मास्तर अकोला हायस्कूल यांस येथील डिस्ट्रिक्ट बोडार्चे सेक्रेटरी नेमण्यांत आलें आहे. हे गृहस्थ बाणीदार व विद्वान असून लोकप्रिय आहेत. विद्यार्थी मंडळी यास फार फार चाहतात येथील मोडकळीस आलेल्या ट्रेडींग कंपनीस यांनीं पूर्व स्थितीस आणण्याचा रंग समीप आणिला आहे.

मि. गोविंद राज मुदलियार पहिले वर्ग तहशिल्दार यांस सध्यां पुरतें काम पाहूं लागल्या दिवसा पासून आफिशिएटींग एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग पांचवा नेमण्यांत आलें आहे. अय्या साहेबांची नेमणूक यवतमाळचे कोर्टावर झाल्या मुळें तेथील एक्स्ट्रा असि. कमि. रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर यांस केळापुरचे नवे कोर्टावर बदललें आहे असें प्रमोद सिंधु वरून कळतें.

कर्नल मेकंझी जुडिशिअल कमिशनर यांनीं आफ्रिकेंतली गव्हरनरची जागा नाकारल्या मुळें रजा संपतांच गेल्या गुरुवारीं आपले कामाचा चार्ज घेतला; आणि कर्नल स्पान्स्की साहेब ही परत आपल्या डेपुटी कमिशनरच्या जागेवर रुजूं होण्या साठीं दुसरे दिवशीं उमरावतीहून रवाना झाले.

पुणें सार्वजनिक सभे कडून लिहून गेल्या प्रमाणें नागपूरची लोकसभा विलायतेचे पाहुणें मि. ब्राडला यांस मानपत्र देणार आहे त्या प्रमाणें वऱ्हाडची ही सार्वजनिक सभा आपलें मानपत्र हिंदुस्थानच्या कैवाऱ्या पुढें सादर करणार आहे.

नागपूर टाइम्स वरून कळतें कीं क्याप्टन डस्नर यांनीं वऱ्हाडातील असिस्टंट कमिशनरच्या जागेचा राजीनामा दिला आहे. इकडे पगार फार थोड मिळतो व कलकत्यानें लष्करी खात्यांतच आपली चांगली संभावना होईल असा कप्तान साहेबांचा अभिप्राय पडतो.

प्रमोद सिंधु वरून कळतें कीं मि. समसुद्दीन असि. कमिशनर हे जाणार आहेत आणि त्यांच्या रजेंत वऱ्हाडांतील पहिले नेटीव आफिशिएटींग डेपुटी कमिशनर मि. यासीनखां हे काम पाहणार आहेत.

येथील हायस्कुलांतील असि. मास्तर रा. रा. चिंतामण गणेश यांस तळेगांव दशासहस्त्रास मूळची ७९ ची जागा ६० ची करून सारख्या पगारावर बदललें. हायस्कुलापेक्षां या शाळेंत सदर्हू राजेश्री चांगले निभतील असें अह्मांस वाटतें.

येथील हायस्कुलांत रिकाम्या पडलेल्या दोन जागापैकीं ५० रु. पगारावर रा. रा. शंकर नारायण डांगे यांस व ४० च्या पगारावर रा. रा. जनार्दन केशव नगरकर यांस कायम केलें आहे.

मे. बहिमनजी जामास्पजी दस्तुर यांचे बंधु डाक्टर हुशांग हे पुण्याहून पार्शी लोकांचे कुलगुरु या नात्यानें बडोन्यास अग्यारा सुरू करण्या करितां वऱ्हाडांत आले आहेत

पुढील वर्षं तला वऱ्हाडांतील 'भाजो विद्यार्थी समाज, अकोल्यास भरणार आहे त्याची व्यवस्था करण्या साठीं सभा भरवून रा. रा. गोविंद विश्वनाथ देशपांडे वकील व रा. रा. व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर वैदर्भ प्रकाशक या उभयतांस सेक्रेटरी नेमिलें आहे.

खामगांव मुनसिपालिटीचे सभासद मि. टी. क्रीनक्नेक्ट यांनीं आपल्या कामाचा राजिनामा हजर केला होता तो रेसिडेंट साहेबांनीं मंजूर करून त्यांच्या जागीं मि. आर. स्किमडूट यांस सभासद नेमिलें आहे.

---

### नोटिसीचें उत्तर.

रा. रामभाऊ संतराम सोनार नगरकर हल्लीं राहणार अकोले यासी खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं आमचे घरांत तुह्मी भाड्यानें राहतां तें घर आबाजी मैराळ वकील व यादवराव रामचंद्र कोरडे यांस विकलें आहे करितां सदरहु घरांतून तुह्मी निघून जावें हें घर खाली करून त्यांचे ताब्यांत द्यावें व आमचे भाड्याबद्दल रुपये तुह्माकडेस घेणें आहेत ते घराबद्दल व मागील पिछवाड्याबद्दल दरमहा रु. ३॥ यापैकीं तुह्माकडेस रु. २४ घेणें आहेत हे आठ दिवसांत आह्मांस देऊन रसीद घ्यावी.

तुह्मी शुद्धवऱ्हाडी पत्रांत दिलेली नोटीस खोटी आहे आह्मी तुह्मांस मुळींच घर विकलें नसून विकण्याचे वचनही दिलें नाहीं व दस्तायवज ही लिहून दिला नाहीं तुह्मी भाडे बुडविण्याकारितां व घर पचविण्याचे हेतूनें हे तुफान उचललें आहे आमचे भाडे न दिल्यास अगर घर खालीं करून न दिल्यास तुह्मावर रीतीप्रमाणें तजवीज करण्यांत येऊन या नोटिसीसह व पुढील सर्व खर्चाचा बोजा तुह्मावर पडले कळावें ता. २२।१२।८९ इ०

( सही )

किसनपांडे वल्द रूपचंद दस्तुरखुद.

---

### नोटीस.

लोटनसिंग रजपुत राहाणार बरूड तालुके दर्यापूर यांस नोटीस देणार बाहादरखा वल्द रुस्तुमखा राहाणार राजखेडा तालुके दर्यापूर नोटीसिने असें कळवितों कीं. आम्हीं आपली मर्द अकाजी राहणार यरंडगांव तालुके दर्यापुर इची शेती आम्हीं खरेदी करून घेतली आहे. व ही शेती आपल्या कडे गाहाणवट आहे. असें आम्हांस समजलें. आता आपल्यापाशी सदर्हू खरेदी शेती गाहाणवट आहे त्या गाहाणवट रुपये पैकी सदर्हू आयली मर्द आकाजी हिणे आपल्यास रुपये २१० दिले आहेत व व्याज बद्दलची आपली पावती तीनें आम्हांस दिली आहे व आम्हा पाशीं आहे. आम्हीं ही नोटीस देण्या पुर्वीं आपल्यास आज साहा सात महिने सांगतों आहे कीं आपले गाहाणवट बद्दल रुपये किती राहिले आहेत ते आपण घेऊन जावे परंतु आपण तसे करित नाहीं. व विना कारण व्याज वाढवित आहा वगैरे कारणा मुळें या नोटीसीनें असें कळविलें जातें कीं तुमचे सहर्हू शेता बद्दल जे रुपये गाहाणाचे असतील ते आम्हा पासून हिशेब करून अगर गुलाबचंद चंदुलाल मारवाडी दुकान बनोसा याजपासून नोटीस पावताच घेऊन जावे जर आपण असें केलें नाहींतर पुढें मागें आपण व्याज वगैरे सदर्हू रुपये बद्दल मागाल तर कांहीं मिळणार नाहीं. व नोटीसीचा खर्च ही वगा केला जाईल हे आपणांस कळावे. तारीख २० माहे दिसेंबर सन १८८९ इ० (सही)

बाहादरखा वल्द रुस्तुमखा
राहणार राजखेड दस्तुर खुद.

---

### नोटीस

राजश्री रामभाऊ वल्द संतराम सोनार नगरकर हल्ली वस्ती अकोले यास खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं ज्या घरांत हल्ली तुंम्हीं भाड्याने राहाता तें घर आम्हीं घराचे मालक किसन पांडे बिन रुपचंद याज पासून खरेदी घेतले आहे तर सदर्हु घर आज पासून आठ दिवसांत खाली करून आमचे ताब्यांत द्यावे तसें न केल्यास तुम्हावर रिती प्रमाणें तजवीज होऊन सदर्हू घराचे भाडे आज पासून ताबा मिळेपर्यंत दरमाहा रुपये १० प्रमाणें आकारा सुद्धां घेतले जाईल व सर्व खर्चाची जोखीम तुम्हावर पडेल कळावे ता० २२।१२।८९ इ० (सही)

१ आबाजी मैराळ वकील.
१ यादव रामचंद्र कोरडे

---

## वर्तमानसार.

एल. एम. आणि एस या परीक्षेचा निकाल प्रसिद्ध झाला. या परीक्षेस ७३ उमेदवार होते त्यांजपैकीं ३२ पास झाले

मुंबई सेक्रेटरी हापिसांत कायदे कौन्सिलची सभा भरून विलेज सानिटेशन बिल व साल्ट बिल ह्या कायद्यांचें तिसरें वाचन होऊन पास झालें.

इराणा मध्यें कायदे करण्याच्या इराद्यानें इंग्लिश, फ्रेंच व जर्मन कायदे पाहण्या करितां इराणच्या शहानीं कमिशन नेमिल्याचे समजतें.

पार्लमेंट सभेचें काम सुरू होण्याचा ता. ११ फेब्रुवारी हा दिवस ठरल्याचें समजतें.

आस्ट्रेलियांतील संस्थानांचे ऐक्य व्हावें असें ह्मणणारांची सभा मेलबोर्न येथें येत्या फेब्रुवारींत होईल असें समजतें.

यंदाच्या कांग्रेस करितां काशी येथें ५६ त्रिपलिकेन येथें तीस व मिर्झापूर येथें सत्रा डेलिगेटस पाठविण्याचें ठरलें.

पुण्याच्या फर्ग्युसन कालेजांतून पी. ई. च्या परिक्षेस ८० उमेदवार गेले होते त्यांपैकीं ४४ पास झाले ही समाधानाची व वाखाणण्या सारखी गोष्ट आहे.

कर्डिस लोकांपासून संरक्षण करण्याकरितां आर्मिनियन लोकांनीं आपली फौज वाढविली आहे.

रशियाच्या झार साहेबांची प्रकृति फार बिघडल्यामुळें डाक्टर्स लायडन व बर्गमन हे सेंट पिटर्सबर्ग येथें गेले आहेत.

हिंदुस्थानांतील जीं फ्रेंच ठिकाणें आहेत. तेथील प्रत्येक घराण्यांतून एक मनुष्य कवाईत शिकविण्याकरितां तीन वर्षें पाठविला पाहिजे. अशा आशयाचा एक कायदा फ्रेंच सरकार करीत आहे. स. प.

नवाठराव तारेची बातमी आणून देणाऱ्या शिपाया पाशीं पांच मिनिटांच्या आंत तारेचें उत्तर लिहून दिलें असतां तें त्यानें तार आफिसांत नेऊन द्यावें अशी तारेच्या-कायद्याच्या नियमांत सरकारानें सुधारणा केली आहे.

नेटिवाची बढती मध्य प्रांतांतले सब असिस्टंट कान्सरव्हेटर मि० एम मुतन्ना यांस स्टेट सेक्रेटरी यांच्या मंजूरीनें असिस्टंट कान्सरव्हेटरच्या जागीं कायम केलें. एवढी मोठी जागा आज पर्यंत नेटिवांस मिळालेली नाहीं.

दवा—चुन्याच्या निवळींत गोडें तेल मिळवून तें भाजल्या जागीं लाविलें असतां उत्तम गुण येतो.— मधमाशी चावली असेल त्या जाग्यावर कांद्याचा रस सपाटून चोळावा ह्मणजे दंशाची फणफण तात्काळ बंद होते असें कळतें.

येत्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सर डब्ल्यु वेडरबर्न यांस मि० युल यांणीं न्याशनल क्लब मध्यें मेजवानी दिली. त्या वेळीं पुष्कळ पार्लमेंट मेंबर हजर होते. त्यांनीं मोठीं जोरदार भाषणें केलीं. कायदे कौन्सिलच्या सुधारणेचें जें बील येत्या पार्लमेंटच्या सेशनांत ब्राडला आणणार आहेत. त्याची सगळ्यांनीं अतीशय वहावा केली इतकेंच नव्हे, सर्व पक्षाच्या मेंबरांनीं त्यास जबर पाटबळ द्यावें अशा सूचना हि झाल्या. पैशाच्या संबधानें हिंदुस्थानची कशी उधळ पट्टी होते व ती बंद होणें किती अवश्य आहे याबद्दल मि० यूल यांणीं इंडिया कौन्सलांतील स्टोअर खात्याचे उदाहरण दाखविलें. या खात्यांत लहान लहान पगाराचे नौकर लोक असल्या मुळें पैशाची फार नासधूस होते असें त्यानीं सांगितलें. शु० सू०

खानदेशांत बडोदा रेल्वे आपला फाटा सुरतेपासून नंदुरबार पर्यंत नेऊन धान्याच्या व्यापारानें आपला फायदा करून घेणार.

आजवर इंग्लंडांत लिबरल व कान्सरवेटिव अशा दोन फळ्या होत्या. आतां न्याशनल नावचा तिसरा मेळा उत्पन्न झाला आहे. बापसे बेट सवाई, होतो कीं काय न्हावें.

थोड्याच दिवसांत इंग्लंड व अमेरिका यांच्या मधील नाण्याच्या चढाओढीनें रुप्याची किंमत सोन्याच्या किंमतीस येऊन मिळेल असें वाटतें. अमेरिकेनें नवीन रुप्याचें नाणें पाडण्याचा बेत करून खरेदीची सुरवात केल्यामुळें इंग्लंडचे व्यापारी घाबरून गेले आहेत. लाकेशायरचें संस्थानांत युनेटेडस्टेटचे सेक्रेटरी डालर नावाचे चांदीचें नवीन नाणें पाडणार त्यात दुपट रुप घालून किंमत चढविणार. कोणते ही राज्यांतील लोक पहा आपला उदयकाल धुंडण्याच्या पाठीस लागले आहेत. त्याप्रमाणें हिंदुस्थानचे लोकही धावधाव करीत आहेत, पण दैव प्रतिकूलतेमुळें त्यांची दिशा चुकत असून त्यास ती गोष्ट कळत नाहीं.

हिंदुस्थानांत चालू असलेल्या रेल्वे कंपन्या मधून माल नेणें आणण्याच्या दरांत कमजास्तपणा करण्याचें अगत्य आहे कीं काय याचा विचार ठरविण्यासाठीं कलकत्ता सरकारानें एक सिलेक्ट कमेटी स्थापन केली त्यांत मि० स्कोबल, सर चार्लस एलिएट मि. हेचिंस, मि० स्टीवन, सर दिनशा माणकजी, इतके गृहस्थ निवडले आहेत कदाचित कारण पडल्यास मि० राबर्ट क्रास्टवेस्ठ यांची आयत्यावेळीं नेमणूक करण्याचा अधिकार देऊन ठेविला आहे. ही सर्व मंडळी एकंदर अजमास पाहून दरवारी करील ती येत्या मार्च पासून अमलांत येईल.

इराणच्या शहास नजर करण्यासाठीं जुनागडाहून एक हत्ती सरकारानें मुंबईस आणविला आहे. तो अतिशय मस्तान होऊन त्यानें आपल्या महातास सोंडेंत धरून आपटला व आपण मोकळा होऊन मि० जमशेटजी खरशेटजीकामा सालिसिटर यांच्या बंगल्यांत शिरला. तेथें त्यानें ताड, माड व दुसरीं झाडें यांचा सत्यनाश चालविला कदाचित तो सडकेवर यईल तर काय घात होईल याचा नियम नाहीं समजून त्यास पकडण्यासाठीं बडोदा व कच्छ येथील महात लोकांस तारा करून बोलाऊन आणून मोठ्या तजवीजीनें पकडला. हें रणकंदन ४ दिवस चाललें होतें. मुंबईत पुष्कळ लोक विद्वान असता एक हत्तीं धरवला नाहीं, ह्मणूनच आह्मी ह्मणतो कीं सर्वच लोक विद्यासंपन्न पाहिजेत असें नाहीं, तर लहानपणा पासून निरनिराळ्या कलांत लोक रहातील तर प्रसंग विशेषीं फायदा होण्याचा संभव आहे.

हिंदुस्थानची खानेसुमारी सुरू होणार त्या त्या साठीं सरकारानें एक कानफरन्सची स्थापना केली; त्यांत अधिकारी लोक प्रतिनिधी दाखल निवडण्यांत आले ते:- मुंबई तर्फे मि० बेन्स, पंजाबाकडील मि० डेनझिल इबेटसन, वायव्यप्रांताकडील मि० ड्रूईसडेल, मध्य प्रांताकडील मि० बोरडिलन, बंगालकडील मि० कोपलस्टेन, आणि ब्रह्मदेशाच्या संबधानें निवड व्हावयाची परंतु तो अधिकार मि० बेन्स याजकडेसच देण्यांत आला आहे. म. मि.

बर्लिन व व्हियना येथें एक विलक्षण रोग उद्भवला आहे.

हेर समजून एका इंग्रजास ओडिसा प्रांतांत रशियानें पकडला आहे. जवळ किल्याचे लहान लहान नकाशे काढलेले सांपडले असून शिवाय बरेच कागदपत्र सापडले आहेत. रशियनच्या राज्यांत इंग्लिश हेर पाठवितात रशिया इंग्लंडच्या राज्यांत हेर पाठवितो मिळून धसमस सुरू आहेच.

ब्रह्मदेशांतील हिऱ्याच्या खाणीं तपासण्याकरतां सर फिलिप आफिनची स्वारी स्वतः येणार आहे असें ह्मणतात. निर्लज्य होऊन पुन्हां तोंड दाखविण्याची इच्छा आहेच कां!

म्युनिसिपालिट्यांत बहुमतानें कारभार होत असल्यामुळें एखादे वेळीं मोठी गंमत होते असते. मुंबईच्या म्युनिसिपालिटीची सार्वजनिक सभा भरली असतां असाच एक गमतीचा प्रकार घडून आला. येत्या सालच्या बजटांत तुपावर जास्त कर बसवावा असें ठरलें असल्या मुळें तशी एक सूचना पुढें आली त्यावर मुंबईचे शेरीफ मि० याजनिक यांणीं त्यांत अशी सुधारणा केली कीं तुपावर बसविण्याच्या ऐवजीं साखरेवर कर बसवावा. ही सुधारणा प्रथम बहुमतीनें पसंत ठरली नंतर पहिली सूचना तुपावर कर बसविण्याचा पुढें आली तीही पास झाली यामुळें म्युनिसिपालिटीस जो जास्त पैसा लागणार होता त्या पेक्षां जास्त ४००० रुपये उत्पन्न होतात असें या दोन्हीं सूचना पास झाल्यामुळें झालें मग शेरिफांनी तिसरी सूचना पुढें आणली कीं धान्याचा कर २ टक्यांनीं कमी करावा तीही सुचना पसंत ठरली यावरून येवढाच बोध घ्यावयाचा कीं बहुमताने एखादे वेळीं अशा गमती होतात. तूप, साखर वगैरेवर कर वाढविण्या ऐवजीं मच्छी मांस वगैरे वर कां वाढवीत नाहीं. या शक्करच कां इतकी नजर.

कलकत्ता व मुंबई यांच्या दरम्यान पुन्हां आठवड्याची धांवती गाडी सुरू होणार असें ह्मणतात.

कलकत्याच्या हायकोर्टाच्या जज्याच्या जागीं मि० अमीरअली यांची नेमणूक झाली.

गवळीपेठी येथील लष्करांतील हत्यारेंच चोरीस जाऊं लागलीं आहेत हो अजब गोष्ट नव्हे काय;

एखादे मृत्यूपत्र लिहिणाराने वाळून टाकलें तरी तें तसें होतें असें त्यावर सही करणाऱ्या साक्षीदारानीं शपथेवर सांगितल्यास त्याचा अंमल करावा असें नुकतेच विलायतेस ठरलें आहे.

आह्मास कबूल केलेला पांत देण्यांत आला नाहीं ह्मणून इजिप्तांतील बुडाऊन्स जातीचे ३० हजार लोक चवताळले आहेत.

रा. ब. विष्णू मोरेश्वर भिडे अध्यक्ष रा. रा. बाळ गंगाधर टिळक उपाध्यक्ष, आणि रा. रा. वासुदेवराव केळकर चिटणीस, अशा मंडळी कडून अल्पवयी मुलासाठीं एक बोर्डिंगहौस तारखी संस्था पुण्यास स्थापन करण्यांत आली आहे. ह्या बालगृहांत मुलांच्या खाण्यापिण्याची, राहण्याची आणि त्यांच्या विद्याभ्यासावर देखरेख करण्याची सर्व प्रकारची उत्तम साक ठेवण्यांत येते. ह्या बालगृहावर रा० रा० गोपाळराव जोशी, डा० आनंदीबाईचे भ्रतार, यांस पाहणीदार नेमिले आहे. अशी संस्था पुण्यांत कोणी तरी काढायला पाहिजे होती ती ह्याप्रमाणें निघाली असल्यामुळें हिचा उपयोग पुष्कळ लोक करून घेतील अशी आह्मास उमेद आहे. ठा० अ०

हिंदुस्थानांत ५ युनिव्हर्सिट्या, व स्कूल्स आणि हायस्कूल्स १३०० असून ३४६००० विद्यार्थी त्यात अभ्यास करीत आहेत म्हणे.

एकंदर विद्यादानांत २१० लक्ष रुपये खर्च होतो. या पैकीं ४८ लक्ष म्युनिसिपाल्टयांचा, ११२ लक्ष लोकांचा व सरकारचा ८० लक्ष होतो.

जळालें— महाबळेश्वर येथील सेक्रेटरीएट आफिसांत आग लागून कांहीं सरकारी कागदपत्र जळाले ह्मणतात. क० रा०


# AKOLA MEDICAL SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल.

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगाची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतिणी सोडविणें वगैरे शस्त्रानें होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट. एल्. एम्. ॲन्ड् एस्.

वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा मलम आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतत्राण, हीं औषधें मिळतील.


## अकोलें बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | ९९।।।- | | |
| ,, १५ दिवसाच्या मुदतीची | ९९।।- | | |
| सुवर्ण .... | २३।। | रुपें | १०८ |
| आळशी खंडीस | ९९ | उडीद | ५६ |
| गहू काठे | ५० | बनशी | ६० |
| जवारी नवी | ४२ | चणे | ५५ |
| बाजरी | ५० | सर्की ३।।।= मोठ | ४८- |
| तूप | ८। | तेल | ५।।= |

सट्याचे भाव.

| | | | |
|---|---|---|---|
| जवारी वसंत | संवत | १९४६ | ४२८= |
| गहू वैशाखशुद्ध | | १९४६ | ५६।।। |
| आळशी चैत्र शुद्ध | | १९४६ | ८६ |
| रुई फाल्गुन शुद्ध | | १९४६ | ६४= |
| सर्की वै. नवे साखाची | | १९४६ | ४८- |

शु. व.

☞ हें पत्र अकोला येथें कै० बा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही
सालअखेर ׳׳ ७ ׳׳ १०८
किरकोळ अंकास.............................०४

नोटीशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस ..........०१

Per annum in arrears 7
Six monthly..............3
Single copy..............................

# वऱ्हाडसमाचार.

Advertisements
Below 10 lines... 2Rs
per line over10...4as
Repetition per line3as

## THE BERAR SAMACHAR

**VOL XXIII** **AKOLA MONDAY 30 DECEMBER 1889** **NO 50**

वर्ष २३ अकोला सोमवार तारीख ३० माहे दिसेंबर सन १८८९ इ० अंक ५०

## AKOLA MEDICAL SURGICAL HALL.

Hari Vaman Bhat.
L. M. & S.

## अकोला मेडिकल आणि सर्जिकल हॉल

आह्मीं येथें पेठेंत लोकांच्या सोईकरितां दवाखाना काढिला आहे येथें सर्व रोगाची परीक्षा करून योग्य औषधाची योजना करण्याविषयीं काळजी घेतली जाईल शिवाय मोती बिंदु काढणें, अडलेल्या बाळंतिणी सोडविणें वगैरे शस्त्रांनीं होणारे उपचार मोठ्या काळजीनें करूं. येथें ठोकळ व किरकोळ विलायती ताजीं औषधें माफक दरानें विकत मिळतील. तसेंच औषधें तयार करण्याकरितां ब्राह्मण कंपौंडर ठेविला आहे.

हरी वामन भट एल्. एम्. ॲन्ड् एस्. वरील दवाखान्यांत डा. वामन गोपाळ यांचा रक्त शुद्ध करणारा सार्सापरेला, पौष्टिक फास्फरसच्या गोळ्या व केंस काळे होण्याचा मलम आणि दांतास मजबुती व मुख सुगंधी कारक, दंतशाण, हीं औषधें मिळतील.

## पाक.

सालंमिश्री पाक घेतला असतां धातुची मजबुती होऊन शक्ती वाढते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

बदाम पाक घेतला असता, मस्तकांतील उष्णता दूर होते डोळ्यास थंडावा येतो धातु पुष्ट होते बळ येते दरदिवस ३ तोळे प्रमाणें ३० दिवस घ्या.

गोखरूचा पाक घेतला असतां मूत्र मार्गांत होणारी आग, तिडका, जुनापरमा, मेहरोग मूत्र पुष्कळ आणि गढूळ होते तो तो, हे रोग दूर होऊन धातु शुद्ध होते बळ येते स्त्री संगाची इच्छा होते दर दिवस ३ तोळे प्रमाणें ६० दिवस घ्या.

कोहळे फळाचा पाक घेतला असतां डोळ्यास येणरी अंधारी भोंवळ पिताचे उपद्रव हे रोग दूर होऊन रक्त शुद्ध होते धातु पुष्ट होते बळयेतें दरादिवस ३ तोळे प्रमाणें ४५ दिवस घ्या.

वर लिहीलेले पाक मागविण्याची रीत

| तोळे | किंमत रुपये | पोष्टेज |
|---|---|---|
| १६ | १ | ०९ |
| ३२ | २ | ०१३ |
| ४८ | ३ | ०१३ |
| ६४ | ४ | १०१ |
| ८० एकशेर | ५ | पोष्टेज माफ. |

पत्ता गजानन बाळकृष्ण वैशंपायन पेठ सदाशीव पुणें.—

## जाहिरात.

मुलुक अमानी हैद्राबाद यांतील आपकारी (दारू, ताडी, अफू व गांजा) विक्रीच्या तारखा सन् १८९०-९१ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुकरर करण्यांत आल्या आहेत.—

प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कोर्टांत १२ वाजतां होईल.

उमरावती.....................सोमवार.
तारीख २० जानुआरी सन १८९०
एलिचपूर.........................सोमवार.
तारीख २७ जानुआरी सन १८९०
अकोला..............................सोमवार.
तारीख ३ फेब्रुआरी सन १८९०
बुलढाणा.........................सोमवार.
तारीख १० फेब्रुआरी सन १८९०
वाशीम..............................गुरुवार.
तारीख २० फेब्रुआरी सन१८९०
वणी (यवतमाळ)......................सोमवार.
तारीख ३ मार्च सन १८९०

मक्त्याच्या व हरासांच्या शर्तीचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे ऑफिसांत मिळूं शकेल.

(सही). टी. सी फ्रीहन,
कमिशनर,
मु. अ. है.

## अकोलें बाजारभाव.

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥।– |
| ״ १५ दिवसाच्या मुदतीची | | | ९९॥– |
| सोनें .... | २३॥ | रुपें | १०८ |
| जवस खंडीस | ९९ | उडीद | ५५ |
| गहू काठे | ५५॥ | बनशी | ६० |
| जवारी नवी | ४५ | चणे | ५५ |
| बाजरी | ५० सर्कि ३॥।= | मोठ | ४०– |
| तूप | ८। | तेल | ६। |

सट्याचे भाव.

| | | |
|---|---|---|
| जवारी वसंत | संवत १९४६ | ७३॥।= |
| गहू वैशाखशुद्ध | १९४६ | ५७॥। |
| आळशी चैत्र शुद्ध | १९४६ | ०६०– |
| रुई फाल्गुन शुद्ध | १९४६ | ६४॥। |
| सर्की वै. नवे साळाची | १९४६ | ४०=. |

शु. व.

## पत्रव्यवहार

ह्या सदरा खालील मजकूर पत्र कर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

पुसद, ता० १८।१२।८९

हवामान. थंडी अतिशय पडत असते नदीचे पाणी स्वच्छ आणि काळेभोर दिसतें. जोंधळे तयार होऊन हातीं आल्या सारखे झाले आहेत त्यांची कापणी सुरू आहे. गव्हाचीं पिकें ही बरींच आहेत.

स्वाऱ्या मे. पोलीस सुपरीटेंडंट साहेब यांची स्वारी येथें येऊन येथील तपासणी करून त्या तालुक्यांत फिरत आहेत. मागील आठवड्यांत मे. डे. कमिशनर साहेब ह्यांची स्वारी ही मंगरूळपीर तालुक्यांतून परभारे येथें आली होती साहेब बहादुरांनीं येथील तहसालीची तपासणी केली; तसेंच ऐथील दवाखाना, मराठी शाळा आणि हिंदुस्थानी शाळा ही पाहिल्या. शाळांत कांहीं मुलांची वाचण्याची चाचणी पाहिली. लोकल कमेटीचीं कामें पाहिलीं त्यांत नाल्या चिखलानें बांधल्या असतात त्या चुन्यानीं बांधाव्या म्हणून हुकूम दिला. ह्या पासून ह्या नाल्या मजबूत होतील मात्र कमेटीनें कंट्राक्टर लोकांचे कामावर सक्त नजर ठेविली पाहिजे, नाहींतर ते लोक आंतून सर्व चिखल लावून तोंडावर मात्र चुन्याचा सल्ला करितात. आणि असें झालें म्हणजे इष्ट हेतु सिद्धिस जाणार नाहीं. साहेब बहादुरांचा स्वभाव शांत असून विद्या वृद्धीकडे जास्त लक्ष्य आहे. येथून वाशिमाकडेच निघून गेले ह्याचें कारण कळलें नाहीं कांहीं दिवसांनीं ते ह्या तालुक्यांत परत येतील असा अनुमास आहे. साहेबांचा तालुक्यांतील गांवांत मुक्काम झाला म्हणजे श्रम न पडतां व जास्त पैसा न खर्च करितां गरीब रयतेस दाद मागतां येते.

अलीकडे तहसील कचेरींत दिवाणी मुकदमे फार येऊं लागले आहेत ह्याचें कारण इतकेंच दिसतें कीं येथील तहसीलदार साहेब रा. रा. गणेश गोविंद ह्यांच्या हातून पक्षकार लोकांस त्रास न होतां फिर्यादींचा निकाल लवकर होतो. येथें नवीन दिवाणी कोर्ट स्थापन होऊन आज कित्येक दिवस झाले तरी अद्याप त्याचा मागमूस ही नाहीं. लोकांचे सोयीकडे सरकारचें किती हें लक्ष्य!

लिहिण्यास आनंद वाटतो कीं, राष्ट्रीय सभे करितां ह्या गावांतील तीन मुक्त्यार निवडले गेले होते. त्यां पैकीं मे. रफ्युद्दीन सौदागर हे सदहु सभे करितां मुंबईस जाण्या करितां ता. १४ रोजीं निघून गेले. त्यांचा प्रवास सुखावह व निर्विघ्न होवो असें आम्हीं इच्छितों. बाकीच्या दोघांची पिछे हाट कां झाली तें समजत नाहीं.

मागील पत्रीं कळविल्या प्रमाणें पुसद म. शाळेंत घड्याळ व तास विकत घेण्याकरिता ज्या गृहस्थांनी वर्गणी दिली त्यांचीं नांववार यादी दिली आहे.

२ गणेश गोविंद तहसीलदार.
२ जानकीलाल वेंकटलाल सावकार.
३ रामजी आपा व नरोबा आपा चिकटे सावकार.
२ चुनीलाल घनशामः सावकार.
२ केशव विठोबा कोमटी सावकार.
२ रामभाऊ विठोबा कोमटी सावकार.
१ रामजी काशीनाथ कोमटी सावकार.
१ मेहरबान महमदखान सवदागर.
१ महादसा लिंबासा लाड सावकार.
१ फयाजुद्दीन काजी.
१ लक्ष्मण पोपाळ नायब तहसीलदार.
१ कल्याणराम हास्पीटल असिस्टंट.
१ गोविंद भास्कर ॲक हेड मास्तर,
१ शिवराम बाळाजी सबरजिष्टर. एकूण एकवीस रुपये. कळावें.

आपला
मित्र 'क्ष'

वऱ्हाडसमाचार.

मिती पौष शुद्ध ९ शके १८११

## [इं]डेयन सोशल कान्फरन्स.

सोशल कान्फरन्सच्या सेक्रेटरीनें दुसऱ्या अनेक शाखांच्या सेक्रेटरीनां सरक्युलर पाठविलें तें असें— "मी आपणास कळवितों कीं या वर्षाची इंडीअन सोशल कान्फरन्सची सभा तारीख २९ डीसेंबर रोजीं रविवारीं कांग्रेसहाल मध्यें भरेल; आणि मी आपणांस विनंती करितों कीं आपण सभेस येण्याची मेहेरबानी करावी. व आपण व आपल्या मित्रांनीं केलेल्या कामाचा रिपोर्ट पुणें येथें रा. रा. रानडे यांच्या नांवानें निदान एक आठवडा अगोदर पाठवावा. सर्व रिपोर्टवाचून त्यांचा गोषवारा २९ व्या तारखेच्या पूर्वी एक दोन दिवस अगोदर जी सभा भरेल त्या करितां तयार केला पाहिजे. कानफरन्सच्या सभेच्या विचारा करितां खालील विषय नेमिले आहेत.—

(१) अनुमतीचे वयाचा प्रश्न; ह्या विषयीं मागील वर्षी बरीच चर्चा झाली आहे; पीनलकोड मधील नवरीच्या संभोगाच्या कलमांत १० बदल १२ वय असावें असें आमचें मत आहे. १२ वर्षाचे खालीं नवऱ्याला सुद्धां संभोग करण्याची परवानगी नसावी.

(२) विधवा विवाह कायदेशीर ठरविणारा आक्ट व्यवहार रित्या ज्यास्ती फायदेशीर व्हावा ह्मणून त्या संबधानें चौकशीकरून रिपोर्ट करण्या करितां एक कमिशन नेमण्याकरितां सरकारला विचारणें इष्ट आहे कीं काय? तसेंच विवाहित विधवा व तिचा नवरा ह्यांना आपल्या कुटुंबांतील व जातींतील एक मनुष्य म्हणून जे हक्क आहेत त्यांचा पूर्ण उपभोग मिळण्याला तो आक्ट किंतपत योग्य आहे अगर नाहीं.

(३) अशा एक वयाची मर्यादा कीं त्याचे आंत तरुण विधवा कांहीं झालें तरी कुरूप करावयाच्या नाहींत.

जातींतील श्रेष्ट लोक अगर धर्माधिकारी ज्यांत आहेत असे जातीनें कबूल केलेले पंच त्यांच्याकडून जातीसंबंधी किंवा धर्म संबंधीं तंट्याचा निकाल करून घेणें. मात्र त्याचे वर वरिष्ट दिवाणी कोर्टाचा दाब व देखरेख असावी.

राजा सरटी माधवराव के. सी. एस. आय यांनीं आम्हाला सोशल कान्फरन्सच्या प्रेसिडेंट व सभासद यांच्या नांवानें पत्र पाठविलें आहे तें असेः—

"माझी अशी फार उमेद आहे कीं निदान एक मोठी महत्वाची सामाजिक सुधारणा तडीस नेल्या वांचून सोशल कानफरन्स बरखास्त होणार नाहीं. जी सुधारणा मला फारच महत्वाची, फार निकडीची, व सुदैवे करून फार व्यवहारिक झटल्या वांचून रहावत नाहीं त्या सुधारणेकडे सर्वस्वी लक्ष्य द्यावें अशी मी फार फार शिफारस करितों. मी आतां ती सांगून त्या संबंधानें थोड्या सूचना करितों. माझें ज्ञान अनुभव, अभ्यास, आणि विचार यांनीं माझी पक्की खात्री केली आहे कीं १० वर्षांच्या खालीं मुलींचीं लग्नें होऊं नयेत. ही मनाई करून घेण्याचा उत्तम मार्ग ह्मणजे कायद्याच होय. कायद्यानें असें ठरवावें कीं १० वर्षांच्या पूर्वींची मुलींचीं लग्नें मुलीस ऋतु प्राप्त होई पर्यंत ह्या देशांतील दिवाणी कोर्टांनीं कबूल करूं नयें.

"पुष्कळ भयंकर परिणाम ह्या मुळें मुळींच नाहींसे होतील अगर पुष्कळ अंशीं कमी होतील. आरोग्य व सौख्य वाढेल व बालविधवांची संख्या कमी होईल, ह्या सुचनेला सर्वांत कमी अडथळा येण्या सारखा आहे. यांत शास्त्रा विरुद्ध कांहींच नाहीं. आचारा विरुद्ध कांहींच नाहीं. शिवाय ही अगदीं स्वाभाविक कल्पनेलाही योग्य दिसत आहे. तशी ही काळाला अनुसरून ही आहे. अशा कायद्यानें अडचण फक्त जेथें १० वर्षांच्या खालीं लग्नें होतील व जेथें ऋतु प्राप्त झाला नाहीं, तेथेंच उत्पन्न होईल परंतु असे प्रकार फारच थोडे आहेत. अशा ठिकाणीं सुद्धां जी अडचण उत्पन्न होईल ती आचार बळानें कमी होईल. जी कांहीं थोडी राहिलेली अडचण ती जरूर व न चुकणारी ह्मणून पुष्कळांच्या फायद्या करितां थोड्यांनीं सोसावी. ही थोडीशी अडचण सुद्धां हळूहळू नाहींसी होत जाईल. सुशिक्षित मंडळींनीं अशा प्रकारचा कायदा कायदे करणाऱ्या मंडळीनां अर्ज करून पसार करवून घेतलाच पाहिजे. असें केल्या वांचून अशिक्षित लोकांची या सुधारणेला संमति मिळविणें अगदीं दुरापास्त आहे; कारण अशा महत्वाच्या कामा संबंधानें खरा विचार करण्याला ते असमर्थ आहेत."

## राष्ट्रीय सभा.

( मुंबईचा पांचवा समारंभ )

हा अपूर्व व रमणीय देखावा पाहण्यास मिळाला त्यांच्या नेत्रांची खरोखर सार्थकता झाली राष्ट्रीय सभेचा सभामंडप सोमवार पासून अष्टौ प्रहर दुमदुमलेला असे. त्यांत गुरुवार पासून तर साक्षात् रंगदेवता सुप्रसन्न मुद्रेनें लोकांस पाचरण करीत आहे कीं काय असा भास होई. हिंदुस्थानचें खरे खरे प्रतिनिधी राष्ट्रीय उन्नती साठीं तन मन धन हीं अर्पण करीत आहेत, अशा राष्ट्रीय सभेच्या छावणींतलें हिंदुस्थानचें क्षणिक वैभव डोळ्या समोर उभें राहिलें ह्मणजे कांहीं वेळ बाह्य जगाचें विस्मरण होतें. हजारो लोक जमले आहेतः कांहीं मुखत्यार ह्मणून आले आहेत, कांहीं निव्वळ प्रेक्षक आहेत आणि कांहीं जमलेल्या पाहुण्याच्या आदरातिथ्या साठीं देह झिजवीत आहेत. देशाभिमान, राजनिष्ठा राष्ट्रोन्नति, इत्यादिकांचें अगांत वारें शिरल्या मुळें लोक प्रफुल्लित अंतःकरणानें जीवा पाड झटत आहेत. जो तो यथा शक्ति साह्य करण्यास एका पायावर उभा आहे आणि जात धर्म वगैरे भेदाभेद बाजूस ठेऊन राष्ट्रीय सभेचें काम निर्विघ्नपणें तडीस नेत आहे. राष्ट्रीय सभा उभारली जाऊन पांच वर्षे झालीं. आणि या सभेची मुंबईस ही दुसरी बैठक झाली. राष्ट्राचें एकत्र सामर्थ्य किती मोठें आहे आणि हिंदुस्थानचे कसकसें कालक्रमानें राष्ट्र बनत जात आहे हें गेल्या आठवड्यांतील आमच्या जग विख्यात नगरींतल्या समारंभा वरून कळून येईल.

यंदाच्या सभेस दोन हजारा जवळ मुखत्यार आले आहेत आणि त्या शिवाय प्रेक्षक समूह ही फार मोठा आहे. त्यांच्या सर्व सोयी फार नामी लाविल्या आहेत. डाक्टर लोक आपखुषीनें आरोग्य संरक्षण करितात. इतर बंदोबस्त पुष्कळ विद्वान श्रीमान लोकांनीं मनोनिग्रहानें चांगला ठेविला आहे. मागें जाहिर झाल्या प्रमाणें गेल्या सोमवार सायंकाळीं सरवुल्यिम वेडरबर्न व मि. ब्राडला हे मुंबई बंदरीं दाखल झाले. त्यांस सामोरा हजारो नेटीव लोक लोटला होता. आनंदाच्या जय घोषांत उभयतां पाहुणे के. नामदार मुराजी गोकूळदास यांच्या सुशोभित केलेल्या बगल्यांत जाऊन उतरले.

गुरुवारीं दिवसाचे दोन वाजतां राष्ट्रीय सभेस सुरुवात झाली. प्रथमतः बडेबडे मुत्सद्दी व धुरंधर स्थानापन्न होत तेव्हां टाळ्यांच्या गजरानें सर्व सभास्थान दणाणून जाई. आरंभीं मि. फेरोजशा मेथा यांनीं जमलेल्या मंडळीचे अगत्य पूर्वक आभार मानिले आणि नंतर बोलले कीं चार वर्षां पूर्वीं मुंबईस भरलेली राष्ट्रीय सभा मला पक्की स्मरते. तिचा आरंभ व तिची भरभराट हीं दोन्हीं इंग्रजी ज्ञानामृताचें फळ होय. ब्रिटिश राज्याच्या प्रभावा मुळें हिंदुस्थानच एक राष्ट्र बनत आहे आणि या सभेनें राष्ट्रीय विचार साऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. आंग्लो इंडियनांस नेटाव लोकांबद्दल चार गोड शब्द बोलणें मोठें संकट पडे त्यांस दिवस गतो राष्ट्रीय सभा गोड गोड कृत्यें करण्यास भाग पाडील. राष्ट्रीय सभा उत्तरोत्तर लवत आहे आणि दुही माजविणार सर सय्यद अहमद व राजा शिवप्रसाद सारखे वीर पराभव पावत आहेत आणि लोकांची देशभाक्ति पुर्णपणें व्यक्त होत आहे. आम्ही राजनिष्ठ आहो अशी बालंबाल खात्री होत आहे कीं बहुना आंग्लो इंडियना पेक्षां ही आम्ही राजनिष्ठत वरचढ करूं. ईश्वर कृपेनें आपला प्रयत्न सफल होत जाइल. के. जान ब्राइटच्या मरणानें आमचा हिंदुस्थानचा एक पाठीराखा हरवला तरी त्यांच्या तक्तावर मि. ब्राडला हे बसले आहेत हें दुःखांत सुख होय.

नंतर मि. डब्लू. सी बोनरजी यांनीं सूचविलें कीं सर वुलीयम वेडर बर्न यांनीं अध्यक्ष स्थान स्वीकारावें. आज पर्यंत [illegible] मुसलमान, आंग्लो इंडियन असे [illegible] क अध्यक्ष होऊन गेले तेव्हां [illegible] सभे संबंधानें जाति धर्म संबंधानें आक्षेप वृथा होत आहेत. सरकारी कामगारास राष्ट्रीय सभेंत आंग घालतां येत नाहीं तरी मुंबई इलाख्यांतून हिंदुस्थानचे कैवारी ह्मणून नाणवलेले गृहस्थ पेनशनदार सर वुलियम वेडरबर्न हे यंदा अध्यक्षस्थानीं मिळाले हा अपूर्व लाभ आहे. म शारनिर्लि साहेब पार्लमेंट सभेंत जाण्याचे दीर्घ प्रयत्न मागें टाकून हिंदुस्थानास आले आहेत हें विशेष आहे. हे दोन्ही स्थळीं विजयी होवोत ह्मणजे आमचा सुदीन येईल. वरील सूचनेस अनुमोदन देतांनां अल्हाबादचे पंडित अयोध्या नाथ आविशानें बोलले कीं:—मी आज मुसलमाना तर्फे हिंदु मुखत्यार आपणा पुढें उभा आहे. आणि तो अल्हाबादच्या मुसलमानांनीं निवडलेला नव्हे तर या मुंबईशहरच्या मुसलमानांनीं निवडलेला आहे. दुफळी दुही, फूट, वगैरे कांहीं नाहीं. एक दिलानें राष्ट्रसेवेस आह्मीं सिद्ध आहों. ही बातमी ऐकून सर सय्यद महमद यांनीं पाहिजे तर पंधरा दिवस सुतक धरावें. सर वुलीयम वेडरबर्न हे आज अग्रणी आहेत तेव्हां आह्मीं आपलें काम नीट बजावून त्यांस आनंदानें विलायतेस पोचविण्याचा संकल्प करूं.

सर वुल्यम वेडरबर्न साहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सर्वांची उत्कट इच्छा त्यांच्या चेहऱ्यावरून व्यक्त होत होती तेव्हां सर्वांचें अनुमत आहे असें मि. मेथा यांनीं सांगितल्या वरून लोकांच्या विज्ञप्तीस मान देऊन सर वेडरबर्न अध्यक्षस्थानीं [illegible]सले.

सर वेडबर्न यांस आपली मान मान्यता व आपल्या वरील नेटीव लोकांचा भरंवसा या बद्दल मोठा अभिमान व धन्यता वाटली आणि या बहु गौरवाबद्दल लोकांचे त्यांनीं अंतःकरणपूर्क फार फार आभार मानिले. नामदार साहेबांचें भाषण असखलित झालें व त्यांतील मुद्यांची गुंफावट फार सोप्या शद्बांनीं त्यांनीं करून दाखविली तरी प्रस्तुत प्रसंगी आमच्या स्थलावकाशा प्रमाणें अह्मा गोषवारा दाखल करीत आहों तो येणें प्रमाणें:—

१ ब्रिटिश सरकारनें उदार मनानें वरिष्ट पतीचें शिक्षण व स्वतंत्र संस्था दिल्या त्याचें च फल राष्ट्रीय सभेचा पाया हें होय. या राष्ट्र संस्थेचे उद्देश व त्यांचे साधन मार्ग इंग्रजी न्यायपणावर अवलंबून आहेत. हिंदुस्थानचें एक राष्ट्र व्हावें आणि त्यांतील आधिभौतिक संपत्तीची भरभराट व्हावी हे सभेचे मूळ उद्देश राजमान्य आहेत दहा वर्षां पूर्वीं राष्ट्रीय उन्नतीस विघ्नें आलीं होतीं परंतु लार्ड रिपनच्या अनुग्रहानें लोक पुर्ववत राष्ट्रीय विचारा कडे व त्या प्रमाणें प्रत्यक्ष कृती करून दाखविण्या कडे सरसावले तों अद्याप पुढतें पाऊल आहे. लार्ड रिपनच्या कारकिर्दीस लोकांनीं कृतज्ञता पूर्वक माना डोलविल्या त्यावरून हिंदुस्थानास इंग्रजी अंमल परकीय आहे तरी न्यायतत्वास अनुसरून चालविल्यास स्वकीय आहे असा वाटत

२ हिंदुस्थानांतील राज्यकारभारावर पार्लमेंटची देखरेख पाहिजे तशी नाही. एतदर्थ हा प्रयत्न चालला आहे. राज्यकारभाराचीं मूळ तत्वें फार मढळ व उदार आहेत तरी त्यांचें अवलंबन यथार्थ होत नाहीं हें वाईट आहे. हिंदुस्थानची प्रजा व तिच्यावरील अधिकारी मंडल या उभयता मधील संबंध फार नाजूक आहे. प्रजेस पाहिजे एक आणि अधिकारी देणार दुसरें असा बहुतेक प्रकार आहे. वडीला पासून अधिकारी वर्गीचा माहिती आहे तेव्हां त्या संबंधानें मत सांगण्यात विशेष अधिकार मला पोंचतो. रयतेचें हित म्हणजे देशांत शांतता असावी, राज्य कारभार काट कसरीनें चालावा, आणि राज्य नीती सुवरत असावी. ह्याच्या उलट गोष्टी अधिकार लोकांस आवडतात. कमरेला समशेर लटकावून फौज फाटा तयार आहे त्यांस लढाईशिवाय करमणार नाहीं. नहरची हवा व ऐषआरामादि वैभवाला लाथ मारणें व स्वतांच्या पगारावर काटकसर हीं थोड्या अधिकाऱ्यास आवडेल. राजनीती साठीं आपल्या हातांतल्या सत्तेवर व अधिकारावर पाणी सोडणारा अधिकारी विरळा.

३ सारांश, हिंदुस्थानांतील राज्यकर्त्यांवर इंग्लंडचा प्रत्यक्ष दाब पाहिजे. बर्क, फाक्स वगैरे मुत्सद्याचे विचार हिंदुस्थानांतल्या कारभाराची नीट सुयंत्र देखरेख होण्याकडे लागले होते. सन १८५७ सालपर्यंत कंपनी सरकार हिंदुस्थानचा राज्यकारभार चालवीत होतें. तेव्हां तीस तीस वर्षांनीं त्यास आपल्या कारभाराची झडती द्यावी लागे आणि नवीन सनद मिळवावी लागे. पनेस अनुकूळ अशा गोष्टी घडत व तीं सुखसंपन्न असे ह्मणून सनद पुन्हा मिळे. खुद्द राणीसरकार राज्य करूं लागल्यापासून कंपनीवील बारीक व चोकस नजर ल्यास गेला; हिंदुस्थानांतील अधिकाऱ्यांची दक्षता व पैरवी त्यांच्या खुषीचा सौदा झाला हें आपणावर मोठें अनिष्ट ओढवलें.

४ सध्याही हिंदुस्थानांतल्या कारभारावर देखरेख करण्यास लंडनमध्यें इंडिया कौंसिल आहे तरी सर्व कटवणीच्या व खटपटीच्या खेळाचा मासला आहे कारण कौंसिलांतले सभासद आपापल्या शाखेत कुलमुखत्यार असतात आणि कौंसिलांतले अंतस्थ कारभारी व हिंदुस्थानांतले राज्य कारभार हाकणारे अधिकारी एकमतानें वागतात व किंबहुना कधीं कधीं एकच मनुष्य हिंदुस्थानांत कामें करून गेल्यावर कौंसिलांतल्या सभासदाच्या नात्यानें तीं कायम करितो. हें लंडनचें कौंसिल असून नसून सारखें आहे. वरील ह्मणण्यास एक उदाहरण हें कीं, लहान गेजच्या ( दोन रुळा मधील अंतराच्या ) रेलवे आग्रहानें चांगल्या ह्मणून जनरल स्ट्रेची यांनीं हिंदुस्थानांत ठरविलें आणि पेनशनानंतर इंडिया कौंसिलांत घुसल्यावर वरील आपल्या पद्धति विरुद्ध अपिलें आपल्याच तर्फे निकालास लाविलीं. दुसरें उदाहरण शेतकऱ्यांच्या पेढ्या संबंधानें आहे. हिंदुस्थानचा शेतकरी गरीब, त्याजपाशीं भांडवल नाहीं तेव्हां जर्मनींतल्या नमुन्याप्रमाणें [illegible] पण्यासाठीं सर एव्हेलिन बेरिंग [illegible] मिनिस्टर यांनीं पांच लक्ष भांडव[illegible] कबूल केलें परंतु सरजान गोर्स्ट सा[illegible]रील प्रकरणाचा पत्ता करून टाकला.

५ परंतु आनंद मानण्यासारखी गोष्ट ही होय कीं हिंदुस्थानच्या तर्फे विलायतेंत चळवळ करण्याचीं तीन साधनें आपणांस मिळालीं आहेत. पहिलें राष्ट्रीय सभा, दुसरें इंग्लं-

डांतली पोलिटिकल एजंसी, आणि तिसरे हिं- दुस्थानच्या कैवारी पार्लमेंटरी मंडळीचा तट. विलायेंतले सारे पक्ष अजून हिंदुस्थानास अनुकुळच आहेत असें ह्मणतां येणार नाहीं, तरी हळूहळू वरील साधनत्रयानें लोकांची कलुषित मनें पायाशुद्ध होत जाण्याचा रंग दिसतो. शिवाय हिंदुस्थानांतून एक टोळी ठ्या स्योंन झोडून इंग्लंडच्या लोकांस जागृत करण्या साठीं विलायतेस जाण्याच्या खटपटींत आहे. आह्मीही मि. जार्ज यूल साहेबांच्या अध्यक्षत खालीं हिंदुस्थानच्या बाजूची एक मंडळी उभारत आहों. एकंदरींत या सर्व गोष्टी भावी सुदीन दर्शक चिन्हें आहेत.

६ राष्ट्रीय सभेच्या राजानिष्ठे संबधानें शंक असण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ ने व लोकांचें ह्मणणें आहे कीं राज्यक्रांति झाली आणि रशिया सार्वभौम झाला तर हिंदुस्थानें सर्वस्व नष्ट होईल. ह्या त्यांच्या बोलाची सत्यता सन १८८५ सालीं दिसून ली. त्या वेळीं राजेरजवाडे, संस्थानिक पादिकांनें सर्वोपरीनें सहाय्य आणि देशी मानपत्रकारांचे राजनिष्ठनें केलेलें प्रजेचें साहन हीं सर्वांस महशूर आहेत. इंग्रजी ज्याची मजबूती तीच हिंदुस्थानची मजबूती आहे. इंग्लंड खेरीज हिंदुस्थानास अन्य सुद थारा नाहीं. रयतेस खाऊन पिऊन सुखी ले तर इंग्लंडच्या व्यापारास भरभराटी ये. प्रसिद्ध मि. दादाभाई नवरोजी यानीं प्रतिपा ले आहे कीं आस्ट्रेलियांतील मनुष्य इंग्लंडचा ८ पौंडाचा माल विकत घेतो परंतु हिंदुस्थानचा मनुष्य कर्जाच्या पेंचामुळें १८ पेन्स करण्यास समर्थ नसतो.

खेरीस मि. चार्लस ब्राडला हे आज स आले आहत हे या देशाचे आम्ही महत्य लेखितों असें सांगून अध्यक्षांनीं सुरवें भाषण संपविलें.

समेचा दुसरा दिवस

( २७ दिसेंबर )

अध्यक्षांनीं सभा सुरू केल्यावर मि. फिरो मेथा यांनीं अशी सूचना केली कीं, मि. ला यांस राष्ट्रीय सभेच्या मुखत्यारानीं राष्ट्राच्या वतीनें मानपत्र देण्या करितां सि आडम, बानरजी, व मेथा या तिघ- कमिटी नेमावी. सूचना पसार झाली.

मि. नारटन यांनीं ब्राडला—बिलासंबं खालील सूचना केल्या त्या येणें प्रमाणें हिंदुस्थान सरकारच्या व प्रांतिक सरया कायदेकौन्सिलांत निम्मे सभासद नियुक्त, एक चतुर्थांश सरकारी हुद्याच्या नें काम करणार, आणि एक चतुर्थांश रानें नेमिलेले असावे "

" इलाख्याचा प्रत्येक मुलकी ( रेव्हीन्यु) हा हा निवडणुकीसाठीं एकेक वेगवेगळा गणला जाईल. "

" एकवीस वर्षाच्या वर ज्यांचें वय आहे शा सर्व पुरुषांना निवडणुकीच्या कामीं मत याचा अधिकार आहे मात्र त्यांच्या अंगीं सांगण्यांत येईल त्याप्रकारची लायकी अवी व नालायकीचे गुण नसावेत. "

" प्रत्येक जिल्ह्यांतील मत देणारांनीं निणाऱ्या मंडळीचे सभासद होण्यासाठीं दर लाख संख्येस बारा या मानानें साऱ्या ल्ह्याच्या लोकसंख्येप्रमाणें होतील तितके त्यार निवडून पाठवावे. या मुखत्याराच्या लायकीचे गुण असून नालायकीचे नसावेत.

" अशा रीतीनें आलेल्या मुखत्यारांची निवडणारी सभा बनून या सभांनीं हिं. सच्या कायदेकौन्सिलासाठीं दर पन्नास लाख लोकसंख्येस एक मुखत्यार या प्रमाणानें मुखत्यार निवडावे, तसेंच प्रांतिक सभेसाठीं जे मुखत्यार पाठवावयाचे त्यांच्या संख्येचें प्रमाण असें असावें कीं दर दहालाख लोकसंख्येस १ मुखत्यार. मात्र ही निवड करतांना हिंदु, पारशी, ख्रिश्चन आणि मुसलमान या जातींने मुखत्यार असतील त्याच्या संख्ये आणि इतर जातींच्या मुखत्यारांच्या संख्येचें प्रमाण एरव्हीं लोक संख्येत या जातींचें जें प्रमाण असेंत तितकेंच असळ पाहिजे. दोन्ही प्रकारच्या कौन्सिलांच्या सभासदांच्या अंगीं लायखी असून गैरलायखी नसावी. "

सहावें कलम असें आहे कीं " निवडणूक करतांना मत देणाराचें नांव प्रसिद्ध रीतीनें पुढें येण्याची जरूर नाहीं (व्होट बाय ब्यालट)

वरील सूचना सर्वानुमतें पुष्कळ वाद विवाद झाल्यावर पसार झाल्या.

✓ राष्ट्रीय सभे संबधानें कांहीं प्रांतिक सरकारानें कसा काय बंदोबस्त केला आहे हे सांगतांना पंडित अयोध्या नाथ व मि. नारटन यांनीं अनुक्रमे बोलून दाखविलें कीं ' आह्मी येथें काय करीत आहों हें पाहण्या करितां अल्हाबादेचा कानस्टेबल मुनसब अली काल येथें आला आहे; ' आणि 'कर्नल वेल्डन हे पांच कानस्टेबल बरोबर घेऊन मद्रास पासून आमचे वर पहरा करीत आले.

✗ वर नमूद केलेल्या तिसऱ्या कलमांत पुरुष शब्दाच्या ठिकाणीं ( मनुष्य ) असा शब्द असावा म्हणजे स्त्रियांचा ही समावेश होईल अशा सूचनेस स्त्रिया डेलीगेटानीं देखील संमत्ति दिली नाहीं साहाव्या कलमा मध्यें कांहीं मुसलमानांनीं अशी प्रतिसूचना केली- कीं मुसलमांन मुखत्यारांची संख्या हिंदु मुखत्यारांच्या संख्ये बरोबर असावी परंतु या सूचने विरुद्ध मुसलमान लोंकां मध्येंच मतें पुष्कळ मिळाली.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER 30, 1889.

## THE FIFTH NATIONAL CONGRESS.

On the 26th December the delegates of the National Congress coming from the various parts of India to represent the various sections of the native community assembled after a lapse of four years in Bombay to discuss the various political problems affecting their own vital interests. A large Mandap has been prepared for the accomodation of the Congress people. Another interesting feature which has infused more animation and life into the Congress movement is the most encouraging presence of a strong-minded, noble-hearted and firm-principled Parliamentary mem ber Mr. Bradlaugh. The honorable Mr. Pherosbaha Metha, the president of the Reception-Committee made an excellent opening speech in which he significantly and emphatically urged that the main aim and end of this political movement is not to supplant the British rule but to supplement, strengthen and substantiate all what the British Govt. has been doing for the people of India. The establishment of the congress has produced, he said, no inconsiderable effect upon public opinion of the English people both in India and England. The movement has suffered much at the hands of its enemies. Sir Ahmad and Raja Shivaprasad established an association to counteract the inner working of this national movement but the sum-total of all their efforts and endeavours ended in a magnificient fuss. When the opponents of the congress saw that all what they could in opposition to this national movement bore no substantial fruit they had recourse to this last rediculous resource namely to accuse the movers of this agitation with "sedition and disloyalty." But the readers of this movement has also succeeded in successfully meeting this charge. These insedious efforts of the anticongressionists have done yeoman's service in securing the foundations of this popular movement, in striking the very roots of this political germ deeper and deeper and in giving a full vent to the enthusiasm of its powerful supporters. There were and still are several mighty difficulties in the way of this movement. The differences of creeds, castes, the popular ignorance and the extreme poverty of the people are really deplorable. However the movement is purely national intended for purely national interests and has, to a considerable extent, succeeded in securing and cementing National unity. After the conclusion of the excellent oration of Mr. Metha Mr. Bonnerji proceeded to the work of elect ing a president for this year's Congress. He made a short but eloquent speech in which he pointed out to the audience the merits, the high services which Sir. W. Wedderburn has done to the natives of India during the period of his public service for nearly twenty five years in India. Sir. W. Wedderburn has been purposely invited by his native friends to accept the presidential honours of this year's congress and the said gentleman out of sympathy for the native cause has kindly complied with the request. The motion was heartily supported by Mr. Aydhyanath Prasad who was the president of the Reception committee last year in an able discourse. Then the presidential chair was accepted by Sir. W. Wedderburn amidst the cheers and applause of the grand assemblage of delegates. Mr. W. Wedderburn then made an excellent speech which is very interesting and instructive to every reader. We summarize the salient points of his speech in the following quotation and reserve our comments with the further account of the proceedings of the congress for our next issue.

"On being voted to the chair Sir William Wedderburn, who had been sitting at the back, advanced to the front of the platform. His presence was acknowledged by a burst of cheering which prevented his speaking for several minutes. When quiet had at length been restored, Sir William thanked the meeting for the great honour it had done him. He said he might reasonably claim to be a member of the official class in this country. His family had chosen the Indian Civil Service for its profession. (Cheers.) His father had joined that service in the year 1807, and had served for many years in this Presidency. Then his elder brother had entered the Civil Service, and lost his life during the mutiny. Sir William said he need hardly remind the Congress that he was himself a member of the Bombay service, from which he had only recently retired. He was therefore in a position to speak with some little authority. He would gladly say at starting that his objection to the Indian Government was not an objection to a system. He had nothing to say against the men. The Indian services, civil and military, were the best in the world. Dissatisfaction centered around the bureaucratic system on which the Government was administered. There was really no appeal from the decision of officials, who, whether right or wrong, were obliged to support one another. Sir William cited as an illustration of his statement the history of the famous battle against the break of gauge on large railway lines. Sir Richard Strachey, the Public Works Minister, was in favour of narrow gauge railways as feeder lines; the whole of India was against a breach of continuity. Yet Sir Richard conquered; and when an appeal was sent to the India Office—why, Sir Richard, who was by this time in the India Office, approved the proceedings of the Sir Richard who had been in India. (Laughter and applause.) Then Sir William spoke of his scheme for establishing land banks throughout India for the relief of the ryot, who only required capital to add indefinitely to the wealth of the country. That scheme was stabbed in the dark by some one, he did not know by whom. The India Office killed it; and when a friend of his and a friend of theirs, Mr. Samuel Smith- applause- asked in the House of Commons, the other day, what had become of it, the reply was that the Government did not consider the scheme practicable. This reply, let them remember, was given in face of the fact that at this day hundreds of such banks as he had recommended existed in Germany. (Shame!) This was the result of a faulty system, which could not continue if the inquiry that used to be held every thirty years were re-introduced. Sir William spoke at some length on the necessity of liberalising the administration; and resumed his seat amidst loud cheers."

## वऱ्हाड.

हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी मि. बक हे कांहीं राजकीय कामा साठीं अकोल्यास येत्या दुसऱ्या तारखेस येणार आहेत.

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं आमचे मित्र रा. रा. शंकर नारायण डांगे हे एकटेच वऱ्हाडांतील विद्यार्थ्यां पैकीं यंदाच्या बी. ए च्या परीक्षेत विजयी झाले.

यंदा म्याट्रिक्युलेशन परीक्षेस २९९२ उमेदवार होते त्या पैकीं ७३१वर पसार झाले आहेत त्यां पैकीं वऱ्हाडांतील विद्यार्थ्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—

अकोला हायस्कूल—

शेक महंमद युसफ, नारायण रामचंद्र मुधोळकर, निळकंठ दिनकर करव्हे, नरहर राजाराम कालेकर, दिनकर वामन हरकरे, बाळकृष्ण नारायण देशपांडे, लक्ष्मण चिंतामण काळे, रामचंद्र विष्णु महाजनि आणि प्रायव्हेट गंगाधर वामन परांजपे; व पुणें हायस्कुलांतून गेलेले वऱ्हाडचे डायरक्टरचे चिरंजीव काशिनाथ श्रीराम जठार.

उमरावती हायस्कुलः—

एकबोटे, जोग, थत्ते, दुधगांवे, कोल्हेकर पुरोहीत व दामले.

## वर्तमानसार.

ब्रिटिश व्यापारास धक्का--काकेशस कडे जाणाऱ्या ब्रिटिश मालावर शेकडा टक्के जकात बुलाऱ्याच्या अमिरानें बसविली आहे. ती रशियन एजंटाच्या सांगीनें जुलूम बसविली असें ह्मणतात.

क्रीटमध्यें पुनः दंगा सुरु झाला. पांच शिपाई मारले गेले पुष्कळ ख्रिस्ती लोकांस धरून मारून त्रिज्या घातल्या असें समजतें.

पोर्तुगीज लोकांच्या वर्तनामुळें इंग्रज सरकारच्या आरमारापैकीं कितीएक लढाऊ गलबतास तार हपिसाजवळ असावें असा हुकूम झाला आहे.

राजपुत्र प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर यांची स्वारी ब्रह्मदेशांत गेली. ते कृष्णा नांवाच्या आगबोटीनें परवा म्हणजे ता० २० रोजीं रंगून येथें पोचले.

हिंदुस्थान सरकारानें सर्व इतर सरकारांकडे क्लार्क व दुसरे हाताखालचे कामगार यांणी चिफ सेक्रेटरी यांची परवानगी घेऊन वर्तमान पत्राचे बातमीदार व्हावें म्हणुन सरक्युलर हुकूम फर्माविला आहे त्याचा काय उपयोग होईल कोण जाणें!

पुस्तकांविषयीं नवीन कायदा--कलकत्ता येथील गव्हरनर जनरल यांच्या कायदे कौन्सिलच्या सभेपुढें छापखाने व पुस्तकें या संबंधाचा सन १८६७ चा २५ आक्ट याच्या दुरुस्ती बद्दलच्या कायद्याचा मसुदा सादर झाला. त्यांत आजपर्यंत सरकारास पुस्तकाच्या तीन प्रती देऊन त्यांची किंमत मिळत असे ती या कायद्यानें मिळणार नाहीं असा फेरफार होणार आहे. पुस्तकें कर्त्यानें दोन प्रती सरकारांस फुकट दिल्याच पाहिजेत व सरकारानें मागितल्यास आणखी दोन प्रती फुकट द्याव्या लागतील. ग्रंथकर्त्यांनीं कितीएक पुस्तकांची किंमत अगदीं बेता बाहेर ठेविल्यामुळें हा फेरफार करणें सरकारास भाग पडलें असें आन० मि. हेचिन्स हे मसुदा सादर करतेवेळीं कौन्सिलमध्यें बोलले.

मि० अमीरअली यांची कलकत्ता येथील हायकोर्टांत जज्जाच्या जागेवर तुर्त नेमणूक झाली व नाताळच्या सुटी नंतर ते आपल्या कामावर रुजूं होतील.

काश्मीरांतील दोघा ब्राह्मणानीं कांतडे साफ करण्याचा धंदा पतकरला असें ह्मणतात.

मद्रासचे गव्हरनर लार्ड कानिमारा हे हैदराबादेस लवकरच जाणार आहेत.

ब्रह्मदेशाचा वसुल पुढच्या वर्षीं एक कोट रुपयाजवळ जाईल असें ह्मणतात सु० प०

पुण्याच्या सार्वजनिक सभेनें चालू सालच्या राष्ट्रीय सभेंत विचार करण्याकरितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुख्यत्वें ५ विषय सुचविले आहेत.

१ कायदे कौंसिलची सुधारणा

२ पार्मनेंट सेटलमेंट म्हणजे जमीनीचा धारा कायम करून टाकण्याची पद्धती.

३ आपकारी खातें.

४ पब्लिक सरव्हिस कमिशनच्या रिपोर्टच्या संबंधानें सरकारची व्यवस्था.

५ मीठावरील कर.

हें वरील पांचही विषय फार महत्वाचे आहेत या सर्वांचा वाटाघाट होऊन या संबंधानें सरकारानें काय करावें हें त्यांस स्पष्टपणें सुचविलें पाहिजे.

म्युनिसिपालिट्यांना सरकारी ब्यांकेशीं संबंध ठेवून आपले हिशेब अकौंटंट जनरलकडे पाठविण्यास सोयीचें पडेल किंवा कसें [illegible] हिंदुस्थान सरकारांतून विचारण्यांत आलें आहे, व हल्लीं तिन्ही भागाचे कमिशनर व अकौंटंट जनरल यांजकडे हें प्रकरण रिपोर्टास आलें आहे.

इटालीहुन लंडनास दररोज १०,००,००० अंडीं जातात

सुक्ष्मदर्शक यंत्राची कल्पना निघाल्यास आज ३०० वर्षें झाली.

रशियाच्या झारांची प्रकृती फार आजारी आहे.

येत्या २९ व्या तारखेस बनारसच्या महाराजांस राज्याभिषेक होणार.

सन १८११ मध्यें मेणबत्त्याची युक्ती फ्रेंच देशांत निघाली.

सन १८९१ च्या डिसेंबर महिन्यांत खानेसुमारी करण्याचा ठराव झाला.

येत्या वर्षी हिंदुस्थानांतील फौजेसाठीं कांहीं नवीन हत्यारें तयार होणार आहेत.

पुण्यास भांग्या मारुतीनजीकच्या इमारतीखालीं जिवंत पाण्याचा झरा लागला आहे.

हैद्राबादेस जे लष्करी लोक आहेत त्यांच्या पागोट्यावर एक देवाची मूर्ती असते कारण काय?

रावळपिंडी येथील लष्करी शिपायांची हत्यारें चोरीस जाऊं लागलीं आहेत. हा काय चमत्कार आहे.

निजाम सरकारांनीं राजपौत्राचा अती उत्तम सन्मान केला ह्मणून त्यांच्या पित्याकडून निजामास आभारदर्शक पत्र आलें आहे. इंग्रजी राज्यांत पदव्या व आभार याशिवाय दुसरें कोणतें बक्षीस मिळणार? म० मि.

शिवरी नारायण येथें ता. २१-१२-८९ रोजीं ७ वाजता एक गोंडणीची लहान मुलगी वयानें अदमासें १२ दिवसांची एका वानरीनें झाडावर नेली, व तेथें या डाहळीवरून त्या डाहळीवर उडत असे. पुष्कळ लोकांनीं ती पोर वानराच्या हातुन सुटावी ह्मणून आपणाकडून होतील तितके प्रयत्न केले, पण बिलकुल उपयोग झाला नाहीं. शेवटीं त्या मुलीला तिनें आपली लहर फिरली तेव्हां विस हात उंची वरून खालीं टाकून दिलें त्यामुळें ती मुलगी तीन दिवसानीं मरण पावली.

बारमाही आंबे— आफ्रिकेंत निजेर नदीच्या कांठीं ज्या आंब्याच्या बागा आहेत; त्यांतील आंबे झाडास वर्षांतून ३-४ वेळा आंबे येतात. एकदां एका फांदीला मोहोर येऊन पाड येऊन गेला ह्मणजे लागलेंच त्या झाडाच्या दुसरे बाजुस मोहोर येऊं लागतात मिळून वर्षभर झाडें आम्रफलानीं ओंथबलेलीं असतात असें तिकडे गेलेल्या एका प्रवाशानें लिहिलें आहे. न्या० सिं०

हा आजमास कीं थट्टा?— ब्रह्मदेश प्रीत्यर्थ आज पर्यंत एकंदर २२ २ कोट रुपये खर्च झाला असें बाहेर आलें आहे. हा देश घेऊन शांतता करण्या साठीं एकंदर २५ पासून ३० लक्ष रुपये पर्यंत खर्च होईल असा मुळचा अंदाज होता. या वरून मुळ अंदाज व वास्तविक खर्च यांच्या मध्यें सरासरी १०० पट अंतर पडलें असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. लॉर्ड डफरीन साहेबां सारख्या नावाजलेल्या मुत्सद्याचा कारकीर्दींत एवढी घबाड चूक कशी घडली याचें च नवल वाटतें.

गेल्या सालच्या अदजांत अफूचें उत्पन्न १९३०००० रुपये कमी धरलें होतें, पण झालेल्या उत्पन्नाच्या हिशेबा वरून पहतां झालेल्या मुदतींत ४२९४०००० रुपये जास्त उत्पन्न झालें आहे असें समजतें.

लढाई होण्याचा सुमार— नायासा ह्मणून आफ्रिकेच्या मध्यभागीं सुपीक व सोन्याच्या खाणीचा एक मोठा देश आहे. तो आमच्या मालकीचा असें इंग्रज व पोर्तुगीज सरकार ह्मणतें. पोर्तुगिज सरकारचा एक शोधक मेजर पिंटो याणें त्या प्रदेशांतील मोकोलोलो या ठिकाणीं दांडगाई करून पोर्तुगीज बावटा हा रोविला. शिवाय इंग्रजानीं स्वार्थीसाठीं कांहीं झटलें तरी लढाई करून आह्मी आपला हक्क शाबीत करूं असें पोर्तुगीज सरकार ह्मणत आहे. पोर्तुगिज सरकारानें दांडगाई चालविल्या मुळें इंग्रजी पत्रें दांत ओठ खाऊन लढाई करण्यासाठीं इंग्रज सरकारास उत्तेजन देत आहेत. परिणाम काय होतो पहावा!

प्रजा प्रेमापेक्षां तटबंदी जास्त यंदाच्या पार्लमेंटांत हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दी वरील तटबंदी मजबुत आहे कीं नाहीं, व ती कशी मजबूत पाहिजे याची चौकशी करण्या साठीं एक रायल कमिशन नेमावें असा प्रधान मंडळीचा बेत आहे असें समजतें. हिंदुस्थानच्या राज्य कारभाराची चौकशी करण्या साठीं एक नेटिव व युरोपियनांचें रायल कमिशन नेमावें अशी आरड हिंदुस्थानांतील वर्तमान पत्रें आज किती दिवस करीत आहेत, तें नेमण्या साठीं ब्राडला दरसाल सूचना आणित आहेत, कंपनीच्या हातांत हिंदुस्थानचा राज्य कारभार होता तेव्हां दर वीस अगर तीस वर्षांनीं अशी चौकशी होत असे तशी १८५८ सालां पासून झाली नाहीं ह्मणून ती व्हावी अशी इकडील रयतेची आरड असतां ते कमिशन नेमण्यास सरकारचें धैर्य होत नाहीं आणि हें नेमण्यास सरकार तयार होणार या वरून प्रजा प्रेमापेक्षां निर्जीव तटबंदीचें मोल शहाणें ब्रिटिश सरकार जास्त मानतें असें उघड दिसतें. लक्ष्मीनें राष्ट्र अगर व्यक्ती अंध होत असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं.

दुष्काळाची भीति —मद्रास इलाख्यातील तंजावर, कुंभकोण, नगापट्टण वगैरे जिल्ह्यांत हिंवाळ पाउस न पडल्या मुळें पिक ठार बुडण्याचा सुमार दिसूं लागला आहे. भात एका कोलंब्यात नेहमीं भाग चौदा आणि विकतेते २॥ रुपये प्रमाणें विकूं लागलें आहे. गोरगरीबास गुजारा होण्याचें अति संकट वाटूं लागलें आहे. गेल्या आठवाड्यत तंजावर भागांत भर दिवसा दोन चार ठिकाणीं भाताच्या कोठारावर गरीब लोकांनीं हल्ले करून लुटालुटी केल्या. दंगा मोडण्या साठीं गोळ्या घालून पोलिसांनीं दोन इसम ठार मारले अशी ही बातमी आहे. एकूण मद्रास इलाख्यावर कठीण प्रसंग गुदरण्याचा सुमार दिसूं लागला आहे.

ता० ११ फेब्रुवारीस पार्लमेंट सभा सुरू होणार असें ठरलें आहे. यंदाचे पार्लमेंट महाराणी साहेब जातीनें खुलें करणार.

---

नोटीस.

ता० ११ माह नवेंबर सन १८८९ इसवीचे अकोतील नोटीस पावल्यावरून उत्तर भवानासिंग, डोंगरासिंग वल्लद विठ्ठलसिंग रजपूत दस्तो बावनबीर तालुके जळगांव यांस

व ब्रिटिश इंडियांतील रहिवाशी ले
नयपूर्वक सुचविणें आहे तें. माझा
मे नथुसिंग वल्लद विठ्ठलसिंग व उभयता
वानसिंग, डोंगरसिंग असे तिघे सापत्न ब
होते. माझा सासरा संवत १९३५ मिती फा
लगुन वद्य १३ रोजीं मयत झाला. संव
१९३६ मिती आषाढ शुद्ध ६ उर्फ तारी
१३ माहे जुलई सन १८८
पर्यंत तिघे एके ठिकाणीं खाणेपिणें व देणेंघे
करीत होते पण तुझा उभयतांची वागणु
माझे नवऱ्यास नापसंत झाल्यामुळें बापु हस
जी पाटील बावनबीर याचे हातानें स्थाव
गम जिंदगीचे सारखे तीन हिसे करून
झा नवरा एक हिसा घेऊन निराळा
व तुह्मी दोघे एकेठिकाणीं आज तार
आहा. माझी वाटणी घरांत तिसरे
आहे तुह्मी हरहमेशा तंटे करीत अस
माझा नवरा वाड्यातून निघून दुसरे घ
धून बाहेर आम्ही राहिलों. निराळे रा
वर जमीन नवीन खरेदी केली व
दिली; असाम्या सारख्या वाटून घेतल
त. माझा नवरा सन १८८८ सालीं
मासीं मरण पावल्यावर माझे नवऱ्या
जमीन असलेली माझे नावे न होण्या
तुह्मी तहशिलकचेरी.जळगांव येथें अर्ज
देऊन मला विनाकारण खराब तुह्मी के
ढें जमीन तर माझ्या नावें झाली. तसें
झी संवत हिवतापाने अज.रानें मयत
असून गावांतील लोकांनीं जहर खाऊ
अशी तोहमत आणल्यावरून चिरली
असें नाना तऱ्हेनें तुह्मी मला वारंवार
देत आहा. हल्लीं तुह्मी मला नो
हे त्यांत मला कोणत्या प्रकारे
जिनगीचा हक्क विल्हेवाट करण्य
तुह्मी उभयतांची व माझी वाट
सुमारें १० वर्षें झाली. तुह्माशी
यी संबंध नाहीं माझी जिंदगी मे
बक्षीस अगर विकत देण्यास मालक
तुह्मी नोटीस दिल्यानें माझा अधि
सा होत नाहीं. नोटीस दिल्यामुळें
सावकार लोक पैसा कर्ज नवीन
असें झालें आहे व मागील कर्ज अ
द्दल सर्कानें तगादा करीत आहेत स
तुह्मास नोटिशीनें कळविलें आहे तर
कारण तुम्हीं माझ्या अब्रुचें नुकसान
आहे या बद्दल योग्य कोर्टांत नें
चालू आहे तसेच माझ्या खरेदी
जाग्यावर तुम्हीं जबरी करून अ
भींती घालणे सुरू केल्या मुळें
दिवाणी कोर्टांत दावा सुरू केला
जाग्या बद्दल मजपाशीं गहाणखत
खत वगैरे झाल्यास आमचे एकत्र
आहे नोटीसीचे उत्तर वगैरे तुम्हीं
तुम्हांपसुन या नोटीसीचे खर्चास
भरून घेतला जाईल कळावे
२४ माहे दिसेंबर सन १८८९ इ०

(सही)

राजुबाई मर्द नथुसिंग रजपुत
बावनबीर ईचे हातची नि
दस्तूर गणु वल्लद जानजी
मार्फत निशाणी मशारनि

---

हें पत्र अकोला येथें कै० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव यांनीं छापून प्रसिद्ध केलें.